# वारांगनांचे विश्व



—मोहन चक्रवर्ती

REFBK-0010873
९८६०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ९३२२

सुंदर-साहित्य क्र....२

# वारांगनांचें विश्व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 30670 वि: निबंध
क्रमांक 1322 नों: दि: 6/6/59

-: लेखक :-
मोहन चक्रवर्ती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 70603
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0010873

हित्य, पुणें २

किंमत ३ रुपये

—: प्रकाशिका :—
सौ. स्नेहलता मेहेंदळे
१००७ सदाशिव पेठ, पुणें २.

☆

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

सुंदर–साहित्य क्र....२
आवृत्ति पहिली
एप्रिल १९६०

☆

किंमत ३ रुपये

☆

—: मुद्रक :—
ना. अ. मेहेंदळे,
जीवन मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ,
पुणें २.

— मनःपूर्वक

सन्मार्गगामी

राहूं इच्छिणाऱ्या

परंतु

'नकळत फसलेल्या'

सच्छील

भगिनींस !

# वारांगनांचें विश्व

## भाग पहिला

♠ स्त्रियांस पळविणारी आंतर्राष्ट्रीय टोळी
♠ स्त्रियांची शिकार कशी साधतात ?
♠ सायप्रस आणि खार्टुमचा ' खुला व्यापार.'
♠ इटाली आणि फ्रान्सच्या वारांगना.
♠ ' रति–मदनाचा' गगनविहार.
♠ मोरोक्कोचा ' पाशा. '
♠ हांकेस ' ओ ' देणारी ' कॉल गर्ल '
♠ लुईझियाना=बळजबरीचा व्यवसाय.
♠ पापी पूर्व

## भाग दुसरा

♠ शिकागोंतील पापी महाल.
♠ वेश्या आणि गुप्तहेर.
♠ टोकियोंतील विलासी वेश्या.
♠ पुरुषांची शिकार करणाऱ्या स्त्रिया.
♠ ' मकाव ' मधील ' अविस्मरणीय रात्र.'

☆

# ‘वारांगनांचें विश्व’

भाग पहिला

१४८७३

# १ स्त्रियांस पळविणारी आंतर्राष्ट्रीय टोळी

जगांतील अत्यंत जुनाट व्यवसाय म्हणून वेश्या-व्यवसायाकडे पहाण्यांत येतें. कारण प्राचीन काळापासूनच स्त्रिया देहविक्रय करीत आल्या आहेत. किंवा देहविक्रय करण्याकरितां त्यांना बळेंच या व्यवसायांत ढकलण्यांत आलें आहे.

या जुनाट व्यवसायानें हल्लीं फार उग्र स्वरूप धारण केलें आहे. मुलीस फूस लावून पळवून या धंद्यांत सामील करून घेण्यांत येते. आणि ही व्यवस्था आंतरराष्ट्रीय जाळें विणण्यांत आलेल्या एका टोळीमार्फत पार पाडण्यांत येत आहे. टोळींतील हस्तक जगांतील कानाकोपऱ्यांत पसरले आहेत. इंग्लंड, अमेरिका, युरोप, आफ्रिका, आशिया, जपान, शांघाय येथें त्यांचे एजंट किंवा दलाल कार्य करीत आहेत. पूर्वी लीग ऑफ नेशन्स मार्फत व हल्लीं 'युनो' मार्फत 'देहविक्रयाच्या धंद्याविषयीं' चौकशी चालू आहे व त्यांतील अनेक अनिष्ट प्रथांना आळा घालण्यांत येत आहे.

पण मादक पदार्थांचा जसा सर्वत्र गुप्तपणें फैलाव होत आहे त्याच-प्रमाणें स्त्रियांसदेखील देशोदेशीं वेश्या व्यवसायासाठीं पाठविण्यांत येत आहे. त्यांत अनेक अल्पवयीन मुली असतात, विधवा असतात नि मौजमजेच्या जीवनाला भाळून स्वतःची फसगत करून घेणाऱ्या बिचाऱ्या विवाहित-स्त्रियाहि कुंटिणींच्या ताब्यांत सांपडतात.

पाश्चात्य देशांत, आफ्रिकेंत आणि पूर्वेकडील प्रदेशांत मात्र वेश्या-व्यवसायानें किळसवाणें व माणुसकीला लाजविणारें असें स्वरूप धारण केलें आहे.

ग्रीक लोकांच्या काळांत या धंद्याला आकर्षक स्वरूप प्राप्त झालें होतें. स्त्रियाहि स्वयंप्रेरणेनें व आवडीनें या व्यवसायांत पदार्पण करीत असत. १८ व्या शतकांत पॅरिसच्या वेश्या (कॉकोट्स) मजेशीर जीवन जगत होत्या. जपानच्या 'गैशा' मुली मानानें जीवन व्यतीत करीत होत्या. अरामकोनें अरेबियांवर प्रभुत्व मिळविण्यापूर्वीं तेथील वेश्याहि आनंदांत होत्या. पण या

व्यवसायांतील स्त्रियांचें सौख्य, समाधान आतां वाऱ्यावर उडत गेलें आहे. त्यांतील 'मजा' नष्ट झाली आहे. हल्लींच्या काळांत याला केवळ प्रचंड धंद्याचेंच स्वरूप प्राप्त झालें आहे असें नसून त्या धंद्याला यंत्राचें स्वरूप प्राप्त झालें आहे. या व्यवसायांतील पडद्यामागील माणसें मुली हस्तगत करण्याचें कार्य यंत्राप्रमाणें सुरळीतपणें करीत आहेत.

'पैशाकरितां प्रेम' हा एक मोठा व्यवसाय झाला आहे आणि एकाद्या 'कॉर्पोरेशन' च्या कामाप्रमाणें हेंहि कार्य तितक्याच शिस्तीनें पार पाडण्यांत येत आहे.

पाश्चात्य देशांतील वेश्याव्यवसायाकडे नजरफेंक केल्यास असें आढळून येतें कीं 'फ्रान्स' नें जी पद्धत अस्तित्वांत आणली तीच पद्धत पुढें जगांत सर्वत्र मान्य करण्यांत येऊन त्याची अंमलबजावणी करण्यांत आली. त्यामुळेंच सर्वत्र 'मुली पळविणाऱ्या टोळयां' चा जन्म झाला.

वेश्यागृहांना सरकारी परवाना मिळाला. लायसेन्स लाभलेल्या घरांत वेश्याव्यवसाय चालविण्यास मुभा देण्यांत आली. फ्रान्समध्यें जवळजवळ एक हजार वर्षें जो धंदा 'फ्री लान्स' पद्धतीवर चालत होता तोच धंदा १९ व्या शतकांत सरकारी कायद्यानुसार चालूं लागला. आणि मग होऊं नये तें घडलें.

पन्नास वर्षांनंतर स्त्रियांना बळेंच या धंद्यांत कोंबून पैसे कमावणारी टोळी अस्तित्वांत आली. आणि मग या टोळीचें कार्य इतकें फोंफावत गेलें नि त्याचा इतका विस्तार झाला कीं आंतरराष्ट्रीय सहकार्यावरच त्याच्यावर नजर ठेवण्यांत येऊं लागली. आणि म्हणूनच त्या टोळीचा बीमोड करण्याच्या प्रयत्नास सुरुवात झाली.

जगांत सर्वत्र जो वेश्याव्यवसाय चालू आहे, तो ठराविक पद्धतीनें चालू आहे. आणि हा केवळ योगायोग नव्हे. अधिकारी वर्गास जी माहिती मिळाली आहे त्यावरून हेंच शाबीत होतें कीं या व्यवसायामागील लोक संघटितरीत्या कार्य करीत असून त्यांच्यामार्फतच स्त्रिया व मुलें पळविण्याचा धंदा चालू आहे.

वेश्यागृहें नष्ट केल्यानंतर आणि टोळीवाल्यांचा बंदोबस्त केल्यानंतर स्त्रियांस व मुलांस पूर्वीप्रमाणें कोणीतरी पळवून नेत नाहींत असें आढळून येईल, किंवा वेश्याव्यवसाय निराळाच मार्ग आक्रमूं लागेल.

अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय टोळीमार्फत मादक पदार्थ पुरविण्याचा धंदा फारच मोठ्या प्रमाणांत चालू आहे, हें जितकें खरें आहे, तितकेंच हेंदेखील खरें आहे कीं मुलें व स्त्रिया पुरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीशीं अमेरिकेंतील वेश्याव्यवसाय चालविणारांचा संबंध पोहोंचत नाहीं. त्याचें कारण हें होय कीं अमेरिकेंत लायसेन्स असलेलीं वेश्यागृहें नाहींत. वेश्यागृहें चालविण्यास अमेरिकेंत मज्जाव आहे.

येवढेंच नव्हे तर अमेरिकेंत 'कॉल–गर्ल' पद्धतीनें (टेलिफोनवरून इशारा मिळतांच तरुणी गिऱ्हाइकाकडे वा गिऱ्हाईक तरुणीकडे रवाना होतें. टेलिफोनवरून गिऱ्हाईक व वेश्येचा 'करार–मदार' करण्यांत येतो. पण या 'कॉल–गर्ल' मात्र फारच महाग असतात. सामान्य गिऱ्हाइकांस त्या परवडण्याजोग्या नसतात. त्यांचा उपयोग अमेरिकेंतील श्रीमंत लोकांसच होतो.) व्यवसाय करणाऱ्या मुली किंवा खाजगी घरांत व्यवसाय चालविणाऱ्या मादाम व रस्त्यावर मोकाट भटकणाऱ्या वेश्या व त्यांच्यावर नजर ठेवणारे त्यांचे 'मालक' यांना परदेशांतील वेश्यांची कधींच आवश्यकता भासली नाहीं आणि म्हणूनच वेश्याव्यवसायामागील आंतरराष्ट्रीय टोळीशीं अमेरिकेंतील वेश्याव्यवसाय चालविणारांचा संबंध पोहोंचला नाहीं.

कायद्याप्रमाणें चालविण्यांत येणारीं वेश्यागृहें आणि स्त्रिया पळविणारी टोळी हें हातमिळवणी करून कसा व कां धंदा करतात, याचें कारण अगदीं उघड आहे. इतर धंद्यांप्रमाणेंच वेश्यागृहांचेंहि ठराविक गिऱ्हाईक असतें. शिवाय इतर अनियमितपणें येणारीं गिऱ्हाइकें असतातच.

नेहमीं येणाऱ्या गिऱ्हाइकांनीं वेश्यागृहांत असणाऱ्या सर्व वेश्यांचा आस्वाद लुटल्यानंतर साहजिकच त्यांना "नव्या चेहऱ्या" ची आवश्यकता भासूं लागते व जुन्या वेश्येकडे ते दुर्लक्ष करूं लागतात. असल्या गिऱ्हाइकांस नेहमींच नवें आणि न्यारें असें "पांखरूं" हवें असतें. शिवाय प्रत्येक नव्या वेश्याकडून नवनवीन मजा लुटण्याची त्याला संवय जडलेली असते. त्याच जुन्या वेश्या आणि तेच जुने अनुभव त्याला नकोसे वाटूं लागतात.

जर त्याला त्याच्या नेहमींच्या वेश्यागृहांत नवीन वेश्या आढळली नाहीं, तर तो दुसऱ्या वेश्यागृहाचा आश्रय घेऊं लागतो. आणि म्हणूनच, गिऱ्हाइकांनीं सतत आपल्याच वेश्यागृहांकडे येत रहावें व गिऱ्हाइकांची

" नव्या " ची गरज वा भूक शमविण्याकरतां वेश्यागृहांचे चालक " जुना माल " काढून त्या ठिकाणीं " नव्या माला " ची भरती करूं लागतात. हें भरतीचें काम हप्त्याहप्त्यानें चालू असतें.

सतत नवीन वेश्या वेश्यागृहांत दाखल करणें, हा जणूं व्यवस्थितरीत्या व्यवसाय करणाऱ्या वेश्यागृहाचा अलिखित नियमच ठरला आहे.

गिऱ्हाईक जेव्हां " नवनवीन " वेश्यांची मागणी करूं लागतें तेव्हां त्यामागें आणखी एक कारण दडलेलें असतें हें विसरून चालणार नाहीं. आपल्याच जातींतील स्त्रियांशीं विवाह करणें पुरुषास आवडतें हें खरें आहे व त्यांच्याच पंथांतील वा वर्णांतील स्त्रियांशीं पुरुष विवाहबद्ध होतात. पण हेंहि तितकेंच खरें आहे कीं पुरुषवर्ग इतर वर्णांतील व इतर जातींतील किंवा इतर राष्ट्रांतील स्त्रियांशीं शक्य झाल्यास समागमक्रीडा उरकतात. त्यांना तें देखील फारच आवडतें.

स्त्रियांवर प्रभुत्व मिळविण्याची पुरुषांची हांव असते. येवढेंच नव्हे तर स्वतःच्या विविध लैंगिक अनुभवाविषयीं पुरुषवर्ग अभिमान बाळगून असतो व प्रसंग आलाच तर त्याविषयीं तितकाच अभिमान प्रकट करून तो शेखी मिरवूं लागतो. खालील आशयाचे उद्गार काढण्यांत त्याला फारच समाधान वाटूं लागतें.

" मी पंजाबी, बंगाली, कानडी, तेलगु, गुजराथी स्त्रियांशीं संबंध ठेवले आहेत. " निव्वळ आंकडेवारी सादर करण्यांत त्याला विषेश आनंद प्राप्त होत नाहीं. ( उदा : मी ५, ४, ८, १६ किंवा ३२ स्त्रियांशीं संबंध ठेवलें आहेत. ) सुरवातीचे उद्गार काढतांना त्याला त्याच्या पौरुषत्वाचा अभिमान वाटत असतो. पण त्या बिचाऱ्यानें या सर्व स्त्रियांशीं केवळ वेश्यागृहांतच संबंध प्रस्थापित केलेले असतात; याची त्याला खंत वाटत नाहीं.

अशा प्रकारच्या गिऱ्हाइकांकरतांच स्त्रिया पळविणारी टोळी अस्तित्वांत आली आहे आणि तें त्यांचें कार्य ते हल्लीं चोख बजावीत आहेत. गिऱ्हाइकांस जर वेगवेगळ्या देशांतील आणि वेगवेगळ्या शरीरसौष्ठवाच्या स्त्रिया हव्या असतील तर त्याचा फायदा टोळीवाले उचलल्याखेरीज रहात नाहींत.

ग्रंथ ३०७१० वि: नों: दि: क्रमांक

पाश्चात्य देशांतील हे टोळीवाले हें दक्षतेनें पहातात कीं गांवांतील वेश्यागृहें, इतर शहरांतील वेश्यागृहें, एवढेंच नव्हे तर इतर राष्ट्रांतील वेश्यागृहेंदेखील 'नव्या माला' नें पुरेपूर भरलेलीं आहेत. त्यांत कुठें कमतरता व न्यूनता आढळली कीं ते त्याची लगेच योग्य ती व्यवस्था करूं लागतात. अशा रीतीनें ही टोळी तिचें कार्य करीत असते व गांवागांवातील गिऱ्हाइकांस नवनवीन चेहेरे वेश्यागृहांत नेहमीं पहावयास मिळतात.

स्त्रियांच्या शरीराचा व्यापार करणाऱ्या या आंतर्राष्टीय टोळींतील लोकांस त्यांच्या धंद्याची पूर्ण आणि स्वच्छ कल्पना आहे. कुठलें 'मार्केट' कसें किफायतशीर आहे हें ते पूर्णतया जाणून असतात. बहुतेक राष्ट्रांत स्त्रियांची संख्या पुरुषांपेक्षां अधिक आहे हें त्यांना ठाऊक आहे. पण या भूतलावर आणखी अनेक प्रदेश असे आहेत की जेथें मुलींपेक्षां वयांत आलेल्या तरुणांची संख्या अधिक आहे.

अशा विभागांत साहजिकच स्त्रियांची मागणी फारच मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते. आणि तेथें फायदाहि चांगला होतो. पण अशा ठिकाणीं स्त्रिया रवाना करतांना, ज्या ठिकाणीं स्त्रियांची संख्या अधिक आहे अशा प्रदेशांतून स्त्रियांस पळवून नेण्याची खबरदारी बाळगण्यांत येते.

त्याशिवाय नेहमीं ज्या ठिकाणीं प्रवाशांची गर्दी असते अशा प्रदेशांत व नाविक व वैमानिक दलांतील सैनिक ज्या ठिकाणीं वस्ती करून राहिले आहेत वा मोठें बांधकाम ज्या ठिकाणीं चालू असतें. अशा ठिकाणीं वेश्यांची रवानगी करण्यांत येते. अशा स्थळांस 'स्पॉट मार्केट' म्हणतात. उदाहरणार्थ, १९५१ मध्यें इंग्लंडमध्यें साजरा झालेला 'फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन' व १९५३ मधील इंग्लंडच्या राणीचा राज्याभिषेक या वेळीं तेथें वेश्यांची फारच मोठ्या प्रमाणावर मागणी होती. आणि स्कॉटलंट यार्डच्या अधिकाऱ्यांची तमा न बाळगतां फ्रेंच व जर्मन वेश्यांच्या दलालांनी या मागणीचा भरपूर प्रमाणांत पुरवठा केला.

कॅसाब्लान्का येथें अमेरिकन देखरेखीखालीं अनेक मोठमोठीं बांधकामें चालू असून, त्यांचा कामगारवर्ग, वैमानिक आणि एंजिनियर्स यांच्याकरतांहि तेथें प्रचंड प्रमाणांत वेश्या टोळीमार्फत पुरविण्यांत येतात. त्याशिवाय ज्या ज्या ठिकाणीं अमेरिकन सैनिक, वैमानिक व खलाशी आहेत,

(उदा० जर्मनी, जपान, फ्रेंच मोरोक्को, नेपल्स, ट्रिएस्ट इत्यादि) त्या त्या ठिकाणीं अनैतिक व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया तावडतोब गोळा होऊं लागतात. त्यापैकीं कांहीं स्त्रिया स्वतंत्रपणेंच व्यवसाय करीत असतात हें खरें आहे. पण त्यांतील अनेक स्त्रिया पांढऱ्या कातडीच्या स्त्रियांचा व्यापार करणाऱ्या टोळीवाल्यामार्फतच तेथें दाखल झालेल्या असतात.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान या व्यवसायानें प्रचंड स्वरूप धारण केलें आहे. एकेकाळीं युरोपपासून ते दक्षिण अमेरिकेपर्यंत टोळीवाल्यांचे हात पोहोंचले होते. उत्तर आफ्रिका व अतिपूर्वेकडील प्रदेशांतहि लहानशी शाखा पोहोंचली होती. पण हल्लीं मात्र परिस्थिती अगदीं उलट आहे. दुसऱ्या महायुद्धापासून दक्षिण अमेरिकेंतील व्यवसाय खालावत गेला. पण उत्तर अफ्रिकेंतील व्यवसाय मात्र फोंफावला. आज त्यांचें फाजिल महत्त्व वाढलें आहे.

त्याचीं अनेक कारणें आहेत. १९२० सालीं दक्षिण अमेरिकेंत वेश्या पुरविणारास जी कमाई होत असे ती हल्लीं होत नाहीं. १९१४–१९१८ च्या युद्धांत या राष्ट्रांतील लोकांनीं खूप संपत्ति मिळवली होती, पण दुसऱ्या महायुद्धांत मात्र त्यांना आर्थिकदृष्टचा कांहीं फायदा झाला नाहीं. उलट त्यांना नुकसानींतच जावें लागलें.

उत्तर अफ्रिकेंत व मध्यपूर्वेंत आज आर्थिकदृष्टचा परिस्थिती अजिबात पालटली असून तेथील लोक खूप श्रीमंत होऊं लागले आहेत. अगणित संपत्ति मिळविण्याची त्यांना आतां संधी प्राप्त झाली आहे. कारण अरेबियांतील तेलाच्या खाणी तेलानें फारच समृद्ध असून, तेथें अमेरिकन भांडवल गुंतलेलें आहे. शिवाय टँजियरला हल्लीं जगांतील आर्थिक देवाण–घेवाणीचें मध्यवर्ति स्थान लाभलें आहे. आणि जेथें चलन जादा होऊं लागतें तेथें वेश्यांची संख्या वाढूं लागते. आणि वेश्या व्यवसायाकरितां स्त्रिया कशा हस्तगत कराव्या याचा टोळीवाल्यांस विचार करावा लागतो.

दुसऱ्या महायुद्धापूर्वी ‘ब्यूनॉस आयर्स’ हा दक्षिण अमेरिकेंतील प्रदेश वेश्याव्यवसायाकरितां जगद्विख्यात ठरला होता. तेथूनच स्त्रियांची इतरत्र रवानगी होत असे. संघटितरीत्या काम करणारे ‘गँगस्टर’ लोक व त्यांना लाभलेला भरपूर आर्थिक पाठिंबा यामुळें त्यांना फ्रान्स, इटाली, पोलंड आणि

बाल्कन प्रदेशांतून स्त्रियांची शिकार करून स्त्रिया मिळविणें जड जात नसे. दक्षिण अमेरिकेंत सर्वत्र वेश्याव्यवसायाकरितां नवनवीन स्त्रियांची तीव्रतेनें आवश्यकता भासूं लागली कीं त्यांना ब्यूनॉस आयर्समधून स्त्रियांचा पुरवठा होत असे.

अर्जेंटीन सरकार त्यावेळीं आर्थिक दृष्टया डबघाईस आलें होतें. इतर राष्ट्रांत (उदा० फ्रान्स व अमेरिका) वेश्याव्यवसायास कायद्यान्वयें बंदी करण्यांत येत असतांना अर्जेंटिनांत मात्र या व्यवसायाचें संरक्षण करण्याची कामगिरी करण्यांत येऊं लागली.

आणि मग ही सर्व परिस्थिती अर्जेंटिनांतील पोलीस अधिकारी ज्युलियो आल्सोगारे यानें उघडकीस आणली. ब्युनॉस आयर्सचा प्रमुख पोलिस अधिकारी या नात्यानें त्यानें जी कामगिरी केली ती वाखाणण्याजोगी होती. शहरांतील संघटितरीत्या काम करणाऱ्या वेश्याव्यवसायाच्या चालकांच्या टोळीचें उच्चाटन करण्याचा त्यानें चंग बांधला व अगदीं खोलात शिरून त्यानें चालकांचें गुप्तकृत्य उघडकीस आणलें. पण त्यामुळें त्याला अखेर त्याच्या जागेचा राजीनाला देणें भाग पडलें.

सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यानें १९३० मध्यें ' ल प्रॉस्टीटयूशन एन् अर्जेंटिना ' हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें. त्यावरून असें सिद्ध होतें कीं ब्युनॉस आयर्समध्यें तीन वेगवेगळ्या टोळ्यांमार्फत वेश्याव्यवसाय चालविण्यांत येई. त्यांच्यावर पूर्व युरोपमधील कांहीं व्यक्तींची सत्ता चालत असे. आणि पूर्व युरोपमधून स्त्रियांची रवानगी ब्यूनॉस आयर्समध्यें करण्यांत येई. तेथें स्त्रियांस जनावरांप्रमाणें लिलावांत विकण्यांत येई.

' झ्वॉय मायग्डल ' या नांवानें ओळखली जाणारी टोळी गर्भश्रीमंत होती व ही टोळी सर्वांत मोठी टोळी होती. ' झ्वाय मायग्डल ' याचा अर्थ ' महान शक्ति ' असा होतो. त्या टोळींत जवळजवळ पोलंडमधील ४४२ ज्यू लोक होते. वेश्यागृहें चालविणाऱ्या या लोकांच्या प्रमुख व्यक्तीचें नांव सायमन ब्रुकेवीच होतें. ' झ्वॉय मायग्डल ' मार्फत १००० वेश्यागृहें चालविण्यांत येत असत, आणि त्यांत ३००० वेश्या असत.

या टोळीची प्रमुख प्रतिस्पर्धी टोळी म्हणून एका रूसो–रुमानियन टोळीकडे पहाण्यांत येत असे. या टोळीचें नांव ' आस्कीनासुम ' असें

होतें. सायमन रुबेन्स्टीन व मॉरिसियो कारो हे या टोळीचे प्रमुख चालक होते. जरी ' झ्वॉय मायग्डल ' या संस्थेंतील वेश्यांची संख्या ' आस्किनासुम ' या संस्थेंतील संख्येपेक्षां दुप्पटीनें अधिक होती, तरी रुबेन्स्टीन हाच खरा अर्जेंटिनांतील दुष्ट नायक होता. प्लाटा नदी ते मॉंटेव्हीडिओ, उराग्वे आणि ब्युनॉस आयर्स अशा रीतीनें त्यानें त्याच्या ' माला'ची वाहतुक चालू ठेवली होती.

या दोन टोळ्यांशिवाय ' व्हर्सोव्हिमी ' नांवाची तिसरी टोळीहि वेश्यागृहें चालवीत होती. अत्यंत शिस्तीनें या लोकांचें कार्य चाललें होतें. तिन्ही टोळ्यांतील वादग्रस्त प्रश्न खास निवडलेल्या लोकांमार्फत सोडविले जात असत.

टोळींतील लोकांनीं प्रमुख पोलीस अधिकाऱ्यांशीं संबंध प्रस्थापित केले होते. त्यामुळें वेश्यागृहांतील स्त्रियांस पळून जाणेंहि अशक्यप्राय ठरलें होतें. आणि एकादी वेश्या पळून गेल्यानंतर जर तिला परत पकडण्यांत आलें तर मग तिचा अनन्वितरीत्या छळ करण्यांत येई. त्याचा इतर वेश्यांवर परिणाम झाल्याखेरीज रहात नसे.

कायद्याच्या कचाटयांतून स्वतःची सुटका कशी करून घ्यावी याचें शास्त्र टोळीवाल्यांनीं आत्मसात् केलें होतें.

पण ज्युलिओ आल्सोगारे याच्या पुस्तकांनें (त्यानें त्यांत नांवनिशीवार सर्व माहिती प्रसिद्ध केली होती.) सर्वत्र खळबळ माजली. तिन्ही टोळ्या अदृश्य झाल्या. २०० हस्तकांस पकडण्यांत आलें.

ब्राझिलमध्येंहि त्यावेळीं अशीच परिस्थिती आढळून येत होती. तेथील वेश्यागृहांतील १० वेश्यांपैकीं ८ वेश्या युरोपियन राष्ट्रांतील असत.

हल्लीं दक्षिण अमेरिकेंत इतर राष्ट्रांतील वेश्यांची संख्या फारच कमी आहे. त्याला आर्थिक परिस्थिती कारणीभूत ठरली आहे. शिवाय टोळीवाल्यांचा बीमोड करण्यांत येऊन कायदेकानूहि जारी करण्यांत आले आहेत.

पण इतरत्र मात्र हा व्यवसाय फोंफावत चालला आहे. अनेक निरपराधी अल्पवयीन तरुणी, विवाहित स्त्रिया, व विधवा यांना फूस लावून या धंद्यांत खेचण्यांत येतें व ही कामगिरी पद्धतशीररीत्या व संघटितपणें चालू आहे. ठिकठिकाणीं टोळीवाल्यांचे हस्तक त्यांचें कार्य अविरतपणें करीत असून

अबला या असंख्य घाणेरड्या व्यवसायांत इच्छा नसतांना व त्याची जाणीवहि नसतांना ढकलण्यांत येत आहेत. स्त्रियांच्या शरीराची होणारी अवहेलना थांबविण्याकरितां 'लीग ऑफ नेशन्स'नें प्रयत्न केले व आतां 'युनो' प्रयत्न करीत आहे.

पण या स्त्रियांस हे हस्तक कशा प्रकारें हस्तगत करतात हें आपण पुढील प्रकरणांत पाहूं.

# २ स्त्रियांची शिकार कशी साधतात ?

वेश्यागृहें चालविणाऱ्या नराधमांचे हस्तक कशा रीतीनें स्त्रियांची व तरुणींची फसवणूक करतात हें खालील उदाहरणांवरून कळून येण्याजोगें आहे.

गरीब बिचारी म्हातारी चौकांतील कोपऱ्यांत उभी राहिली होती. पुढें जावें कीं जाऊं नये याविषयींच ती विचार करीत होती. कारण चौकांतील रहदारी वाढली होती. तरीहि ती कसेंबसें पुढें जाऊं लागली. अगदीं अनिच्छेनेंच ती पुढें सरकत होती हें तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होतें.

आणि अखेर एका तरुणीला तिची दया आली. ती तरुणी फारच देखणी होती. ती जवळ जवळ वीस वर्षांची असावी. म्हातारीनें तिच्याकडे केंविलवाण्या नजरेनें पाहिलें. तरुणीला त्या नजरेचा अर्थ कळला. हंसतच तिनें म्हातारीचा हात आपल्या हातांत घेतला व ती म्हातारीसह पुढें जाऊं लागली.

दुसऱ्या वळणावर दोघीहि थांबल्या व त्यांच्यांत किंचित् संभाषणास सुरवात झाली. म्हातारीनें तरुणीचे आभार मानले. म्हातारी बडबडत असतांनाच त्यांच्याजवळ एक मोटार येऊन उभी राहिली. गाडीचा एक दरवाजा उघडला गेला. आणि म्हातारीच्या अंगांत एकदम जोर येऊन तिनें तरुणीला गाडींत ढकललें व तिनेंहि आंत उडी मारली. काय घडलें किंवा घडत आहे याची सभोंवतालच्या लोकांस जाणीव होण्यापूर्वींच गर्दींत गाडी दिसेनाशी झाली.

स्त्रियांस पळविणारी टोळी अशा प्रकारें कार्य करीत असते. त्याशिवाय इतरहि अनेक मार्गांनी स्त्रियांस पळविण्यांत येतें. कधीं म्हातारीस 'फीट' येऊन ती खालीं पडते, तर कधीं तिचे पाय दुखूं लागतात, तर कधीं ती नाक्यावर उभी राहून भीक मागूं लागते. पण ती तिचा हेतु साधल्याशिवाय रहात नाहीं. योग्य तें भक्ष्य हातास लागलें कीं मग येन केन प्रकारेण त्याची विल्हेवाट लावण्यांत येते व वेश्यांच्या संख्येंत आणखी भर पडूं लागते.

"अमुक अमुक ठिकाणीं पत्र घेऊन जा" या हिकमतीचा तर वारंवार यशस्वी रीत्या उपयोग करून घेण्यांत येतो. एक सभ्य दिसणारी स्त्री एखाद्या तरुणीकडे जाते व अमुक अमुक ठिकाणीं हें पत्र किंवा अमुक अमुक संदेश घेऊन जा असें त्या तरुणीला विनंतीपूर्वक सांगण्यांत येतें. जर त्या मुलीनें त्या विनंतीला मान देण्याचें ठरविलें तर मग ती परतणें शक्यच नसतें. कारण ज्या ठिकाणीं तिला पाठविण्यांत येतें त्या ठिणाणीं तिच्यासाठीं सांपळा तयार ठेवण्यांत आलेला असतो. अशा रीतीनें ती वेश्यागृहांच्या चालकांच्या मगरमिठींत सांपडते.

स्त्रियांस फसविण्याकरितां स्त्री हस्तकाचाच अधिक उपयोग करून घेण्यांत येतो. कारण जगांतील बहुतेक सर्वच भागांतील पालकवर्ग "परक्या पुरुषांशीं बोलूं नकोस" अशी ताकीद मुलीला देत असतो. पण परक्या स्त्रियांशीं बोलूं नये असें अपत्यांस कधींच कोणताहि पालकवर्ग सांगत नाहीं.

झोंपेच्या गोळ्या किंवा मादक पदार्थांच्या सहाय्यानें तरुणींस गारद करण्याचें कार्यहि फारच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. अशा अनेक उदाहरणापैकीं खालील एक उदाहरण नमुनेदार आहे.

एक तरुणी चित्रपट पहात चित्रमंदिरांत बसली आहे. चित्रपट ती एकाग्रतेनें अवलोचन करीत आहे. तिच्या शेजारींच एक मध्यमवयीन स्त्री बसलेली आहे. एकाएकीं ती तरुणी किंचित् किंचाळते. तिच्या मांडीला कसलीतरी जखम होऊन त्या वेदनेनें ती अस्वस्थ झालेली असते. तेव्हां तिच्या शेजारची स्त्री तिला विचारते, "पोरी, काय झालें तुला? खुर्चीतील खिळाबिळा मांडीला लागला काय!"

त्यानंतर दोघीहि खुर्चीत अणकुचीदार खिळा आहे कीं काय हें तपासून पाहूं लागतात. त्याचवेळीं त्या तरुणीचें भान हरपलेलें असतें.

मध्यम वयांतील स्त्रीनें त्या तरुणीला गुंगी आणणारें इंजेक्शन अंधारांत बेमालुमपणें दिलेलें असतें. आणि त्याचमुळें त्या तरुणीला गाढ झोंपेच्या आधीन व्हावें लागतें.

आणि आतां परिस्थितीवर ती मध्यम वयांतील स्त्री पूर्ण कबजा मिळविते. डोअरकीपरच्या सहाय्यानें त्या तरुणीला थिएटरच्या आवारांत नेण्यांत येतें. तिथें त्या स्त्रीचा साथीदार तयार असतो. डॉक्टरच्या रूपानें तो तेथें दाखल होतो. ( जणूं कांहीं तो तेथें सहज आला आहे असें तो भासवल्याखेरीज रहात नाहीं. ) टॅक्सींतून मग त्या तरुणीस नेण्यांत येतें. ती मुलगी जेव्हां शुद्धीवर येते तेव्हां वेश्यागृहांत आपण बंदिस्त आहोंत असें तरी तिला आढळून येतें किंवा गांवापासून दूर-फार दूरच्या–ठिकाणीं आपण आलों आहोंत-याची तिला जाणीव होते.

पाश्चात्य देशांत फुटपाथवर 'कॅफे' वगैरे चालविण्यांत येतात. अशा ठिकाणीं तरुण–तरुणींचा मेळावा खाद्यपदार्थांवर ताव' मारण्याकरितां वा चहा–कोल्ड्रिंक पिण्याकरितां नेहमींच जमा होत असतो. त्याशिवाय सर्वच वयांतील व थरांतील स्त्री–पुरुष तेथें जमा होतात. अशा ठिकाणीं एखाद्या तरुण सुंदरीच्या शेजारीं एकादी परकीय पण सभ्य दिसणारी स्त्री जाऊन बसली, तर ती वेश्यागृहांच्या चालकांकरतां काम करणारी हरामखोर स्त्री आहे असें खास समजावें. अनेकदां होतें काय कीं त्या तरुणीला त्या कॅफे-मध्यें पाहिल्यानंतरच सभ्य दिसणारी स्त्री तिच्या शेजारीं जाऊन बसलेली असते असें घडत नाहीं, तर त्या तरुणीला रस्त्यांत हेरून काढून, तिचा पाठलाग करून, मगच तिला 'कॅफे' मध्यें गांठण्यांत येतें. मग हस्तक स्त्री तिच्याशीं संभाषण उकरून काढते.

एक स्त्री दुसऱ्या अनोळखी स्त्रीशीं संभाषण उकरून काढूं शकते आणि हस्तक स्त्रीशीं इतर तरुणी वा स्त्री मनमोकळेपणानें बोलूं लागली कीं मग हस्तक स्त्रीला लगेच कळून येतें कीं ज्या तरुणीची ती 'शिकार' करणार आहे ती गांवांत एकटीच रहाते काय, तिच्या आशाआकांक्षा काय आहेत, आणि 'शिकार' हाताला लागण्याजोगी असली, तर मग शिकार कुठें रहाते तेंदेखील विचारण्यांत येतें. अशा रीतीनें कांहीं मिनिटांच्या संभाष-णानेंच हस्तक स्त्रीला हवी ती माहिती मिळते आणि मग त्या शिकारीचा

नाद सोडून द्यावा कीं 'शिकार' हस्तगत करण्याचे प्रयत्न करूं लागावें याचा ती तात्काळ निर्णय घेते.

मोठ्या शहरांत, 'रस्ता विसरण्याचा' किंवा वाट चुकली असा बहाणा करणारे अनेक टॅक्सी ड्रायव्हर असतात. मोठ्या शहरांतील अनेक टॅक्सी ड्रायव्हर लोकांचीं वेश्यागृहांच्या चालकांशीं ओळख असते, व ते लोक जमेल तेव्हां या चालकांना योग्य तें सहाय्य करीत असतात. एकाद्या तरुणी-कडे एकवार नजरफेंक करूनहि त्यांना हें कळून चुकतें कीं ती तरुणी त्या गांवांत 'नवखी' आहे कीं त्या गांवांतील रहिवाशी आहे? मोठ्या शहरांत वाट चुकल्यामुळें अस्वस्थ झालेल्या 'नवख्या' तरुणी हे ड्रायव्हर लोक ताबडतोब ओळखूं शकतात.

जर त्या बाबतींत त्या ड्रायव्हरची खात्री पटली नाहीं तर सत्य हुडकून काढण्यास त्याला उशीर लागत नाहीं. ती तरुणी त्याच्या गाडींत चढल्यानंतर तो एका उपायाचा अवलंब करतो. त्या तरुणीनें जो पत्ता दिलेला असतो त्या पत्त्यावर नजीकच्या मार्गानें न जातां दूरच्या मार्गानें जाऊं लागतो. तेव्हां जर त्या तरुणीनें त्यावेळीं विरोध दर्शविला, तर ती या गांवांतीलच आहे हें ओळखून तो अमुक ठिकाणीं रहदारी बंद आहे, रस्तादुरुस्तीचें काम चालूं आहे असा बहाणा करूं लागतो. व त्या तरुणीनें जर विरोध प्रकट केला नाहीं तर ती या गावांत 'नवखी' आहे हें ओळखून तिला तो सरळ गांवांतील फॅशनेबल बंगल्यांच्या विभागाकडे घेऊन जातो नि दूरवरच्या एकाकी 'गॅरेज' मध्यें गाडी नि तरुणी यांना बंदिस्त करून ठेवण्यांत येतें योग्य वेळीं त्या तरुणीची वेश्यागृहाकडे रवानगी होते.

वेश्यागृहाच्या चालकांचे हस्तक सर्वत्र पसरलेले असतात. हॉस्पिटल-मधून 'डिसचार्ज' झालेल्या कुमारी मातेची माहिती त्यांना मिळते किंवा डॉक्टरकडून त्यानें नुकताच जिचा 'गर्भपात' केला आहे अशा तरुणीची माहितीहि कळूं शकते. पहिल्यांदांच गुन्ह्याबद्दल शिक्षा भोगून तुरुंगाबाहेर पडणाऱ्या तरुणीची माहिती तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडून कळते, आणि हॉटेलच्या वेटरकडून 'होतकरू' तरुणीची माहिती मिळते. शिवाय 'ब्यूटी-पार्लर,' 'ड्रेस-शॉप' इत्यादि ठिकाणांहून या हस्तकांस शिकारीचा सुगावा लागतो.

वर्तमानपत्रांतील फसव्या जाहिरातीनींहि तरुणींस फसविण्यांत येतें. या मार्गानें अनेक अबलांची वेश्यागृहांत रवानगी करण्यांत आली आहे. अनेक युरोपियन राष्ट्रांतील तरुण-तरुणी जाहिरातींच्या सहाय्यानें एकमेकांशीं ओळख करून घेतात आणि टोळीवाल्यांनीं नेमका त्याचाच फायदा उचलला आहे. टोळीवाले भरपूर जाहिरात करतात आणि त्याचा त्यांना फायदाहि होतो.

सेक्रेटरी किंवा स्वयंपाकीण बाईची आवश्यकता आहे अशी फसवी जाहिरात करण्यांत येते. किंवा श्रीमंत विधवेस प्रवासांत सोबतीण पाहिजे अशी जाहिरात वाचल्यानंतर कुठल्या गरीब तरुणीचें मन अस्वस्थ होणार नाही ? किंवा राजघराण्यांतील कुटुंबियांच्या अपत्यांवर देखरेख ठेवणारी बाई वा शिक्षकीण पाहिजे ही जाहिरातसुद्धां तरुणींच्या मनाला भुरळ पाडणारी आहे.

मोरोक्को, अल्जेरिया किंवा इंडोचायना येथें 'फ्रेंच फॉरीन लीजन' मध्यें काम करणाऱ्या सैनिकांची तरुणींशीं पत्रव्यवहार करणाची इच्छा आहे, अशा अर्थाची जाहिरात जर्मन दैनिकांतून वारंवार प्रसिद्ध होत असते. त्यांतील कांहीं जाहिराती खऱ्याहि असतील, पण टोळीवाल्यांमार्फतच अनेकदां अशा जाहिराती वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत असतात.

या जाहिरातींतील "फसवी" जाहिरात कोणती व खरी जाहिरात कोणती हें कळेनासें झाल्यानें व खरें व खोटें, अशा प्रकारें एकमेकांत मिसळल्यानें टोळीवाल्यांचा फायदा झाला आहे. संशयास्पद जाहिरातीचा सुगावा लावण्याचें काम कांहीं नियतकालिकें करीत असलीं, तरी टोळीवाल्यांच्या हरप्रकारच्या जाहिराती बंद करण्याचे मार्ग उपलब्ध नाहींत. कारण नियतकालिकें जाहिराती प्रसिद्ध करण्याचेंहि कार्य करीत असतात नि जाहिराती नको म्हणण्याचें धाष्टर्य कुठलें नियतकालिक करणार ?

"डान्सहॉल" हें एक स्थळ वेश्यागृहांच्या दलालांकरितां उपयुक्त ठरलें आहे. नेहमींच त्या डान्सहॉलमध्यें येणारी तरुणी म्हणजे मौजमजेला आसुसलेली तरुणी होय नि दलाल त्याचें सावज हेरल्याखेरीज रहात नाहीं. ओळख, स्नेह, प्रेम, पलायन अशा मार्गांतून ही दुक्कल पुढें सरकते व एके

दिवशीं दलालाच्या हिकमतीनें ती तरुणी अजाणतेपणानेंच वेश्यागृहांत कायमचीच बंदिवान होते.

मादक पदार्थांचें सेवन करण्याची संवय झालेली तरुणी म्हणजे वेश्यागृहांतील भावी वेश्या होय. ज्या तरुणाकडून तिला मादक पदार्थ मिळतात, त्यानें तिला संवय जडल्यानंतर जर मादक पदार्थ पुरविले नाहींत तर ती तो सांगेल तें कार्य करण्यास तयार होते. आणि मग देहविक्रय करण्यासहि ती कबूल होते.

परराष्ट्रांतील श्रीमंत तरुण विवाहोत्सुक आहे, अशी जाहिरात पाहिल्यानंतर एखाद्या तरुणीनें त्याच्याशीं पत्रव्यवहारास सुरवात करून अखेर ती त्या राष्ट्राच्या किनाऱ्यावर दाखल झाली कीं दलाल तिचें स्वागत करून तिची सरळ वेश्यागृहांत रवानगी करतात.

# ३ सायप्रस आणि खार्टुमचा खुला व्यापार

कांहीं वर्षांपूर्वी विल्हेल्मा पॉलक या २३ वर्षांच्या जर्मन तरुणीनें एका " डान्सिग पार्टीमध्यें प्रवेश मिळविला. डान्सिग पार्टी पौर्वात्य देशांत कार्यक्रम करण्यास ब्रिमेनहून रवाना झाली. पण " पार्टी "तील लोक जेव्हां सायप्रसला जाऊन पोहोंचले तेव्हां " डान्सिग पार्टी " च्या चालकांविषयीं तिला संशय आला व तिनें त्यापुढें प्रवास करण्याचें नाकारून " पार्टी " मोडकळीस आणली.

तेव्हां पॉलक, एरिका स्कुल्झ नांवाच्या तरुणीसह विमानांतून कैरोला गेली. तेथून या दोन तरुणींनी नाईल नदीच्या किनाऱ्यावरून १३५० मैल प्रवास करून सुदानची राजधानी खार्टुम येथे प्रवेश मिळविला. खार्टुममध्यें " ग्रेट ब्रिटन " नांवाचें अद्यावत् सुखसोयींनी सुसज्ज असें एक भव्य हॉटेल आहे तेथेंच त्यांच्या डान्सिग पार्टीचे कार्यक्रम होणार होते.

त्या परक्या देशांत त्यांनी लगेच त्यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वाची छाप बसवली. दोघीहि तरुण नि देखण्या होत्या व पैशाकरितां वाटेल ते करण्यास

राजी होत्या. एका मोठ्या दुकानदाराशीं एरिकानें संधान साधलें. अर्धनग्न अवस्थेंत कामोत्तेजक नृत्य करून "ग्रेट ब्रिटन" च्या गिऱ्हाइकांस खूष राखण्याचें काम पॉलक करूं लागली. गिऱ्हाईकांबरोबर मालकहि तिच्यावर खूष झाला. तिचे कार्यक्रम पहाण्यासाठीं 'ग्रेट ब्रिटन' मधील गिऱ्हाईकांची संख्या वाढूं लागली.

पॉलक तीन महिन्यांच्या करारावर त्या हॉटेलमध्यें राहिली होती. मुदत संपतांच हॉटेलमालकानें तिच्याशीं आणखी एक करार केला. त्यानें तिला परत जर्मनीस पाठविलें व तेथून नवीन तरुण नर्तिका खार्टुममध्यें आणण्याची कामगिरी पॉलकवर सोंपविण्यांत आली. उष्णतेनें हैराण झालेल्या त्या प्रदेशांतील "कलाप्रिय" लोकांकरतां नवीन नर्तिका आणण्याची कामगिरी पॉलकनें पत्करली. तें पाहून हॉटेलचा ग्रीक मालक पागोटोस हा तिच्यावर बेहद्द खुष झाला.

नव्या नर्तिकांनी ज्या करारपत्रावर सही करावयाची असते तें करारपत्र व भरपूर नोटा घेऊन पॉलक परत जर्मनीस आली. मिळतील तितक्या मुली तिला मिळवावयाच्या होत्या.

ब्रिमेनमधील बादशाही हॉटेलमध्यें राहून पॉलक तिचें कार्य करूं लागली. तिनें वर्तमानपत्रांत जाहिराती प्रसिद्ध केल्या व ती स्वतः सर्वत्र हिंडूंफिरूं लागली. मुलींचा शोध करूं लागली. तिच्या खोलींत भिन्न भिन्न राष्ट्रांतील तरुणी जमूं लागल्या. त्यांना नग्न करून पॉलक त्यांची तपासणी करूं लागली. दूरच्या सुदान राष्ट्रांत जाण्याची संधी लाभणार म्हणून तरुणींची तिच्या खोलींत रीघ लागली.

एखाद्या सराइत धंदेवाईकाप्रमाणें पालक तिचें मुली निवडण्याचें काम करूं लागली. संपूर्ण नग्न अवस्थेंत मुलींस तपासल्यानंतर त्यांचें शरीर-सौष्ठव पसंत पडलें कीं त्यांना वेगळें निवडून ठेवूं लागली. ज्यांचें शरीर-सौष्ठव उन्मादक आहे अशा तरुणींस नाचतां–गातां आलें नाहीं तरी पॉलकला त्याची खंत वाटली नाहीं.

अशा रीतीनें मुलींची निवड झाल्यानंतर त्यांच्यापुढें करारपत्र ठेवून पॉलक तरुणींच्या सह्या गोळा करूं लागली. करारपत्र मात्र इंग्रजींत होतें. कांहीं मुलींनीं तें वाचलें. कांहीं मुलींस लिहितांवाचतांहि येत नव्हतें.

त्यापैकीं कांहीं मुली पॉलकप्रमाणेंच 'भटक्या' मनोवृत्तीच्या होत्या. त्या करारपत्रामुळें मुली सांपळ्यांत सांपडत होत्या व त्यांत पॉलकला मात्र अनेक मार्ग खुले होते.

त्या मुलीस ब्रिमेन ते रोम ट्रेनमधून व नंतर रोम ते खार्टुम विमानांतून फुकट प्रवास करावयास मिळणार होता. खार्टुममध्यें त्यांना दर आठवड्यास इजिप्शियन २५ पौंड पगार मिळणार होता. याचें त्या मुलींस आकर्षण वाटलें, पण त्याचबरोबर पुढें देहविक्रयहि करावयास लागणार आहे, याची त्यांना जाणीव नव्हती.

वास्तविक पहातां या तरुणींस पुढें पागोलाटोस याच्या हुकुमान्वयें वागावें लागणार होतें. त्याच्या करारांत सांपडलेल्या प्रत्येक तरुणीस जिवाभावानिशीं त्याच्या स्वाधीन व्हावें लागत असे.

पॉलकनें जर्मनी, ऑस्ट्रिया आणि ट्रिएस्टमधून १६ मुली गोळा केल्या. त्यापैकीं ९ खार्टुमला रवाना करण्यांत आल्या. पण ब्रिमेनमधील पोलिसांस [पॉलकच्या हालचालीचा संशय आला. त्यांनीं तिच्याविरुद्ध आघाडी उघडण्यापूर्वींच पॉलक उरलेल्या सहा तरुणींसह खार्टुमला रवाना झाली.

सायप्रस हें ब्रिटिश अंमलाखालीं असलेलें बेट आहे. युरोप थंडीकरितां प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणें तें भूकंप व वेश्यांकरितांहि प्रसिद्ध आहे. युरोपमध्यें ठगांमार्फत एका राष्ट्रांतून दुसऱ्या राष्ट्रांत जेव्हां स्त्रियांची वेश्याव्यवसायाकरितां रवानगी करण्यांत येते, तेव्हां नेहमींच मधला महत्त्वाचा मुक्काम सायप्रसमध्यें ठोकण्यांत येतो. युरोपमधून आशियांत किंवा आफ्रिकेंत स्त्रियांस गुप्तपणें पाठविण्यापूर्वीं सायप्रसमध्यें दलालांना तळ ठोकावा लागतो.

सायप्रसमधूनहि इतर राष्ट्रांतून तरुणींची मागणी करण्यांत येते व बाहेरील राष्ट्रांतून सायप्रसच्या सुंदरींची मागणी होत असते.

जर इजिप्तमधील एखाद्या 'पाशांस' त्याच्या जनानखान्यांत एकाद्या ऑस्ट्रियन ललनेची भर घालावयाची असेल तर तो 'सायप्रस' मध्यें योग्य ती ऑर्डर पाठवितो. सिरियांतील श्रीमंत व्यापाऱ्यास नवी व नव्या प्रदेशांतील शय्यासोबतीण हवी असेल तर तो सायप्रसकडे वळूं लागतो. किंवा बेरुटमधील वेश्यागृहांत 'नवीन' मालाची भरती करावयाची असेल तर जवळचें

सायप्रस बेट त्यांच्या मदतीस धांवून जातें. सायप्रसमध्यें अशी सोय नेहेमींच होते.

युरोपमधील बहुतेक सर्वच राष्ट्रांतील तरुणी नर्तिका, वेट्रेस आदि बहाण्यानें सायप्रसमध्यें गर्दी करूं लागल्या आहेत. त्यांत जर्मन तरुणींचा विशेष भरणा आहे. सायप्रसमध्यें गिऱ्हाइकांची करमणूक कशी करावी आदि कलेचें शिक्षण लाभलें कीं त्यांना बंदरानजिक किंवा उत्तर अफ्रिकेंतील वेश्यागृहांकडे रवाना करण्यांत येतें.

निकाशिया ही सायप्रसची राजधानी आहे. (लोकसंख्या, ४००००) तेथील नाईटक्लब, करमणुकीचे कार्यक्रम करणाऱ्या संस्था आदींची संख्या न्यूयॉर्कमधील तत्सम संस्थांच्या संख्येइतकीच आहे. ही संख्या वाढल्यानें आतां संस्थेचे चालक संघटितरीत्या काम करूं लागले आहेत.

पूर्वी अगदींच नीरस म्हणून गाजलेल्या सायप्रसला हल्लीं जें महत्त्व प्राप्त झालें आहे त्यामागें दुसरें एक कारण आहे.

येथील लोक निरनिराळ्या राष्ट्रांतील व जातींचे आहेत. ४,९३,००० नेटिव्ह लोकांपैकीं ८० टक्के लोक ग्रीक आहेत. त्यांना सायप्रियट्स म्हणतात. उरलेल्यांत तुर्की लोकांची संख्या अधिक आहे. १८७८ पासून ब्रिटिशांनी येथें सत्ता गाजविण्यास सुरवात केली. त्यांची संख्या फारच थोडी आहे, पण हल्लीं ती वाढीस लागली होती.

इजिप्त आणि सायप्रसमध्यें वैरभावना नांदत आहे. पण इजिप्शियन लोकहि मोठ्या संख्येनें सायप्रसमध्यें शिरूं लागले होते. जनरल नगीबनें राजा फरुकला हांकून लावण्यापूर्वी त्याचे ७८०० गर्भश्रीमंत व षोकीन प्रजाजन सायप्रसमधें मजा लुटीत होते. पण हल्लींच्या गर्भश्रीमंत लोकांना सायप्रसमध्यें पूर्वींप्रमाणें मन चाहेल तेव्हां जातां येत नसल्यानें घरबसल्या त्यांना सायप्रसमधील मुली मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.

सायप्रसमधील वेश्यागृहांचे चालक किंवा टोळ्यांचे प्रमुख मुख्यतः हंगेरियन राष्ट्रांतील आहेत, असें आढळून आलें आहे. अलेक्झांडर गेबॉर, लेस्ली हेजेड्युस, एच. अवरामिडस – पिटर या नांवानीं ते परिचित आहेत. वेश्यागृहांत सदोदित नाविन्यपूर्ण आकर्षण निर्माण करण्यांत ते जसे वाकबगार

व लोकप्रिय ठरलें आहेत तसेंच वेश्यागृहांच्या विस्तृत संख्येबद्दलहि सायप्रस ख्यातनाम आहे.

## इटाली आणि फ्रान्सच्या वारांगना

उत्तर युरोपमधील लोकांस, विशेषत: जर्मन आणि स्कॅन्डिनेव्हियन रहिवाशांस, गेलीं शेंकडों वर्षें इटालीचें कांहीं आगळेंच आकर्षण वाटत आलें आहे.

उत्तरेकडील प्रदेशांत धुकें, पाऊस, थंडी आहे, तर इटाली स्वच्छंदी सूर्यप्रकाशाकरितां ख्यातनाम आहे. संत्रीं–मुसंब्यांनीं बहरलेला हा प्रदेश इटालियनांव्यतिरिक्त लोकांस स्वप्नभूमीच वाटूं लागतो.

दक्षिण युरोपांतील या उष्ण प्रदेशाच्या आकर्षणानें युरोपच्या इतिहासांत अनेक महत्वपूर्ण घटना घडल्या आहेत. अनेक परकीय राष्ट्रांनीं इटालीवर स्वाऱ्या केल्या आहेत, तेथें लुटमार केली आहे नि तेथील स्त्रिया पळवून नेण्यांत आल्या आहेत.

पुरुषवर्गास इटालीचें जितकें आकर्षण वाटतें, तितकेंच इटालीचें आकर्षण स्त्रियांसहि वाटतें. 'आपण दोघें मिळून इटालीस पळून जाऊं या का ?' असें कुठल्याहि जर्मन तरुणीस विचारलें तर ती तत्काळ राजी झाल्याखेरीज रहात नाहीं. व्हेनीस अथवा काप्रीला पत्नीसह मधुचंद्र साजरा करावयास गेल्यानंतर तेथील प्रसंग ती आयुष्यभर विसरणार नाहीं. असें या प्रदेशाचें अजब महत्व वाढलें आहे.

–आणि या सर्व गोष्टी विचारांत घेऊनच स्त्रियांच्या देहविक्रीवर जगणारे नराधम पुरुष त्यांचा आराखडा आंखीत असतात. शक्य होतील त्या उपायांनीं व मार्गांनीं हे लोक जर्मन तरुणींस सरहद्द ओलांडून इटालींत नेत असतात. या तरुणी एकदां इटालींत दाखल झाल्या कीं मग त्यांचा ठावठिकाणा लागणें मुष्कीलच असतें.

इटालींत इतर राष्ट्रांतील तरुणी–विशेषत: सोनेरी केसांच्या तरुणी–विशेष प्रमाणांत आढळत नाहींत हें खरें आहे. कारण येथील लोक त्यांच्याच देशांतील काळ्याभोर केसांच्या मस्तवाल तरुणी अधिक पसंत करतात. पण इटालीमार्गे इतर राष्ट्रांतील तरुणी खार्टुम, टयुनिस, कॅसाब्लांका, बेरूट आदि ठिकाणीं रवाना होतात. वेश्यांच्या रहदारीच्या मार्गावरील इटाली एक प्रमुख स्टेशन आहे.

इटालीच्या ट्रिएस्ट, जिनोआ, नेपल्स आणि ब्रिंदीशी बंदरांतून 'ब्लॉंड सिल्क' ('ब्लॉंड केसांची तरुणी) व 'कच्ची भाजी' (अल्पवयीन मुली)–(गुंडांनीं स्त्रियांचें केलेलें वर्गीकरण) जगांतील इतर विभागांत रवाना होत असते.

या 'ब्लॉंड' तरुणींचा हा प्रवास 'सहली'च्या बहाण्यानें चाललेला असतो. आणि ही सफर अखेर एकाद्या वेश्यागृहांत संपते.

ग्रीस आणि युरोपमधील इतर कांहीं राष्ट्रांप्रमाणेंच इटालींतहि सरकारी कायद्यानुसार वेश्याव्यवसाय चालतो. हा धंदा कायदेशीर नव्हे, पण वेश्याव्यवसायाला राष्ट्रांत बंदी नाहीं, असा इटालियन अधिकारी या व्यवसायाविषयीं खुलासा करतात.

पश्चिम युरोपांत कोठेंहि आढळणार नाहीं इतका इटालींत वेश्याव्यवसाय फोंफावला आहे. केवळ पोर्तुगालशींच इटाली याबाबतींत स्पर्धा करूं शकत नाहीं. कारण पोर्तुगाल हें तर वेश्याव्यवसायाचें माहेरघर आहे.

सरकारी अहवालावरून असें शाबीत होतें कीं १९५० मध्यें ७१५ परवाना असलेलीं वेश्यागृहें होतीं व त्यांत ४५०० वेश्या होत्या. पण बिगरपरवाना व्यवसाय करणाऱ्या तर हजारों वेश्या त्या काळीं होत्या हेंदेखील अधिकारीवर्ग कबूल करतो.

१९५२ मध्यें 'युनायटेड नेशन्स'ला इटालीनें त्या राष्ट्रांतील वेश्याव्यवसायासंबंधीं खालील अहवाल सादर केला :—

अटक करण्यांत आलेल्या वेश्यांची संख्या——९६,६६७.
गुप्तरोगानीं पछाडलेल्या वेश्या——————१८,८७२
स्वदेशीं रवाना करण्यांत आलेल्या वेश्या——१०,७८०
शिक्षणार्थ रवानगी करण्यांत आलेल्या वेश्या–– ३,८०१
कोर्टीत दाखल करण्यांत आलेल्या वेश्या——– ६,८१२.

ही आंकडेवारी नजर विस्फारणारी आहे, यांत कांहींच शंका नाहीं. ज्यांना पकडण्यांत आलें अशा बिगरपरवाना व्यवसाय करणाऱ्या तरुणींची संख्या नजरेंसमोर धरली तर, ज्यांना अटक करण्यांत आली नाहीं अशा वेश्यांची संख्या त्यापेक्षां दुपटीनें वा तिपटीनें अधिक असण्याचा संभव आहे. त्याशिवाय ' स्वदेशीं ' किंवा ' मायदेशीं ' रवाना करण्यांत आलेल्या १०,७८० वेश्यांवरून हें शाबीत होतें कीं वेश्याव्यवसायाची रहदारी इटालींत मोठ्या प्रमाणावर चालू आहे. ' त्यांना ' स्वदेशीं ' रवाना करण्यांत आलें ' असें जरी अहवालांत म्हटलें असलें तरी त्याच वेश्यांना इटालींतून इतर अधिक फायदेशीर ठिकाणीं रवाना करण्यांत आलें नसेल कशावरून ?

आज इटालींत जगांतील अत्यंत खुनशी बुद्धीचा गुन्हेगार हयात आहे. त्याचें नांव ' लकी लुसियानो ' असून अमेरिकेंत त्यानें मादक पदार्थांची विक्री करून व वेश्यागृहांचें अधिपत्य मिळवून ' माफिया ' नांवाची टोळी नांवारूपास आणली होती. अमेरिकेंतून अखेर त्याची हकालपट्टी होऊन तो मायदेशांत–इटालींत-राहूं लागला आहे. राल्फ लिगुरी आणि जो पिसी हे त्याचे सहाय्यक आहेत. तेथून तो जगांत अद्यापहि ' मादक पदार्थ ' रवाना करीत असून वेश्यांवरहि त्याची करडी नजर आहेच. त्याच्या सहकाऱ्यांच्या हातांतच हल्लीं सत्ता खेळत आहे.

राल्फ लिगुरीनें मात्र स्वतःस संपूर्णतया वेश्याव्यवसायांत गुरफटून घेतलें आहे. अमेरिकेंत त्याचा ' राल्फ दी पिंप ' असा उल्लेख करण्यांत येत असे. रोममध्यें त्याच्या मालकीचीं वेश्यागृहें आहेत. त्यांपैकीं एक स्थळ ' नाईट क्लब ' म्हणून चालविण्यांत येत आहे व त्या क्लबाचें नांव ' ग्रोटा डेल पिशॉन ' ( कबुतर–निवास ) असें आहे. नांवहि समर्पक असेंच आहे.

लकी ल्युसियानोचा न्यूयॉर्कमधील दुसरा सहकारी जो पिसी यास इटालींत अनेकदां ' मादक पदार्थांचा ' व्यापार केल्याबद्दल व वेश्याव्यवसायांत तरुणींस बळजबरीनें ढकलल्याबद्दल अटक करण्यांत आली असून त्यानें कारावासाची शिक्षाहि भोगली आहे.

पासपोर्टशिवाय स्त्री–पुरुषांस बोटींतून दक्षिण अमेरिका, कॅनडा आणि कधीं कधीं अमेरिकेंतहि रवाना करण्याची कामगिरी तो करीत असतो. त्याकरितां तो जबर ' फी आकारतो. स्त्रियांना मात्र पैसे द्यावे

लागत नाहींत. अन्य मार्गानेंच त्यांना मोबदला चुकवावा लागतो. स्वदेशांत उपासमार, गरीबी व हालअपेष्टा सहन करून अखेर परदेशांत जाऊन वेश्याव्यवसाय करण्यास स्त्रिया तयार होतात. कित्येकदां त्यांना हा व्यवसाय फायदेशीर ठरतो.

अमेरिका हादरून सोडणाऱ्या 'मफिया' टोळीचें बस्तान हल्लीं सिसिली आणि कॅलाब्रिया येथें बसविण्यांत आलें आहे जो पिसीच्या हालचालींना आळा घालण्याकरितांच सिनोरा मर्लिन हिनें (त्याचीच प्रतिकृती नंतर फ्रान्समध्यें घडली.) वेश्याव्यवसायाला कायद्यानें बंदी करण्याकरितां प्रयत्न केला. पण अनेक 'कॅसिनों' त ज्यांचे हितसंबंध गुंतले होते अशा लोकांनीं या चळवळीस कडकडून विरोध केला.

१९५३ मध्यें सॅलेर्नोचा मेयर अदृश्य झाला. त्याची शोधाशोध चालू झाली. अखेर असें उघडकीस आलें कीं स्वत: मेयरनें मादक पदार्थांच्या व वेश्या-व्यवसायाच्या बळावर लाखों रुपये जमविले होते व ती संपत्ति देऊन तो 'अदृश्य' पावला होता. ज्या ठिकाणीं मेयर स्वत:च अशा हीन व गलिच्छ व्यवसायांत भाग घेतो तेथील व्यवसायानें किती उग्र स्वरूप धारण केलें असेल हें त्यावरून सहन कळून येण्याजोगें आहे.

मात्र फ्रान्समधील परिस्थिती फार वेगळी आहे. अनेक शतकें तेथील वेश्या व्यवसायाला एकाद्या राष्ट्रीय 'संस्थे' चें महत्व प्राप्त झालें होतें. आणि मग १७९० मध्यें एका फ्रेंच इसमास एक नवी कल्पना सुचली. त्या फ्रेंच इसमाचें नांव रस्तीक द् ला ब्रेतोन असून उघड्यानें वावरणाऱ्या वेश्यांवर खास पोलिसांची देखरेख असावी असें त्यानें सुचविलें. या पोलीस दलाचें नांव 'पोलीस दा मौर्स' असें ठेवण्यांत आलें. आणि फ्रान्समध्येंच प्रथम वेश्यांस कायद्यान्वयें व्यवसाय करण्याची मुभा १८०२ पासून मिळाली. त्यानंतरच इतर राष्ट्रांत या पद्धतीचें अनुकरण करण्यांत आलें.

–पण या खास पोलिसदलानें मात्र वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांस छळण्याचें शास्त्र अंमलांत आणलें. वास्तविक पहातां या पोलीस दलांकडून वेश्यांस कायदेशीर संरक्षण मिळावयास पाहिजे होतें. घडलें मात्र उलट.

नव्या पद्धतीनुसार वेश्यांची अनेक प्रकारें विभागणी करण्यांत आली. त्यांतील खालील दोन प्रकार महत्वाचे होते—

(१) नांवें नोंदविलेल्या वेश्या. त्यांना 'पौल एन् कार्त'(त्याचा शब्दशः अर्थ, 'परवाना किंवा तिकिट असलेली कोंबडी' असा करावा लागेल.) असें संबोधण्यांत येऊं लागलें. आणि

(२) परवाना असलेल्या वेश्यागृहांतील वेश्या.

पहिल्या वर्गांतील स्त्रिया स्वतःकरितां नि स्वतःच्याच हिंमतीवर व्यवसाय करीत होत्या. त्यांना त्यांच्या गांवांतील प्रमुख अधिकाऱ्याकडे जाऊन नांवें नोंदवावीं लागत असत. त्याबद्दल त्यांना 'ओळखपत्र' देण्यांत येई. त्या पत्रिकेच्या आधारें त्यांना रस्त्यावरदेखील गिऱ्हाइकांस विनवणी करतां येत असे.

असें जरी असलें तरी, 'पत्रिका' जवळ आहे म्हणून पोलिसांच्या ससेमिऱ्यापासून कांहीं त्यांची सुटका होत नसे. पोलिसांचा जांच हा ठरलेलाच होता. पोलीस त्यांना मन चाहेल त्यावेळीं अटक करूं शकत होते. त्यामुळेंच अशा स्त्रियांस समाजांतून बाहेर काढल्यासारखें ठरत असे. आणि त्या खास पोलीस दलाच्या मेहेरबानीवरच जीवन जगूं शकत होत्या. अशा प्रकारें त्या खास पोलीस दलाच्या हातच्या बाहुलें बनल्या. पोलीस त्यांना दिवसांतून ठराविक वेळीं व ठराविक हमरस्त्यावरच जाण्याची परवानगी देऊं लागले, किंवा त्या प्रकारची सक्ति त्या वेश्यांवर करूं लागले. ठराविक मुदतीनंतर अशा वेश्यांस वैद्यकीय तपासणीकरितांहि जावें लागत असे. या वेश्यांकडून किरकोळ स्वरूपाचा जरी गुन्हा घडला, तरी त्यांना लगेच अटक करून 'सरकारी कायद्यान्वयें' शिक्षा ठोठावण्यांत येत असे.

या 'सरकारी कायद्या'चा अर्थ असा होता कीं तिला दंड ठोठावणें वा कारावासाची शिक्षा भोगावयास लावणें केवळ पोलीस अधिकाऱ्यांच्या कक्षेंत होतें. मॅजिस्ट्रेट तिची कैफीयत ऐकण्यास तेथें हजर नसत किंवा तिच्या वतीनें केस सादर करण्याकरितां वकीलहि नसत. ज्यांना 'पत्रिका' लाभली आहे अशा स्त्रियांकरितां घटनेंतील कायदे, 'बिल ऑफ राइट्स' इत्यादि संरक्षणाच्या बाबी नामंजूर ठरल्या होत्या.

या नव्या पद्धतीनुसार केवळ वाममार्गाला लागलेल्या स्त्रियांवरच अन्याय झाले असें नव्हे, तर वाटेंत परकीयांशीं बोलणाऱ्या कुठल्याहि स्त्रियांस पोलीस दलांकडून 'वॉर्निंग' दिल्यानंतर या स्त्रियांचें नांव 'खास रजिस्टर -'

मध्यें दाखल होऊं लागले. त्यामुळें घडलें काय कीं भुकेनें व्याकुळ होऊन वा परिस्थिती आटोक्याबाहेर गेल्यानंतर नाइलाजानें अधूनमधून देहविक्रय करणाऱ्या स्त्रियादेखील 'रजिस्टर'मध्यें नांव नोंदविलें गेल्यानें नेहमींच्याच धंदेवाइकांत जमा झाल्या.

आणि अशा प्रकारें रजिस्टरमध्यें ज्यांचें नांव नोंदविलें गेलें असेल अशा स्त्रिया दलालांच्या हातचें खेळणें बनूं लागल्या. हे दलाल केवळ गिऱ्हाइकांचेच हस्तक नसत तर पोलिसांच्या हस्तकांचेंहि ते कार्य करीत असत.

ज्यांना कुणाचेंच संरक्षण नाहीं अशा अभागिनी स्त्रिया या दलालांच्या मदतीवर विसंबून राहूं लागल्या. दलालहि स्वतःच्या फायद्याकरितां वेळ पडेल त्यावेळीं त्यांना मदत करूं लागले. पोलिसांनीं जर अशा स्त्रियांस पकडलें तर दलाल लगेच त्यांची मुक्तता करूं लागले. त्याच्या मोबदल्यांत या स्त्रियांस त्यांच्या कमाईंतील अल्पशी रक्कम स्वतः ठेवून इतर रक्कम दलालांच्या हवालीं करावी लागे. या स्त्रिया विश्रांति घेत बसत नाहींत, कार्यदक्ष आहेत नि धंदा सोडून जात नाहींत, यावर मात्र दलाल लोक बारकाईनें नजर ठेवीत असत.

दुसऱ्या वर्गांत मात्र परवाना असलेल्या वेश्यागृहांतील वेश्यांचा समावेश होई. या वेश्यागृहांस 'बंद घरें' असें संबोधण्यांत येई. पण वास्तविक पहातां तीं 'उघडीं' च असायचीं.

तत्कालीन पॅरिसमध्यें व इतर शहरांत 'भेटीचें स्थळ' म्हणून कांहीं निवासस्थानें अस्तित्वांत होतीं. हीं निवासस्थानें म्हणजे कायमचींच उघडीं अशीं वेश्यागृहें नव्हेत. कांहीं ठराविक वेश्या नि त्यांचें गिऱ्हाईक व गुप्त-रीतीनें भेटणाऱ्या प्रेमिकांचें आश्रयस्थान म्हणजे हीं निवासस्थानें होत.

युद्धापूर्वी फ्रान्समध्यें १५०० वेश्यागृहें अस्तित्वांत होतीं. त्यांत 'भेटीच्या स्थळां'चा आंकडा समाविष्ट नाहीं. पण त्यांची संख्याहि वेश्यागृहांइतकीच होती. त्यावेळीं पॅरिसमध्यें एकंदर एक लाख वेश्या होत्या. आणि फ्रान्सच्या इतर प्रांतांत चार लाख वेश्या विखुरलेल्या होत्या. म्हणजे त्यावेळीं ५ लाख वेश्या धंद्यांत होत्या.

या आंकडेवारीवरून हेंच सिद्ध होतें कीं वेश्याव्यवसाय हा फरान्सचा एक महत्वाचा व्यवसाय होता. केवळ होता म्हणणें चुकीचें ठरेल, कारण अद्यापहि हा व्यवसाय फरान्सचा एक महत्वाचा व्यवसाय आहे.

टॅंजियर या आंतरराष्ट्रीय शहरांत ( टॅंजियरवर फरेंचांचेंच वर्चस्व अधिक आहे, पण फरेंचांची सत्ता तेथें चालत नाहीं. ) फरेंच अधिकाऱ्यांनीं फ्रान्सप्रमाणेंच वेश्याव्यवसाय सरकारी अमलाखालीं आणला. पण टॅंजियर-मध्यें मात्र या गृहांची चार प्रकारें विभागणी करण्यांत आली. हें सर्व टॅक्स-करितां केलें. वेश्यागृहांचा दर्जा जितका उच्च तितका त्याच्यावर अधिक प्रमाणांत टॅक्स आकारण्यांत येई. पहिल्या दर्जाच्या गृहास १८५० फ्रॅंक कर द्यावा लागत असे.

फ्रॉन्समध्यें सरकारी अमलाखालीं वेश्याव्यवसाय १४० वर्षें चालला. या दीर्घ मुदतींत अनेक गुंडांनीं स्वहिताकरितां त्याचा फायदा उचलला. एवढेंच नव्हे तर फ्रान्सप्रमाणेंच युरोपांत इतरत्रहि या व्यवसायावर गबर झालेल्या गुंडांची पैदास झाली. अशा गुंडांची एक स्वतंत्र जातच निर्माण झाली. समाजांतील अगदीं खालच्या वर्गांतील लोक रिक्रूटिंग एजंटचें काम करून कॅफे, हॉटेल्स, बाथरूम व नाट्यगृहांत मुलींची भरती करूं लागले. त्याखेरीज एम्लॉयमेंट एजंट म्हणून एक वर्ग उदयास आला. हे लोक रिक्रू-टिंग एजंट, दलाल, मादाम आणि वेश्यागृहांचे मालक यांच्याकरितां कार्य करूं लागले. त्याखेरीज " पिंप " म्हणून काम करणारे लोकहि उदयास आले. हे एकादीच अथवा त्याहून अधिक स्त्रियांस आपल्या अधिकाराखालीं बाळगूं लागले. आणि हे " पिंप " या स्त्रियांचे प्रियकर व मित्र असल्यानें त्यांना " जिवलक मित्र " असें संबोधण्यांत येऊं लागलें.

या पिंप लोकांपेक्षां उच्च दर्जाचें म्हणून परवाना असलेलीं गृहें चाल-विणारे लोक यांचा उल्लेख होऊं लागला. त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ दर्जाचे लोक म्हणजे वेश्यांची प्रांताप्रांतांतून ने-आण करणारे लोक ठरले. त्यांना " बिग-बॉस " असें संबोधण्यांत येऊं लागलें.

या " बिग बॉस " लोकांचा इतिहास फार मनोरंजक असतो. यापैकीं कांहीं लोक पूर्वीं पिंप म्हणून काम करीत असत, किंवा वेश्यागृहांचे चालक तरी असत. त्या पद्धतीनें खूप कमाई केल्यानंतर प्रत्यक्ष देखरेखीच्या कामापासून

ते लोक निवृत्त होत असत. आणि मग हेच लोक " बिग बॉस " म्हणून आंतरराष्ट्रीय टोळींत सामील होऊन देश–परदेशांतून वेश्यांची ने–आण करूं लागले. या ' बिग बॉस ' लोकांची संख्या जरी कमी असली तरी ते महत्त्वाचें काम करीत असतात. त्यांच्याकडे विपुल संपत्ति असल्याकारणानें पिंप लोकांचें सैन्यच त्यांच्या हाताखालीं सज्ज असतें. एवढेंच नव्हे तर कधीं कधीं अनेक वेश्यागृहांवर त्यांची सत्ता चालत असते. त्यांच्या या कर्तबगारी-मुळेंच आंतरराष्ट्रीय टोळी उदयास येते, व त्याला भांडवलशाहीचें स्वरूप प्राप्त होतें. आणि सहाजिकच त्याचे धोकेहि निर्माण होतात.

हे लोक स्वतःस ' व्यापारी लोक ' म्हणवितात. पण ते नेमका कशाचा व्यापार करतात हें सांगण्याला धजत नाहींत. अनेकदां हे लोक मादक पदार्थां-चाहि व्यापार करतात. पण इतर राष्ट्रांत विखुरलेल्या त्यांच्या हस्तकांमार्फत आणि सहाय्यकांमार्फत स्त्रियांचा व्यापार मात्र आंतरराष्ट्रीय स्वरूपांत करतात. अत्यंत काळजीपूर्वक तयार केलेल्या योजनेनुसार स्त्रियांस एका देशांतून दुसऱ्या देशांत पाठविण्यांत हे लोक वाकबगार आहेत.

युरोपमधून दक्षिण अमेरिकेस ज्या कांहीं बोटी रवाना होत असत, त्यांत अर्जेंटिनांतील व्यवसायाकरितां २–३ स्त्रियांस तरी पाठविण्यांत येत असे.

फ्रान्समधील लोकांसहि हे बिग बॉस कोण आहेत हें पूर्णतया ठाऊक नाही. केवळ उच्च अधिकाऱ्यांपैकीं कांहीं लोकांसच यांची माहिती असून हें रहस्यदेखील त्यांनीं दडवून ठेवलें आहे. या बिग बॉसमध्यें एक फ्रेंच मंत्री आणि पार्लमेंटचे कांहीं सभासदहि आढळून आले होते.

वेश्यागृहांच्या चालकांचीं नांवें अधिकारी वर्गास ठाऊक आहेत. या लोकांनीं अनेक वर्षे परवाना मिळवून वेश्यागृहें चालविलीं आहेत. एवढेंच नव्हे तर या लोकांची संघटनाहि होती व त्यांचें मुख्य ऑफिस ७३ नॉत्रेदेम, एम–द नझारेत, पॅरिस येथें होतें. त्यांच्या संस्थेचें नांव ' मित्र वर्तुळ ' असें होतें. त्यांच्यामार्फत एक पत्रकहि प्रसिद्ध करण्यांत येई. त्याचें नांव ' गुलाबी चाटाडचा ' असें होतें. त्यांत फ्रान्समधील परवाना असलेल्या वेश्यागृहांची यादी समाविष्ट केली होती. या संस्थेचे हितसंबंध फार दूरवर पोहोंचलेले आहेत. त्यांचे हस्तक आहेत, बातमीदार आहेत; शिवाय पोलिस खात्यांत

त्यांचें वजनहि आहे. त्यांचा पुरस्कार करणारे कांहीं सभासद पार्लमेंटमध्यें आहेत. या लोकांनीं स्वहिताकरितां 'बॉर्डेलो ट्रस्ट' स्थापिला असून नोव्हेंबर १९३६ मध्यें वेश्यागृहांस बंदी करण्यास जी चळवळ पसरली तीविरुद्ध यांनीं झगडा दिला.

'मार्सेल जेमेट' आणि 'चार्ल्स कोलिबो' या इटालियन इसमांनी मिळून पॅरिसमध्यें १–Z–Z' नांवाचें वेश्यागृह चालविलें होतें. जेमेटनें यापूर्वींच अर्जेंटिनांत अशा प्रकारची कामगिरी केली होती. या दोन इसमांच्या पत्नी या गृहांत 'मादाम' चें काम करूं लागल्या. एवढेंच नव्हे तर मिसेस कोलिबो हिनें अलजिअर्स, ऑस्लो आणि जर्सी या बेटांवर वेश्यागृहांची स्थापना करून ती तिकडील ये–जा विमानांतून करीत असे.

१३ एप्रिल १९४६ हा दिवस फ्रान्सच्या इतिहासांत अत्यंत महत्वपूर्ण म्हटला पाहिजे. कारण त्या दिवशीं पार्लमेंटनें वेश्यागृहांस बंदी करण्याचा ठराव एकमुखानें पास केला. १४० वर्षे ज्याला सरकारी सहाय्य लाभलें होतें तो व्यवसाय बंद करण्यांत येणार होता. त्यावेळीं 'मित्र वर्तुळ' परत हिरीरीनें लढलें. वेश्यागृहें बंद करण्याची तारीख उलटली पण 'मित्र वर्तुळ' ऊर्फ 'बॉर्डेलू ट्रस्ट' नें मात्र 'गृहें' खुलीं ठेवलीं. मोठ्या शहरांतील वेश्यागृहांस गृहें बंद करण्याकरितां ६ महिन्यांचा अवधी देण्यांत आला आणि ६ महिन्यांनंतर सर्वत्र वेश्यागृहांना खरोखरच टाळें टावण्यांत आलें.

पॅरिसमधील हॉटेलांतील कांहीं खोल्या अनैतिक कार्यासाठीं उपयोगांत आणीत असत. अधिकारी वर्गांनीं अशा सहा हजार खोल्यांचा कब्जा मिळविला, व निराश्रित कुटुंबियांस तेथें रहाण्याची सोय करून दिली, 'स्फिक्स' आणि 'ऑपेरा' विभागांतील '१–Z–Z' च्या शानदार गृहांचा लिलाव करण्यांत आला आणि त्यानंतर तेथें गुप्तरोगांवर इलाज करणारे दवाखाने उघडण्यांत आले.

पण खेदाची गोष्ट म्हणजे १३ एप्रिल १९४६ च्या कायद्यानें फ्रान्समधील वेश्याव्यवसाय नष्ट पावला नाहीं. या गृहांच्या कार्यपद्धतींत कांहीं फेरबदल घडले, एवढें मात्र मान्य करावेंच लागतें. आजची फ्रेंच वेश्या रस्त्यानें हिंडण्याचें व मोठमोठ्यानें बडबडण्याचें कारण देतांना आपल्या कुत्र्याकडे बोट दाखवून त्याला हिंडवण्यास घेऊन आल्याचें सांगतें. गेयर सेंट लझारे

क्रमांक ....१३२२.... नों: दि: ......

विभागांतील एकाद्या कॅफेंत जाऊन बसणाऱ्या पुरुषाकडे आजूबाजूच्या खुर्च्यांवरील स्त्रिया अशी कांहीं नजर रोखून पाहूं लागतात कीं तो शरमेनें लाल होऊन जातो.

रस्त्यांत गिऱ्हाईक गांठणें याच्यांत वाढ झाली आहेच, आणि या स्त्रिया आतां अधिक धीट बनल्या आहेत. स्त्रियांनीं धैर्यानें आपलें कार्य करीत रहावें म्हणून बॉर्डेलू ट्रस्टहि त्यांना उत्तेजन देतात. या स्त्रियांस सूचना देण्यांत आल्या आहेत कीं शक्य होईल तितक्या माणसांस गुप्तरोगाचा प्रसाद द्यावा. अशा प्रकारें फ्रान्समध्यें हल्लीं केवळ नांवाकरितां वेश्याव्यवसाय बंद आहे. पण हा व्यवसाय पूर्वीपेक्षांहि अधिक फोंफावत चालला आहे, याची फ्रेंच लोकांसहि जाणीव आहे. इतर राष्ट्रांनीं वेश्याव्यवसायाबाबतचें धोरण आंखतांना फ्रान्सचें उदाहरण अवश्य नजरेसमोर ठेवावें.

## ५ रति-मदनाचा गगनविहार

याला विसंगती म्हणा, लबाडी म्हणा, ढोंग म्हणा किंवा आणखी कांहीं म्हणा. पण एक गोष्ट मात्र खरी आहे आणि ती म्हणजे जगांतील दोन राष्ट्रें–फ्रान्स आणि ब्रिटन–वेश्याव्यवसायाबाबत दुहेरी वर्तणूक बाळगून आहेत. स्वदेशांत एक कायदा आणि त्यांच्या अमलाखालील राष्ट्रांत दुसरा कायदा असें दुटप्पी धोरण ते बाळगून आहेत.

ब्रिटनमध्यें कायदेशीरपणें वेश्याव्यवसाय फारच अल्पकाळ चालला. १८६४ मध्यें पार्लमेंटमध्यें सादर करण्यांत आलेला कायदा परत १८८५ मध्यें पार्लमेंटबाहेर फेंकण्यांत आला. गेल्या प्रकरणांत हें नमूद केलेंच आहे कीं वेश्याव्यवसायाचा कायदा फ्रान्समध्यें १४० वर्षें चालला आणि १९४६ मध्यें त्याला समाप्ति लाभली. उत्तर आफ्रिकेंत फ्रान्सच्या अमलाखालील प्रदेशांत सरकारी कायद्यान्वयें वेश्याव्यवसाय चालतो. अल्जीअर्स, ओरान, कॉन्स्टन्टीन या ठिकाणीं मात्र फ्रान्सनें १९४६ चा वेश्याव्यवसाय-बंदीचा कायदा लागू केला नाहीं, आणि अल्जेरियामध्यें इतर स्त्रियांना

नेहमींच पळवून नेण्यांत येतें. शेजारींच मोरोक्को आणि टयुनिशिया आहेत पूर्वींचीं ह्रीं तिन्ही रानटी राष्ट्रें अद्यापि स्त्रियांची जवळजवळ गुलामगिरीच्या पद्धतीनें विक्री करून संपत्ति मिळवीत आहेत. १९४६ मध्यें फ्रान्समध्यें वेश्याव्यवसायाच्या बंदीचा कायदा अस्तित्वांत आल्यानंतर या धंद्यांतील गुंडांची टोळधाड उत्तर अफ्रिकेंतील फ्रेंचशासीत प्रदेशाकडे वळली आणि या प्रदेशांतील हा व्यवसाय फारच उग्र स्वरूप धारण करूं लागला.

गेलीं १० वर्षें तरी स्त्रियांची ने–आण या भागांत करण्यांत येत आहे. अल्जीअर्स, टँजियर आणि मराकेश आदि विभागांत गुलामगिरीची प्रथा थांबतांच फ्रेंच वेश्यागृहांचे चालक आणि मादाम यांनीं संघटितरीत्या व नियमितपणें मातृभूमींतून उत्तर अफ्रिकेंतील प्रदेशांत स्त्रियांची ने–आण करण्यास सुरवात केली.

फ्रान्स वगळल्यास कॅसाब्लँका, ( बूसबीर हें येथील आंतरराष्ट्रीय ख्यातीचें वेश्यालय आहे. ) मराकेश, आणि सिद्दी–बेल–अबिस हे फ्रेंच मोरोक्कोंतील प्रदेश आणि अल्जेरियांतील अल्जिअर्स, ओरान बोन, ब्लिदा आणि कॉन्स्टन्टीन; टयुनिसियांतील टयुनिस आणि बिझर्ट या प्रांतांत फ्रेंच वेश्याव्यवसायांतील गुंडांनी त्यांचें वर्चस्व प्रास्थापित केलें.

या प्रदेशांत स्त्रियांस कसें फसवून नेण्यांत येतें याचीं खालील तीन उदाहरणें देत आहोंत :—

उदा० १ लें :—ल्युसेट ही पॅरिसची एक देखणी तरुणी होती. पण बुद्धिमान नव्हती. ॲन्ड्रे नांवाच्या एका तरुणाबरोबर तिचे प्रेमसंबंध चालू होते. कांहीं दिवसानंतर तीं दोघेंहि विवाहाशिवायच एकत्र राहूं लागलीं. ल्युसेटपेक्षां ॲन्ड्रेलाच या जीवनांत अधिक गोडी वाटली असावी, कारण जून १९५१ मध्यें ल्युटेसनें स्वतंत्रपणें रहाण्याची इच्छा प्रदर्शित केली. "मला मास्तरणीची नोकरी मिळाली आहे." ल्युसेटनें तिच्या चकित झालेल्या प्रियकराला खुलासा केला. "मोरोक्कोच्या सुलतानाच्या मुलांस फ्रेंच शिकविण्याची कामगिरी माझ्याकडे सोंपविण्यांत आली आहे."

ॲन्ड्रेला वाटलें कीं ती थट्टा करीत आहे आणि ही गोष्ट त्यानें लपवून ठेवली नाहीं. ल्युसेटला त्याचा राग आला. आणि तिनें कागदाचा एक तुकडा त्याच्यासमोर धरला व ती म्हणाली, "मी उद्यांच येथून जाणार आहें. माझें

विमानाचें तिकीट पहावयाचें आहे का तुला ? हें पहा." त्यानंतर तिनें खोलींतील स्वतःच्या वस्तू गोळा करावयास सुरवात केली.

तिची ती अवस्था पाहून अँन्ड्रे जवळच्याच पोलीस स्टेशनकडे गेला. तो पोलीस अधिकाऱ्यास म्हणाला. "ल्युसेट वेश्याव्यवसायांतील लोकांच्या तावडींत सांपडलेली दिसते. तिला लिहितांवाचतां येत नाहीं, तरी राजघराण्यांत तिला शिक्षकिणीचें काम देण्यांत येतें, याचा अर्थ काय ?"

पोलिसांस त्याचें म्हणणें पटलें. पोलिसांनीं टेलिप्रिंटर कामास लावला आणि ल्युसेट व तिचा राजकीय वाटाड्या वेन ओलू हा कुप्रसिद्ध गुंड जेव्हां अल्जेरियांतील ओरान येथील तळावर विमानांतून उतरले तेव्हां गुप्तपोलिसांनीं दोघांसहि पकडलें.

पॅरिसमधील दुसऱ्या एका 'अमोलू' नांवाच्या इसमाकडून ल्युसेटला खरेदी केल्याचें बेन ओलूनें कबूल केलें. चौकशीअंतीं असें आढळून आलें कीं या अमोलूनें ल्युसेटला हस्तगत करण्यापूर्वीं त्याच्या दुसऱ्या व्यापारी मित्रास अशाच कांहीं 'अक्षिशित शिक्षिका' एक लाख फॅंकला एक या दरानें विकल्या होत्या.

या सर्व स्त्रियांस विमानांतून ओरान येथें पळवून नेण्यांत आलें. आणि म्हणूनच अशा प्रकारच्या विमानोड्डाणाचा 'रतिमदनाचा गगनविहार' असा उल्लेख करण्यांत येतो.

उदा० २ रें:—रू द रॉबेन्स या विभागाच्या आसपास एक मद्यालय असून कांहीं वाईट चालीच्या स्त्रिया नेहमींच तिथें जात असतात. पियर्स आणि क्लान्हेल हे पॅरिसच्या ब्रिगेड मॉन्डेनचे दोघे अधिकारी (लेफ्टनंटच्या जागेवर असलेले) यांनीं १९५१ मध्यें एक गोष्ट पाहिली. वर उल्लेखिलेल्या विभागांत अल्जेरियन्स लायसेन्स प्लेट असलेली पण अमेरिकन बनावटीची भारी किंमतीची कार उभी रहाते हें त्यांच्या निदर्शनास आलें. त्या दोघांनीं त्या गाडीवर नजर ठेवण्याचें ठरविलें. आणि त्या गाडीचा मालक कोण आहे याची माहिती अल्जेरियसकडून तारेनें मिळविली.

२२ रू द शेन या विभागांतील 'ल शबानेस' या परवाना असलेल्या वेश्यागृहाचा मालक 'गेतॉअँम्ब्रो सिनो' याची ती गाडी होती. अल्जेरियस मधील इतर कांहीं वेश्यागृहांत त्याची भागीदारी होती. एप्रिल १९५१

मध्यें 'ॲम्ब्रो सिनो' एका नवयुवतीसह विमानांतून अल्जेरियसला जाण्याच्या बेतांत होता. तेव्हां अल्जेरियन विमान तळावरील पोलीस अधिकाऱ्यास त्या बाबतींत इशारा देण्यांत आला. विमानतळावर उतरतांच त्या जोडगोळीस चौकशीकरितां अटक करण्यांत आली.

मुलीचें नांव 'सिमोन' होतें नि ती १७ वर्षांची होती. ज्यावेळीं पोलिसांनीं तिला प्रश्न विचारण्यास सुरवात केली त्या वेळीं तिची मनःस्थिति फारच बिघडलेली आहे असें पोलिसांस आढळून आलें. ती मादक पदार्थांच्या अमलाखालीं आहे असें अखेर वैद्यकीय तपासणींत उघडकीस आलें.

आणि अखेर सत्य बाहेर पडलें. सिमोनला मादक पदार्थ चारण्यांत आल्यानंतर पळवून नेऊन ॲम्ब्रो सिनोच्या गाडींत ढकलण्यांत आलें. रू द पॉनफ्यू या विभागांतील एका हॉटेलमधील एका खोलींत तिला एक रात्र बंदिस्त अवस्थेंत घालवावी लागली. पळून जाण्याचा तिनें एकदां प्रयत्न केला पण जॉर्ज डक आणि पॉल सान्टे या ठगांच्या साह्यानें ॲम्ब्रो सिनोनें तिला पकडलें. तिला परत मादक पदार्थ चारण्यांत आले आणि बळेंच एका टॅक्सींतून तिला ऑर्ली विमानतळावर नेण्यांत आलें. विमानतळावर ॲम्ब्रो सिनो यानें आपण त्या मुलीचा बाप असल्याचें सांगितलें व मुलगी आजारी असल्याचें सांगितलें. कारण ती अर्धवट गुंगींत होती.

पुढील चौकशींत असें आढळून आलें कीं वरील तिघे इसम अल्जेरियांतील वेश्यागृहांकरितां स्त्रिया मिळविण्यासाठीं पॅरिसला जात असत.

ॲम्ब्रो सिनो आणि त्याच्या टोळीला पकडण्यांत आलें. फरान्समधून अदृश्यमान् झालेल्या कांहीं स्त्रिया त्यांच्या वेश्यालयांत आढळल्या. त्या बाबतींत ल शबानिसच्या मादामलाहि अटक करण्यांत आली.

पण आश्चर्याची गोष्ट पुढेंच होती. या घटनेमागील आर्थिक उलाढालींची तपासणी केल्यावर पॅरिसमधील एका उच्च पदाधिकाऱ्याच्या मुलाचा ॲम्ब्रो सिनोच्या टोळीशीं संबंध होता असें आढळून आलें. त्या मुलासहि अटक करण्यांत आली, पण त्याचें नांव मात्र वर्तमानपत्रांतून झळकलें नाहीं.

उदा० ३ रें:––ही घटना १९५३ मध्यें घडली. पॅरिस पोलिसांस गुप्त रीत्या एक सूचना मिळाली आणि त्यानुसार त्यांनीं पॅरिसमधील रू पझेट मार्गावरील एका पांच मजली इमारतीवर धाड घातली. २५ वर्षांची

'पियरेट' ही तरुणी तिसऱ्या मजल्यावरील एका टाळेबंद खोलींत नग्न अवस्थेंत आढळली. दोन दिवस तिला उपाशी ठेवण्यांत आलें होतें आणि तिच्या शरीरावर जागोजागीं चामड्याच्या पट्ट्याच्या मारांचे व्रण उमटले होते.

चौकशींत असें आढळलें की पियरेट एका बाररूममध्यें काम करीत होती नि ती दोन मुलांची आई होती. तिथें "लुई" नांवाच्या इसमाची व तिची ओळख झाली. लुई हा वेश्यांचा दलाल होता. कांहीं दिवसांनंतर लुईनें तिला उत्तर आफ्रिकेंत चलण्यास सांगितलें. तिथें "वेश्याव्यवसाय कर." असें तो तिला म्हणाला. पण त्याच्या त्या सूचनेला तिनें नकार दिल्या-नंतर तिला बळेंच रू पक्षेट मार्गावरील इमारतींत नेण्यांत आलें. वेश्या-व्यवसायाच्या चालकांचा तिथें एक मोठा अड्डा होता. पोलिस जेव्हां त्या इमारतींत शिरले तेव्हां टोळींतील लोकांनीं स्वतःस खोलींत कोंडून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकीं पियर, चार्ल्स आणि गास्पर्ड या तिघांस पुढचें दार मोडून पकडण्यांत आलें.

हें सर्व एखाद्या कादंबरींतील प्रकरणाप्रमाणें तुम्हांस वाटेल, पण ही घटना सत्य घडलेली आहे. याच टोळीनें त्यापूर्वीं ल्युसेटच्या बहिणीला ट्यूनिसला रवाना केलें असून ती तेथें वेश्यालयांत काम करीत आहे. याच इमारतींत आढळलेल्या दुसऱ्या एका महिलेच्या बहिणीची तशीच दुर्दशा करण्यांत आली आहे.

१८८० आणि १८९० च्या सुमारास या व्यवसायांतील लोक ज्या बळजबरीच्या पद्धतीचा अवलंब करीत असत त्याचेंच अद्यापि अनुकरण केलें जात आहे असाच त्याचा अर्थ होतो.

शुद्धीवर असलेली पॅरिसची कुठलीहि वेश्या उत्तर आफ्रिकेंत स्वखुशीनें जावयास तयार होणार नाहीं. कारण पॅरिसच्या वेश्यालयांतील त्रासापेक्षां मोरोक्को किंवा अल्जेरिया येथील सोजिरांच्या वेश्यागृहांतील जाच आणि छळणूक अधिक दाहक असते हें तिला ठाऊक असतें. पण ज्या सुदैवी आहेत अशांना मात्र ऑफिसर्स आणि प्रवाशांकरितां राखून ठेवलेल्या उच्च दर्जाच्या वेश्यालयांतील जीवन आरामशीर, विलासी आणि ऐश्वर्यवान वाटल्या-खेरीज राहणार नाहीं.

पॅरिस किंवा मार्सेल्स येथील वेश्यागृहांत रहाण्याची स्त्रियांची तयारी असते. कारण या स्थळांचें आकर्षणच फार मोठें आहे. त्याकरितां तेथें जाण्यासाठीं विशेष मनधरणी करावी लागत नाहीं. तरुण, सुदृढ आणि पुरुषांच्या वर्तणुकीची जाणीव असलेल्या स्त्रियांस पॅरिसमधील वेश्यामय जीवन कांहीं अंशीं बरें वाटल्याखेरीज रहाणार नाहीं.

अल्जेरियस किंवा कॅसाब्लांका येथील खास राखीव क्वार्टरमध्यें ज्या स्त्रियांची रवानगी होते. त्या स्त्रियांची मात्र कींव करावीशी वाटते. बहुधा आडदांड मनोवृत्तीचीं गिऱ्हाइकेंच तिच्या वाट्यास येतात. कदाचित ते क्रूर मोअर असतील किंवा स्वैरपणें वागणारे आणि नेहमीं मद्याच्या नशेंत असणारे फॉरेन लिझनचे सैनिकहि असूं शकतील.

आणि म्हणूनच दुर्गंधींतील या स्त्रियांस पॅरिस स्वर्गीय वाटूं लागतें.

## ६ मोरोक्कोचा पाशा

जागतिक वेश्याव्यवसायांतील अनिष्ट प्रथा नष्ट करण्याकरितां 'यूनो' प्रयत्न करीत आहे. जर या बाबतींत यूनोला मदत करण्याची फ्रान्सची खरोखरच इच्छा असेल तर फ्रान्सनें मोराकेशच्या पाशाला तुरुंगांत डांबलें पाहिजे. कारण रहाण्याकरितां त्याला तेंच योग्य स्थान होय.

पण फ्रेंच सरकार असें कांहीं करील असें वाटत नाहीं. कारण मराकेशचा पाशा फ्रान्समध्यें फारच लोकप्रिय आहे. त्याचीं कारणेंहि तशींच प्रबळ आहेत. गेल्या महायुद्धांत त्यानें जनरल ऑगस्टेन यास १० हजार उत्कृष्ट बर्बर सैनिकांचें सहाय्य केलें होतें. त्याच्या ४० लाख टोळीवाल्यांस त्यानें अरब नॅशनॅलिस्ट पार्टीच्या बाहेर ठेवलें होतें. आणि या पार्टीला उत्तेजन देणाऱ्या सुलतानाविरुद्ध बंड पुकारून त्याला हद्दीबाहेर केलें.

सुलतानाला मोरोक्कोबाहेर घालविणाऱ्या या पाशाचें वर्चस्व हल्लीं फारच वाढलें आहे. पण फ्रेंच रेसिडेन्टचें त्याच्यावर वर्चस्व चालू आहे हेंहि तितकेंच खरें आहे. वेश्याव्यवसायाकरितां मोरोक्कोंत स्त्रियांची जी ने-आण

करण्यांत येते त्या धंद्यांतील फायद्याचा महत्वाचा वाटा या पाशाला मिळतो. हें वृत्त मात्र वर्तमानपत्रांतून कधींच झळकत नाहीं.

१९३४ मध्यें फ्रेंच बॉर्डेलू ट्रस्टच्या एका उपशाखेनें मोरोक्कोंत घरें बांधण्याचा कार्यक्रम आंखला. त्यावेळीं नव्या गृहांची तेथें खास आवश्यकता नव्हती. पण सबंध देशांत वेश्याव्यवसायाच्या सोयीकरितां व या व्यवसायाचें जाळें विणण्याकरितां घरें बांधण्याचें या संस्थेनें ठरविलें. योशीवारा अव्वल दर्जाच्या महालापासून तों त्याज्य ठरविलेल्या विभागांतील वेश्यागृहें बांधण्याची कामगिरी त्यांनीं पार पाडली.

या संस्थेचा प्रमुख स्टॉक होल्डर पाशा होता नि आहे. आज तो जगांतील अत्यंत श्रीमंत इसमांपैकीं एक आहे. पण त्यावेळीं मात्र तो त्या परिस्थितींत नव्हता. लोखंड, मँगेनीज आणि युरेनियम व कोबाल्ट खाणींचा आज तोच धनी आहे. त्याची जंगी इस्टेट तो कंगाल शेतकऱ्यांस भाड्यानें देतो पण शेतांत पिकलेला माल तो स्वतःच बाजारभावापेक्षां निम्म्या दरानें विकत घेतो. अनेक महाल आणि गेस्ट हाऊस त्याच्या मालकीचीं आहेत. ५० रखेल्यांची रहाण्याची त्यानें खास सोय केली आहे व धार्मिक नियमाप्रमाणें तो ४ विवाह करूं शकत असल्यानें त्याला ४ विवाहित पत्नीहि आहेत.

२० वर्षांपूर्वींच्या मंदीच्या काळांत पाशा कांहीं अगदींच द्रव्यहीन नव्हता पण आर्थिक अडचणींत होता. जेव्हां बॉर्डेलू ट्रस्टच्या लोकांनीं घरें बांधण्याची कल्पना त्याच्यापुढें ठेवली तेव्हां त्यानें उत्साहानेंच त्या कल्पनेचें स्वागत केलें. पण त्यावेळीं त्याच्याजवळ आवश्यक ती रक्कम नव्हती. या योजनेंत पाशानें ५ कोटी फ्रँक रक्कम गुंतवावी असें त्याला सांगण्यांत आलें. फ्रेंच अधिकाऱ्यांशीं पाशाचे संबंध चांगले होते. रेसिडेन्ट जनरलनें पाशाला हवी ती रक्कम उसनवार देण्याचें मान्य केलें. फ्रेंच पार्लमेंटमध्यें त्या बाबतींत किंचित गोंधळ माजला पण अखेर हें वादळ शमलें. पाशाला ५ कोटी फ्रँक मिळाले. ती रक्कम त्यानें बॉर्डेलू ट्रस्टच्या नव्या योजनेंत गुंतविली.

तेव्हांपासून या संस्थेनें विस्मयजनक प्रगति केली आहे. ६ हजार स्त्रिया रहातील इतकें मोठें निवासस्थान पाशाच्या मराकेशमधील खाजगीं जागेंत बांधण्यांत आलें. मेक्नेस येथेंहि तसेंच निवासस्थान बांधण्यांत आलें. कॅसाब्लँकांतील कुप्रसिद्ध बुस्बीर शहराची आकर्षक सजावट आणि वाढ करण्यांत

आली. प्रवाश्यांचें त्याचप्रमाणें देशविदेशांतील सैनिकांचें तें एक प्रमुख आकर्षण ठरलें.

पूर्वी कॅसाब्लॅकांत असें एकच कुप्रसिद्ध स्थळ होतें. पहिल्या महायुद्धानंतर भरभराटीच्या काळांत मशियर प्रॉस्पर नांवाच्या फ्रेंच इसमानें ती सबंध जागाच खरेदी केली. त्या मार्गावर वेश्या विखुरलेल्या होत्या' कांहीं दिवसांनंतर त्या मार्गास त्या मार्गाच्या मालकाचें नांवच ठेवण्यांत आलें. 'एम प्रॉस्पर' हें तें नवीन नांव. अरबांस तें नवीन नांव ठीक उच्चारतां येईना, म्हणून त्यांनीं त्या नांवांत बुस्बीर असा फरक केला. एवढेंच नव्हे तर राष्ट्रांतील सर्वच 'राखीव जागांचा' बुस्बीर असा उल्लेख करण्यांत येऊं लागला.

पाशाचा वरदहस्त लाभलेल्या या योजचा कॅसाब्लॅका, माराकेश, मेकनेस आदि ठिकाणीं अधिक विस्तारानें विकास झाला व त्यांना अनैतिक कार्याच्या मोठ्या फॅक्टरीचें स्वरूप प्राप्त झालें. हजारों स्त्रियांस त्या ठिकाणीं राबविण्यांत आलें आणि हजारों गिऱ्हाइकांची त्या ठिकाणीं सोय करण्यांत आली.

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस अमेरिकन सैनिकांनी तेथें पाय ठेवतांच धंदा अधिक फोंफावला. या स्थळांचें आकर्षण कमी होऊं नये म्हणून बॉर्डलू ट्रस्टनें त्याची जाहिरात करण्याकरितां 'मोरोक्कोचा वाटाड्या' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. १९४९ च्या आवृत्तींत १०२ नंबरच्या पानावर खालील वृत्त आढळतें.

**कॅसाब्लॅका:**—तुमच्या उजव्या बाजूस बुस्बीर आहे. हें बंद शहर आहे. भूमध्य विभागांतील हलक्या दर्जाच्या विभागापेक्षां हा भाग किती चांगला आहे पहा ! ज्यांना येथील रहिवाश्यांच्या रीतिरीवाजांची ओळख करून घ्यावयाची आहे त्यानें आंत प्रवेश करण्यास हरकत नाहीं. बुस्बीरचें प्रवेशद्वार पहिल्याच मार्गाच्या उजवीकडे आहे.

- बुस्बीरचें दुसरें नांव 'लाल शहर' असें आहे. कारण त्या भागांत नेहमीं ज्या मारामाऱ्या होतात त्यांतून हमरस्त्यावर नेहमींच जो रक्तस्त्राव होतो त्याला उद्देशून हें दुसरें नांव ठेवण्यांत आलें आहे. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांचीहि येथें नेहमीं भांडणें होत असतात.

एक गोष्ट स्मरणांत ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे फ्रेंच मोरोक्कोंतील बुस्बीरमध्यें युरोपियन स्त्रियांची संख्या जास्त नाहीं. तेथें अरब, बर्बर, न्युबियन किंवा मोरोक्कोन ज्यू जातींतील स्त्रियांचीच संख्या अधिक आहे. सहाऱ्याच्या किनाऱ्यापासून गांवठी स्त्रिया मिळविण्यांत येतात. आऊल्ड नेल नांवाच्या आदिवासी स्त्रियाहि त्यांत आहेत. त्यांना लहानपणापासूनच या धंद्याकरितां वाढविण्यांत येतें. बुस्बीरमध्यें राहून आर्थिक कमाई करून त्या जर सशक्तपणें परत आल्या तर विवाह करून राहूं शकतात किंवा त्यांना अधिकच यश लाभलें तर त्या स्वतःच मादाम बनतात.

सैनिकांकरितां करमणूकगृहें बांधून बॉर्डेलू ट्रस्टनें जपानी युशीवारा धरतीचीं विलासी गृहेंदेखील बांधलीं आहेत. युशीवारा–महल असें त्यांना संबोधण्यांत येतें. पाशाच्या मराकेशमध्यें असें एक शानदार, ऐषआरामी युशीवारा बांधण्यांत आलें आहे. पाशानें ५ कोटी फ्रँक फ्रेंच सरकारला परत केल्यानंतर हे महाल बांधण्यांत आले. मेकनीस येथेंहि असेंच एक आलिशान गृह बांधण्यांत आलें. ज्यांनीं या योजनेविरुद्ध बंड पुकारलें त्यांना बॉर्डेलू ट्रस्टनें त्या योजनेंत भागीदारी देण्याचें आमिशहि दाखविलें. फेढाला येथें १९५३ मध्यें अगदीं नव्या धर्तीचे वेश्यामहाल बांधण्यांत आले. त्याच वेळीं करोडपति पाशा फ्रान्समध्यें विश्रांति घेऊन मोरोक्कोस परतला होता. या उच्च दर्जाच्या निवासस्थानांत उच्च सैन्याधिकाऱ्यांस व प्रवाश्यांस प्रवेश मिळतो. युरोपमधील फसवणूक केलेल्या नर्तिका आणि पॅरिसमधून पळवून आणलेल्या तरुणींचा येथें चांगलाच उपयोग करून घेण्यांत येतो. आणि तरी पाशा आपण धार्मिक मनोवृत्तीचे असल्याचें जगास सांगत असतो. त्याचा चेहरा संतासारखा दिसतो खरा !

## ७ हांकेस ‘ ओ ’ देणारी–‘ कॉल गर्ल ’

अमेरिकेंतील वेश्याव्यवसायाकडेहि दुर्लक्ष करून चालणार नाहीं. लकी ल्युसीयानोनंतर तेथें मिकी जेल्फ याचा प्रादुर्भाव झाला. पण अमे-

रिकेंतील वेश्याव्यवसायाचें स्वरूप कांहीं वेगळेंच आहे. युरोपमध्यें हा व्यवसाय आंतरराष्ट्रीय टोळीमार्फत चालतो. त्याउलट अमेरिकेंतील व्यवसायी लोकांनीं अमेरिकेपुरतेंच त्यांचें कार्यक्षेत्र आंखलें आहे. त्याचें हें कारण होय कीं अमेरिका हें आकारानें फार मोठें राष्ट्र आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे अमेरिकेंत सरकारी नियंत्रणाखालीं हा व्यवसाय चालत नाहीं; पण गुप्त रीत्या मात्र हा व्यवसाय सर्वत्र चालू आहे. पूर्वीं अमेरिकेंत स्त्रियांस बळेंच या व्यवसायांत घुसविण्यांत येत असे. एवढेंच नव्हे तर परक्या राष्ट्रांतील स्त्रियांची देवाणघेवाणहि होत असे. १९०७ आणि १९०९ च्या चौकशींत असें आढळलें कीं परक्या राष्ट्रांतील स्त्रियांस अमेरिकेंत खास वेश्याव्यवसायाकरितां आणण्यांत येत आहे. पत्रव्यवहारानें त्यांची खरेदी–विक्री होत असे. या स्त्रियांचे दर प्रत्येकींमागें २ शें ते २ हजार डॉलर्स असायचे.

या उघडकीस आलेल्या प्रकरणांमुळेंच राष्ट्रांतील वेश्याव्यवसाय बंद करण्याच्या मोहिमेस सुरवात झाली. त्यानंतर १९१० मध्यें 'मान' ॲक्ट पास करण्यांत आला. त्यामुळें वेश्याव्यवसायाकरितां स्त्रियांची ने-आण करणाऱ्या लोकांवर फारच मोठा जरब बसला.

अमेरिकेंतील वेश्यागृह चालविण्याचें बंद केल्यानंतर क्लब आणि फॅक्टरीसारख्या संस्था या व्यवसायाकरितां अमेरिकेंत जिकडे तिकडे उदयास आल्या. त्यांच्यावर गुंडांचा ताबा असे आणि गुंडांवर राजकीय पुढाऱ्यांचा ताबा असे. त्यामुळें एका गृहांतून दुसऱ्या गृहांत आणि एका परगण्यांतून दुसऱ्या परगण्यांत स्त्रियांची रवानगी होऊं लागली. हे गुंड लोक 'मान' ॲक्टची परवा न करतां नमुनेदार वेश्यांस फ्लोरिडांत हिंवाळ्याच्या सुमारास पाठवूं लागले.

अमेरिकेंतील सर्व व्यवहार पद्धतशीरपणें आणि टापटिपीनें चालतो. वेश्याव्यवसायहि लौकरच त्या पद्धतीनें चालूं लागला. पोलिसांच्या धाडीविरुद्ध आणि प्रतिस्पर्ध्यांच्या झगड्यांपासून "संरक्षण" लाभावें म्हणून अमेरिकेंतील वेश्याव्यवसाय संघटित पद्धतीनें कार्य करूं लागला. युरोपमध्यें अशी परिस्थिती आढळून येत नाहीं.

१९३५ च्या सुमारास, नांवाला गुप्त रीतीनें पण वास्तविक पहातां अगदीं उघडपणें चालणाऱ्या त्या व्यवसायानें चोख व्यवस्था आणि आर्थिक कमाईच्या बाबतींत उच्चांक गांठला. न्यूयॉर्कमध्यें नीक मोन्टाना यानें गुंडांच्या टोळीची स्थापना केली. १०० मादाम आणि शेंकडों दलाल त्यांच्या हाताखालीं काम करीत होते. शहरांतल्या शहरांत स्त्रियांना एका गृहांतून दुसऱ्या गृहांत फिरविण्यांत येत असे.

शिकागोंत फि शेटी बंधूंनीं याच प्रकारच्या संघटनेची स्थापना केली. आणि हे लोक अभिमानानें म्हणत असत, " रॉकफेलरपेक्षां जास्त आमच्याकडे पैसे आहेत. " आणि या उद्‌गारांत थोडासा तथ्यांश होता.

लकी ल्यूसीयानो यानें वेश्याव्यवसाय इतक्या पद्धतशीरपणानें चालविला कीं त्याला जें महत्त्व व यश लाभलें इतकें जगांत कोणालाहि लाभलें नाहीं असें म्हणतात. त्यानें 'पंच टिकेट सिस्टीम' ही कुप्रसिद्ध पद्धत अमलांत आणली. या पद्धतीनुसार गिऱ्हाईक बाहेर गेल्यानंतर ज्या वेश्येचें तें गिऱ्हाईक असेल तिचें कार्ड मादाम 'पंच' करीत असे. एखाद्या मोठ्या सिंडिकेटप्रमाणें त्यानें त्याचें कार्य चालविलें होतें. १९३६ च्या खटल्यांत त्यानें तें कबूलहि केलें होतें.

लकीचा पाडाव झाल्यानंतर संघटित पद्धतीनें चालणाऱ्या वेश्यागृहांच्या पडत्या काळास सुरवात झाली. लकीच्या खटल्याच्या वेळीं वादवदंतांचें जें पीक माजलें त्यामुळें अमेरिकेंतील अनेक राज्यांत वेश्याविषयक कायदे जारी करण्यांत आले. त्यामुळें या गृहांस गुप्तरीत्यादेखील पोलिसांचें सहाय्य लाभलें नाहीं. अनेक गृहें बंद करण्यांत आलीं. कांहीं गृहांनीं वेश्याव्यवसाय बंद केला आणि जे कांहीं लोक हा व्यवसाय करीत होते ते लोक दूर जेथें संरक्षण लाभेल अशा ठिकाणीं व्यवसाय करूं लागले.

वेश्याव्यवसाय हा वास्तविक पहातां सभोंवतालच्या परिस्थितीनुरूप सरड्याप्रमाणें रंग बदलीत असतो. पंच–तिकिटाचा जमाना दूर सरल्यानंतर 'कॉलगर्ल'च्या जमान्यास सुरवात झाली. तिकीटगर्लप्रमाणेंच ही कॉलगर्ल-पद्धत देखील खास अमेरिकन वैशिष्ट्य होय. यांत्रिक युगाच्या प्रगतींतून या पद्धतीच्या जुळ्या बहिणींचा जन्म झाला असें कांहीं लोक म्हणतात.

टेलिफोनवरून धंदेवाईक वेश्येस ' ठराविक ठिकाणीं ये ' असा आदेश देणें ही पद्धत तशी कांहीं नवीन नव्हे. जिथें अशा धंदेवाईक स्त्रिया आहेत व ज्यांच्याकडे टेलिफोन आहेत त्यांना गिऱ्हाइकांकडून सूचना ही मिळतेच.

पण अमेरिकन कॉलगर्ल पद्धतींत मात्र एका स्त्रीस गुंतागुंतीच्या यंत्रांतील एक छोटासा भाग यापलीकडे महत्त्व नाहीं. आणि म्हणूनच कॉलगर्ल पद्धत खास अमेरिकन शोधांत समाविष्ट होते. पाश्चात्य देशांत त्याचें अनुकरण करण्यांत आलें हें खरें आहे. लंडन, पॅरिस किंवा फ्रांकफूर्ट या युरोपियन शहरांत ही पद्धत चालू असली तरी तिचें खास मूळ घराणें अमेरिकनच होय.

हॉलिवूडमध्यें एक्स्ट्रॉ कलाकारांच्या बाबतींत पूर्वींपासूनच त्यांना काम मिळवून देणाऱ्या संस्थांमार्फत जी पद्धत आखण्यांत आली आहे त्याच पद्धतीच्या धरतीवर न्यूयॉर्क, शिकागो किंवा अमेरिकेंतील इतर मोठ्या शहरांत कॉलगर्ल पद्धतीचा अवलंब करण्यांत आला आहे. सिनेकलावंतांना काम मिळवून देणाऱ्या संस्था कलावंतांचे त्या क्षेत्रांतील अनुभव, दर्जा आणि टेलिफोन नंबर यांची नोंद करीत असतात. एखाद्या चित्रपट–संस्थेस कांहीं विशिष्ट आकाराची, वजनाची आणि उंचीची नटी हवी असेल आणि कलाकारांच्या एजन्सीला कळविण्यांत आलें तर लगेच फाईलमध्यें शोधाशोध करून योग्य ती नटी शोधण्यांत येते आणि तिला फोनवर पाचारण करण्यांत येतें. या नटीस मात्र ठराविक वेळीं नियमितपणें त्यांच्या टेलिफोनजवळ हजर रहावें लागतें.

अगदीं याच पद्धतीची कॉलगर्ल सिस्टिमवाल्यांनीं उचल केली. १९५२ मध्यें मिकी जेल्फच्या खटल्यानें कॉलगर्ल पद्धतीचा अमेरिकेंत सर्वत्र गवगवा झाला. हा मिकी जेल्फ अर्धा डझन मुली घेऊन मोठमोठ्या समारंभांस किंवा पार्ट्यांस हजर रहावयाचा व त्यानेंच कॉलगर्ल पद्धतीला सुरवात केली आहे. खटल्याच्या वेळीं तो केवळ २२ वर्षांचा होता. वयाच्या २५ व्या वर्षी मार्जरिनच्या उत्पादन–क्षेत्रांतील दीड कोटी रुपयांचा मालक तो होणार होता. पण तोंपर्यंत थांबण्याची त्याची इच्छा नसावी, आणि म्हणून महिन्याकांठीं हजार रुपये खर्चासाठीं मिळावयाचे, त्याच्यावर समाधान न मानून वेश्याव्यवसायाची नवीन पद्धत शोधून खूप पैसे मिळविण्याचा त्यानें चंग बांधला. अमेरिकेंतील अत्यंत नांवाजलेल्या घराण्यांतला तो तरुण होता.

त्यामुळें अमेरिकेंतील उच्च जीवन जगणाऱ्या लोकांशीं त्याचा नेहमींच संबंध येई. त्याचा त्यानें फायदा उचलला.

पण त्याच्या छळास कंटाळून पॅट वॉर्ड या १९ वर्षांच्या सडपातळ देहयष्टीच्या तरुणीनें त्याच्याविरुद्ध बंड पुकारलें, आणि मिकीच्या कारवायांची पोलिसास जाणीव करून दिली. मिकीला अटक होऊन शिक्षा झाली.

## ८ लुईझियाना = बळजबरीचा व्यवसाय

अमेरिका:–व्यक्ति स्वातंत्र्याचा ज्या राष्ट्रांत नेहमींच " उदो उदो " करण्यांत येतो त्या राष्ट्रांत–त्या अमेरिकेंत वेश्याव्यवसायानें जें स्वरूप धारण केलें आहे तें पाहिल्यानंतर तेथें अनेक सुस्वरूप तरुणींची गुराढोरांप्रमाणें विल्हेवाट लावण्यांत आली आहे हें क्षणभर खरें वाटत नाहीं. पण खोटें आमिष दाखवून, मादक पदार्थांचें व्यसन ज्यांना जडलें आहे अशा तरुणींस बळेंच वेश्याव्यवसायाचा मार्ग दाखविण्यांत येतो. इच्छा असो वा नसो, पण या व्यवसायाच्या नरकांत सुंदरींस ढकलण्यांत येतें. अमेरिकेमधील दाक्षिणात्य विभाग नेहमींच स्त्री-जातीचा मान राखण्यांत पुढाकार घेत आला आहे. पण याच विभागांत तेथील स्त्रियांस निर्भयपणें वेश्याव्यवसायांतहि ढकलण्यांत येतें, असें आढळून आलें आहे.

एका गुन्हेगार टोळीमार्फत ही वेश्याव्यवसायाची कामगिरी पार पाडण्यांत येते. ज्या ज्या वेश्यागृहांत नवीन सुस्वरूप, देखण्या तरुणींची आवश्यकता भासत असे, त्याला वेश्यागृहांत ही टोळी नियमितपणें येन–केन प्रकारेण तरुण मुलींचा पुरवठा करीत असे. त्या तरुणींची इच्छा असो वा नसो, पण त्यांना तनुविक्रयाचा धंदा करावाच लागत असे. नाहींतर मृत्युमुखीं पडावें लागत असे.

या वेश्यागृहांस मुलींची आवश्यकता भासली कीं तेथें मोटारीनें, ट्रेनमधून, बसनें किंवा खास विमानांतूनहि मुलींची रवानगी होत असे. " ऑर्डर " पाठविली आणि रोख पैसे दाखविले कीं मग एका दिवसांत

एकादी नवयौवना दारांत येऊन उभी राहिलीच म्हणून समजा. पण त्या बिचारीस मात्र पुढील भवितव्याची तिळमात्र कल्पना नसते.

अखेर या टोळीवाल्यांचा शोध करून १२ गुन्हेगारांस पकडण्यांत आलें. या गुन्हेगारांनीं शेंकडों तरुणींस या धंद्यांत पदार्पण करावयास लावलें होतें. वेश्याव्यवसाय करणाऱ्या "मादाम" या तरुणींस विकत घेऊन कामास लावीत असत.

अखेर या तरुणींच्या कैफीयतींनी अमेरिका हादरली. कांहीं लोकांची लैंगिक भूक भागविण्याकरितां बारा गुन्हेगारांनीं तरुणींच्या तनूंची–देहाची विक्री चालविली होती. ही विक्री करतांना हे नराधम माणुसकीला पूर्णपणें विसरले होते. जेव्हां पोलिसांनीं वेश्यागृहांत प्रवेश मिळविला व तेथील पलंगावर निश्चेष्ट पडलेल्या तरुणींची जबानी ऐकली तेव्हां त्यांच्या अंगावर कांटा उभा राहिला. या तरुणींस धाकटदपटशा दाखवून या व्यवसायांत खेंचण्यांत आलें होतें. त्यांना खूष मारण्यांत आलें होतें. कातड्याच्या पट्ट्यानें त्यांना बडवून काढण्यांत आलें होतें. त्याचे व्रण त्यांच्या पाठीवर उमटलेले होते. ते पाहिल्यानंतर अरबस्तानांतील गुलामांची विक्री करणाऱ्या नराधमांची आठवण झाल्याखेरीज रहात नसे. चौकशीअंतीं असें आढळून आलें कीं अमेरिकन नवयुवतींस फसवणुकीनें वा बळजबरीनें वेश्याव्यवसायांत ढकलण्यांत येतें. मग लज्जेनें त्या मूग गिळून स्वस्थ बसतात नि त्यानंतर संवयीनें त्या निर्ढावतात. पोलिसांकडून बचावाचें आश्वासन मिळतांच या तरुणींनीं बलात्कार, बळजबरी आणि फसवणुकीच्या कथा सांगितल्या.

शाळांतून, घरांतून, ऑफिसमधून या मुलींना पळविण्यांत आलें होतें. तेथून वेश्याव्यवसायाच्या खाणींत त्यांना ढकलण्यांत आलें. या टोळीचें प्रमुख निवासस्थान न्यू इबेरियामध्यें होतें. टोळीचा प्रमुख ३५ वर्षांचा जोसेफ 'लव्हली' सॉनीयर हा होता. वेश्यागृहाची मालकीणबाई 'मादाम' ला ज्या प्रकारच्या तरुणींची आवश्यकता भासत असे त्या प्रकारच्या तरुणी गांठण्याचें काम मधली 'हस्तक' मंडळी पार पाडीत असत. हे 'हस्तक' देखणे व रूपवान असत. तरुणींवर तत्काळ छाप पाडण्यांत त्यांचा हातखंडा असे. गोड भाषणानें व प्रेमळ वागणुकीनें तरुणींस जाळ्यांत अडकविण्याची कामगिरी यांना पार पाडावी लागत असे. मुंबईंत अशी कामगिरी पार

पाडणाऱ्या तरुणांस ' छुटा मजनू ' असें संबोधण्यांत येतें. या मजनूंनीं होतकरू ललनांस प्रेमाचें, पैशाचें आमिष दाखवून वाममार्गी लावावयाचें असतें. त्याबद्दल त्यांना दर तरुणीमागें भरपूर कमिशन मिळतें. या तरुणांच्या जाळ्यांत अडकल्यानंतर मग मात्र तरुणींची या कुमार्गातून सुटका होणें अशक्यप्रायच असतें.

गिऱ्हाइकांस नेहमीं नवा चेहरा व नवें सौंदर्य हवें असतें व मागणी तसा पुरवठा करणें हें तर ' मादाम 'चें आद्य कर्तव्य ठरतें. आणि मग या धंद्यांत ज्यांना ढकलण्यांत येतें अशा तरुणींस एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशांत मोटारींतून, विमानानें वा खास बसनें सतत प्रवास करावा लागतो.

या तरुणींची जेव्हां मुलाखत घेण्यांत आली तेव्हां अनेक विस्मयजनक घटना उघडकीस आल्या. त्यामुळें त्यांना या व्यवसयांत ढकलणाऱ्या नराधमांच्या अघोर लीला जगजाहीर झाल्या. वेश्या म्हटलें कीं मजेखातर किंवा पैसे मिळविण्याचा सोपा उपाय म्हणून देहविक्रय करणाऱ्या रंगेल स्त्रिया अशीच सर्वसाधारण समजूत प्रचलित आहे. पण या तरुणींनी जेव्हां त्यांच्यावरील अत्याचारांची कैफीयत जगजाहीर केली तेव्हां वेश्यांच्या दुःखदायक जीवनाची अमेरिकन लोकांस पूर्णतया जाणीव झाली. कैफीयत सादर करतांना या तरुणी थरथर कांपत होत्या. भीतीनें त्यांची गाळण उडाली होती. चामड्याच्या पट्ट्यानें मार खाल्ल्यानें त्यांच्या अंगावर व्रण उमटले होते. सतत भीतीच्या वातावरणांत त्यांना जीवन कंठावें लागलें होतें.

डोरोथी ही अठरा वर्षांची आहे. अमेरिकेंत मोटारी ठेवण्याची खास सोय वाटेवर करण्यांत आली आहे. अशाच एका ड्राईव्हजवळ ती काम करीत होती. तिचे आईबाप हयात नाहींत. एका सोनेरी केसाच्या देखण्या तरुणीची ' मादाम'ला आवश्यकता आहे असें कळतांच एका झुट्या मजनूनें तिची ओळख करून घेतली. तो उंच, सडपातळ नि देखणा होता. त्याच्या संभाषणावर खूष होऊन डोरोथी त्याच्यासह फावल्या वेळांत सर्वत्र हिंडूं फिरूं लागली. प्रणयाच्या कलेंत तो वाकबगार होता. त्याचें त्याला खास शिक्षण लाभलें होतें. त्याच्या मोहजाळांत डोरोथी सांपडली. त्यानें तिच्याबरोबर लग्न करण्याची इच्छा प्रदर्शित करतांच ती आनंदली. तिच्या सौख्याला बहर आला. पण त्यानें त्याच्या पहिल्या पत्नीकडून घटस्फोट मिळविला

नव्हता. ही त्यांच्या विवाहांतील प्रमुख अडचण होती. कांहीं महिन्यांनंतर त्याला त्याच्या पत्नीकडून घटस्फोट मिळणार होता. पण मधल्या काळांत दोघांनीं पति-पत्नीप्रमाणें कां राहूं नये ? असे विचार त्यानें प्रदर्शित करतांच डोरोथीनें त्याच्या इच्छेपुढें मान झुकविली. ती त्याच्यासह एका खोलींत राहूं लागली. एक आठवड्यानंतर तो जेव्हां घराबाहेर पडला तेव्हां त्याचा एक मित्र खोलींत शिरला व त्यानें डोरोथीवर बलात्कार केला. डोरोथीचा भावी पति जेव्हां परतला तेव्हां तिनें त्याला घडलेलें वृत्त निवेदन केलें. तेव्हां तो खदखदून हंसूं लागला. त्याच्या मित्रानें त्याच्याजवळ माफीची याचना करून त्याला दहा डॉलर्स दिले होते, असें डोरोथीला कळलें. त्यांच्या-जवळ तर घरखर्चाकरितांहि पैसे नव्हते व त्या दहा डॉलर्सची तर त्यांना अत्यंत आवश्यकता होती. आणखी एकदां तो मित्र परतला व विरोध न करतांच डोरोथीनें त्याला शरीर अर्पण केलें. तिला त्याबद्दल तिचा भावी पति आवडूं लागला. त्यानंतर त्याचे इतर मित्र डोरोथीकडे येऊं लागले व डोरोथी खुषीनें शरीरविक्रय करूं लागली.

पण अखेर तिला त्या जीवनाचा कंटाळा आला. तिनें अश्रू गाळले व यापुढें शरीरविक्रय न करण्याचा निश्चय 'भावी पती' ला कळविला. जुनी नोकरी परत मिळविण्याचा तिचा विचार होता. तेव्हां पत्नीकडून घटस्फोट मिळाला असून आपण मधुचंद्र साजरा करण्याकरितां सफरीवर जाऊंया व वाटेंत धर्मगुरूकडून विवाह उरकूं या असें त्यानें तिला सांगितलें. तिनें त्याला संमती दिली. दुसऱ्या दिवशीं दुपारीं तीं दोघें अलाबामा गांवाजवळील एका घरासमोर येऊन दाखल झालीं. तो तिला त्या घरांत घेऊन गेला व तें 'बोर्डिंग हाऊस' चालविणाऱ्या बाईशीं त्यानें तिची ओळख करून दिली. तिथें इतर डझनभर तरी मुली होत्या. त्याशिवाय कांहीं पुरुषमंडळीहि तिथें तिच्या दृष्टीस पडली. हें बोर्डिंग हाऊस म्हणजे वेश्यागृह आहे हें तिला कळून चुकलें. त्या ठिकाणीं न रहाण्याचा तिनें निश्चय केला पण—

तिला सर्व गोष्टी समजावून सांगण्याकरितां तो तिला वर माडीवरील खोलींत घेऊन गेला. त्या खोलींत पदार्पण करतांच त्यानें तिला हातांनीं चोप दिला. तिच्या चेहऱ्यावर थप्पडा मारल्या. ती पलंगावर पडली. त्यानें कमरेचा कातडी पट्टा काढला व त्यानें तिला ती रक्तबंबाळ होईपर्यंत चोप

दिला. ती ओरडली, किंचाळली, पण तिची हांक कोणी ऐकली नाहीं. तिच्या मदतीस कोणी धांवून आलें नाहीं.

" इच्छा असो वा नसो, पण आतां तुला हा व्यवसाय करावा लागणार आहे. " तो म्हणाला, " तुला भरपूर पैसे मिळतांच आपण आपला विवाह उरकूं या. तोंपर्यंत येथील मादाम सांगेल तसें वाग. जर तूं तिची आज्ञा ऐकली नाहींस तर मी परत येईन व असेंच पट्ट्यानें परत बडवून काढीन. याद राख, माझ्याशीं गांठ आहे. "

तो निघून गेल्यानंतर संध्याकाळीं एका गिऱ्हाइकानें तिच्या खोलींत पाऊल ठेवलें, दुसऱ्या दिवशीं सकाळीं तेथून पळून जाण्याचा तिनें प्रयत्न केला, पण तिचा बेत फसला. चलाख मादामनें तिला पकडलें व खोलींत कोंडून ठेवलें. दुपारीं तिचा प्रियकर तिच्या भेटीसाठीं आला. तिच्याशीं तो एक शब्दहि बोलला नाहीं. निमूटपणें त्यानें कमरेचा पट्टा काढला व तिला पलंगावर झोंपवून पट्ट्यानें बडवून काढलें. तिच्या पाठीवरील कपडे त्यानें फाडले. या खेपेस मात्र ती ओरडली नाहीं. किंचाळली नाहीं. तिच्या पाठीवर पट्ट्याचा मार बसत होता व ती निमूटपणें तो मार सहन करीत राहिली. पण त्यानंतर दोन दिवस तिला तळमळत पडून रहावें लागलें. आणि दोन दिवसांनंतरच तिच्या खोलींत गिऱ्हाइकांस पाठविण्यांत आलें. डोरोथीची कहाणी ही अशी आहे....

टेरेसा या तरुणीची कथाहि अशीच करुणाजनक आहे. एका लहानशा गांवांत एका फॅक्टरींत ती काम करीत होती. लोकप्रिय मासिकें व त्यांतील प्रणयरम्य कथा वाचण्याचा तिला हव्यास जडला होता. त्या कथा वाचून स्वप्नांत दंग होण्याची–मधुर स्वप्नें पहाण्याची–तिला संवय जडली होती. प्रेम वैभव, ऐश्वर्य यांच्या विचारांत तिचें मन गुरफटलें होतें. एके रात्रीं एका अनोळखी पण देखण्या तरुणानें तिला डिनरला चलण्याची विनंती केली. ती एकाकी जीवन कंठीत होती, त्यामुळें तिनें त्याच्या विनंतीला नकार दिला नाहीं. त्याच्यासह जावयास तिला भीति वाटली नाहीं. कारण तो सज्जन दिसत होता. जेवतांना मद्य प्राशन केल्यानंतर त्यानें तिला माहिती पुरवली कीं न्यू अर्लीन्स मधील चित्रकारांच्या संस्थेंत तो काम करीत आहे.

सुस्वरूप ' मॉडेल ' शोधून काढून मालकाकडे रवानगी करण्याची कामगिरी त्यानें पत्करली होती.

पाश्चात्य देशांत फोटोग्राफर्स किंवा चित्रकारांच्या समोर ' मॉडेल ' म्हणून काम करणाऱ्या नवयुवतींची संख्या भरमसाठ वाढली आहे. कधीं कधीं विवस्त्र होऊनहि त्यांना काम करावें लागतें. पण जर एकाच तरुणीचा चेहरा सतत अनेक मासिकांच्या मुखपृष्ठावर झळकूं लागला तर मग मात्र त्या तरुणीची बाजारांतील किंमत वाढूं लागते. नाटकांतून वा सिनेमांतून काम करण्याकरितांहि त्यांना पाचारण करण्यांत येतें. मॉडेलचा धंदा अशा रीतीनें कधीं कधीं किफायतशीर ठरतो. तेव्हां साहजिकच टेरेसा त्या तरुणावर भाळली व तिला ' मॉडेल ' म्हणून काम करण्याची संधी लाभल्यास ती हवीच होती. तो तरुण तिला ती संधी प्राप्त करून देईल असें तिच्या भोळयाभाबडया मनाला वाटलें. अखेर त्यानें तो विषय काढलाच. जर तिची इच्छा असेल तर तो तिला ' मॉडेल 'चें काम मिळवून देण्यास तयार होता. एवढेंच नव्हे तर त्या गांवांतून तो तिला न्यू ऑर्लीन्सलादेखील मोटारींतून घेऊन जाण्यास तयार झाला. रात्र त्याच्यासह मोटारींतून काढावी लागणार हें ती जाणून होती, पण ' मॉडेलचा ' व्यवसाय पत्करण्यासाठीं ती तें दिव्य करण्यास तयार होती.

आणि मग डोरोथीच्या जीवनांत जें घडलें तेंच टेरेसाच्याहि जीवनांत घडलें. तेथील " फ्रेंच ऑर्डर " विभागांत पोहोंचल्यानंतर एका हॉटेलांतील खोलीत तो तिला घेऊन गेला. त्यापूर्वीच त्या खोलींत इतर दोन पुरुष बसले होते. त्यांनी तिला तिच्या शरिरावरील कपडे काढावयास सांगितलें, कारण तिचें शरीरसौष्ठव त्याना पहावयाचें होतें. तिनें अंगावरील कपडे काढले. ते हंसू लागले तेव्हां टेरेसा रडूं लागली. पण अश्रू गाळलेले पहाणें त्यांना आवडत नसे व त्यांनी तिला मारावयास सुरवात केली. त्यांच्या जाडजूड हातांनी त्यांनी तिला भरपूर मार दिला. त्यानंतर तिला कसली कामगिरी करावी लागणार आहे याची त्यांनी माहिती करून दिली. जर तिनें मान्यता दिली तर तिला खूप पैसे व चांगले कपडेलत्ते मिळतील असें तिला सांगण्यांत आलें. आणि जर तिनें मान्यता दिली नाहीं,—नकार दर्शविला—तर तिला परत बेदम चोप देण्यांत येईल अशी तिला धमकी देण्यांत आली.

तिनें होकार दिला. कारण पोलीस दृष्टीस पडतांच सारी हकीकत त्याला निवेदन करण्याचा तिचा विचार होता. तेव्हां त्या इसमांपैकीं एकानें खिशांतील एक लांब धारदार चाकू बाहेर काढला. तो चाकू त्यानें तिच्या नग्न शरिरावरून फिरवून हातावर दाबला. तेव्हां हातांतून किंचित् रक्त बाहेर पडलें. तो तिला म्हणाला, "तुझ्या डोक्यांत कसल्या विचारांनीं भाऊगर्दी केली आहे हें मला ठाऊक आहे. पोलिसांची तुला मदत हवी आहे, होय ना? तूं पोलिसला हांक मारलीस तर तो इथें पोहोंचण्यापूर्वीच मी इथें दाखल होईन व या चाकूनें तुझा जीव घेईन. तेव्हां कांहीं मूर्खपणा करूं नकोस. जीव प्यारा असेल तर आम्हीं सांगतों तसें वाग. त्यातच तुझें हित आहे."

नदीकांठीं असलेल्या एका घरांत तिला तेथून नेण्यांत आलें. त्या घराची मालकीणबाई शांत स्वभावाची होती. पण टेरेसाला ती कसलेंहि सहाय्य करूं शकत नव्हती.

"पोरी, त्यांच्या इच्छेप्रमाणेंच तुला वागावें लागणार आहे. नाहींतर ते तुझे हालहाल करून तुला ठार करतील." ती बाई म्हणाली.

टेरेसानें तो सल्ला ऐकला. त्याप्रमाणें ती वागूं लागली. घरीं पत्र पाठविण्याचें धाडसहि तिला करवेना. कांहीं आठवड्यांनंतर ती तिच्या नव्या व्यवसायांत रममाण झाली. तिला त्याचें कांहीं वाटेनासें झालें. पण घरीं मात्र परत कधींच जावयाचें नाहीं, कारण हा व्यवसाय पत्करल्यानंतर घरीं तोंड दाखविण्यांत स्वारस्य नाहीं; हें तिनें मनाशींच ठरविलें होतें. तेथून जरी तिची सुटका झाली असती तरी घरीं परत जावयाचें नाहीं असा तिनें निश्चय केला. कांहीं महिन्यांनंतर तिनें आईस पत्र पाठविलें. एका तरुणासह आपण पळून जात आहोंत असें त्यांत तिनें लिहिलें होतें. त्यानंतर तिनें घरीं परत कधींच पत्र पाठविलें नाहीं.

आतां सॅली या तरुणीकडे वळूं या. एका मोठ्या शहरांतील शालेय शिक्षण तिला लाभलें होतें. शाळेंत कांहीं मैत्रिणींसह तिला मादक पदार्थ सेवन करण्याचें व्यसन जडलें होतें. अफू–गांजायुक्त सिगारेट्स् ओढण्यांत तिला भारी मजा वाटत असे. त्या नशेंत अनेक तरुणांसह तिनें मजेंत वेळ घालविला होता. एरव्हीं त्यांच्या शय्यासोबतीला ती तयार झाली नसती. पण नशेंत मात्र ती त्यांची शय्या–सोबत करूं लागली. शाळा सोडल्यानंतर

व नोकरी धरल्यानंतर मात्र या मादक पदार्थांच्या वाटेला जावयाचें नाहीं असें तिनें ठरविलें होतें. केवळ शाळेंत असेतोंपर्यंतच अंमली पदार्थांच्या आहारीं जावयाचें असा तिचा बेत होता. ज्या विद्यार्थ्यानें तिला मादक पदार्थ पुरविले होते त्याच्याकडील त्या पदार्थांचा सांठा संपला होता, तेव्हां तो तिला दुसऱ्या एका इसमाजवळ घेऊन गेला. तो इसम जणूं कांहीं तिची वाटच पहात होता असें दिसलें, व तो खरोखरच तिची वाट पहात होता. केवळ तिचीच नव्हे तर तिच्यासारख्या दुसऱ्या मूर्ख मुलींचीहि तो वाट पहात होता हें बिचाऱ्या सॅलीला ठाऊक नव्हतें. न्यू हॅबेरिया येथें अनेक तरुण मुलींची व्यवसायाकरितां आवश्यकता होती हें त्याला ठाऊक होतें व त्याच कामगिरीकरितां तो सॅलीसारख्या तरुणींची वाट पहात होता. त्यानें सॅलीला आवश्यक ते पदार्थ पुरविले व त्यांच्यावांचून तिचें काम भागणार नाहीं याची तो दक्षता बाळगूं लागला. एके दिवशीं मात्र सॅलीनें मादक पदार्थांची मागणी करतांच त्यानें नकार दर्शविला. त्या पदार्थांच्या सेवनाशिवाय तिला रात्र तळमळत काढावी लागली. तिला वाटलें त्या पदार्थांशिवाय जीवन जगणेंच अशक्यप्राय आहे. दुसऱ्या दिवशीं ती परत त्याच्याकडे गेली. त्याच वेळीं त्या ठिकाणीं दुसरा एक इसम तिला दिसला. पण तो तिचीच वाट पहात होता हें मात्र तिला ठाऊक नव्हतें. मादक पदार्थ त्याच्याकडे मिळण्याची शक्यता आहे, पण जर सॅली त्याच्या मर्जीनुसार वागली तर; असें तिला सांगण्यांत आलें. मादक पदार्थ मिळविण्याकरितां वाटेल तें करण्याची तिची तयारी होती. आणि अखेर घडलेंहि तसेंच. सावानाह येथील एका वेश्यागृहांत तिची रवानगी करण्यांत आली. तेथें तिला भरपूर मादक पदार्थ व पैसेहि मिळूं लागले. तेथील इतर तरुणीदेखील मादक पदार्थांच्या आहारीं जाऊन शरीरविक्रय करूं लागल्या होत्या असें तिला आढळून आलें. त्यानंतर तिची एका गांवांतून दुसऱ्या गांवांत रवानगी होऊं लागली. कधीं कधीं ती घरची आठवण होऊन रडूं लागली, पण टेरेसाप्रमाणेंच ती आतां घरीं परत जाऊं शकत नव्हती. मादक पदार्थांच्या आहारीं जाऊन ती वाममार्गास लागली होती.

मेरीची कहाणी मात्र वेगळ्या स्वरूपाची आहे. एका बाथरूममध्यें ती तिच्या मित्राची वाट पहात बसली होती. पण मध्येंच एका अनोळखी तरु-

णानें तिला "ड्रिंक" दिलें. तिला मद्याची तहान लागलीच होती, म्हणून तिनें तें पेय घशांत ओतलें. पण तें पेय प्राशन् केल्यानंतर मात्र तिला कसेंसेंच वाटूं लागलें व तिला भोवळ येऊं लागली. तेव्हां तो तरुण तिला त्याच्या "कार" मधून घरीं घेऊन जाण्यास तयार झाला. सकाळीं ती झोंपेंतून जागी झाली तेव्हां तो तरुण तिच्या पलंगावरच झोंपलेला तिला दिसला. तीं दोघेंहि न्यू ऑर्लीन्समध्यें येऊन दाखल झालीं होतीं, हेंहि तिला कळून चुकलें. तिनें त्याला झोंपेंतून हलवून जागें केल्यानंतर त्यानें तिला हातांचा प्रसाद देण्यास सुरवात केली. तिनें ओरडूं नये म्हणून तो तिला मारीत होता असें तिला आढळून आलें. तो त्या खोलींतून निघून गेल्यानंतर दुसरा एक इसम तिच्या खोलींत शिरला. त्यानंतर तिसरा एक इसम तिच्याकडे आला. त्यांच्याशीं झगडत बसण्याचीहि शक्ति आतां तिच्यांत राहिली नव्हती. मुकाट्यानें ती त्यांच्या कामवासनेपुढें मान तुकवूं लागली. कांहीं वेळानें एक बाई कांहीं खाद्यपदार्थ व कॉफी घेऊन आली. कॉफीची चव मात्र तिला विचित्र वाटली. मेरी कॉफी प्यायल्यानंतर परत बेशुद्ध पडली. दुसऱ्या दिवशीं तेच इसम तिच्या खोलींत शिरले व त्यांनीं जुनाच व्यवहार परत पार पाडला. रात्रीं मात्र इतर पुरुषांची तिला सोबत लाभली. संधी साधून ती हॉलच्या दारापर्यंत पोंहोंचली तेव्हां दोन स्त्रियांनीं तिला अडविलें. त्यांपैकीं एक ठेंगणी व लठ्ठ होती. त्या लठ्ठ बाईनें मेरीला तिच्या खोलींत ढकललें व खूप मारलें. मेरी खालीं पडल्यानंतर तिच्यावर लत्ताप्रहारहि करण्यांत आला. "तुला मी खूप पैसे देणार आहें, मेरी." ती लठ्ठाबाई म्हणाली. 'तेव्हां येथून पळून जाण्याचा प्रयत्न करूं नकोस.' ती तेथून निघून गेल्यानंतर ज्यानें तिला तेथें आणलें होतें तो तरुण त्या खोलींत आला. त्यानें पलंगावर बसून सर्व गोष्टी तिला समजावून सांगितल्या. जर तिनें गिऱ्हाइकांचें हंसत स्वागत केलें नाहीं तर तिला मार देण्यांत येईल असें मेरीला त्यानें सांगितलें. जर तिनें पळून जाण्याचा प्रयत्न केला, तर तिला ठार मारण्यांत येईल व जर ती नीट वागली तर मग मात्र तिला तिच्या वांट्याचे पैसे नंतर देण्यांत येतील असेंहि तिला सांगण्यांत आलें.

विचार करीत ती शांतपणें पडून राहिली. तेथून पळ काढण्याचा तिनें निश्चय केला होता. कांहीं दिवसांनंतर सायंकाळीं त्यांनीं तिला मोटा-

रींत बसविलें व रात्रीच्या प्रवासास सुरवात झाली. प्रवास सकाळीं संपला. दुसऱ्या एका घरांत तिला नेण्यांत आलें. पहिलें गिऱ्हाईक पहातांच तिनें त्याचें अंग ओरबडलें व त्याच्या हाताचा तिनें चावा घेतला. गिऱ्हाइकानें मादामजवळ तक्रार करतांच इतर दोन पुरुष तिच्या खोलींत शिरले. संपूर्ण नग्न करून त्यांनीं तिला खूप मारलें. दोन दिवसांनंतर तिनें तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला, तेव्हां तिला परत पकडून खूप मारण्यांत आलें.

अमेरिकेंतील आठ परगण्यांतील दहा पैकीं आठ वेश्या अशा प्रकारें बळजबरीनें या व्यवसायांत गुंतविलेल्या आहेत, असें वृत्त अखेर चौकशीअंतीं बाहेर पडलें. पण अखेर गुन्हेगारांस व त्यांच्या हस्तकांस पकडण्यांत पोलिसांस यश लाभलें.

त्यामुळें अनेक मेरी, टेरेसा व डोरोथी यांच्या जीवनावरील भावी अरिष्ट टळलें आहे.

# ९ पापी पूर्व

मध्यपूर्वेत काय किंवा अतिपूर्वेत काय वेश्याव्यवसायाकरितां मानवास विकत घेणें किंवा विकणें ही एक फार पुरातन गोष्ट ठरली आहे. चिनी, जपानी, इन्डोनेशियन आणि इतर राष्ट्रांतील लोकांनीं या प्रकारचा व्यवसाय शतकानुशतकें केला आणि हल्लींहि करीत आहेत. नोव्हेंबर १९५३ मध्यें शिकागो डेली न्यूजच्या बातमीदारानें टोकिओहून वृत्त पाठविलें कीं, 'गेल्या १९ वर्षांत तांदळाची वाढ कमी झाल्यानें मुलांच्या गुलामगिरीची पद्धत त्या भागांत वाढत चालली आहे.' याच बातमीदारानें पूर्वीं असें म्हटलें आहे कीं, 'जपानच्या ओसाका या अव्वल दर्जाच्या शहरांत ७३२ मुलींस विकल्याबद्दल ५०० ब्रोकर किंवा दलालांस अटक करण्यांत आली आहे. पुढें ही संख्या १२२९ पर्यंत वाढली. १२२९ मुलींस गुलाम म्हणून विकण्यात आलें होतें. विकण्यांत येणाऱ्या बालकांत ९० टक्के मुली असतात आणि त्यापैकीं ५० टक्के मुलींची वेश्यागृहांत रवानगी होते.

३०५७० दि. ...१२.. क्रमांक ७३२२ नों: दि: ५।५।६७

या बालकांस विकणारे लोक म्हणजे त्या बालकांचे आईबापच होत. अनेक कुटुंबें घरांत 'जादा' झालेलीं बालकें विकणेंच पसंत करतात. आणि ज्या मुलींची वेश्यालयांतून सुटका करून घरीं परत रवानगी करण्यांत आली त्यांना त्यांच्या पालकांनीं परत विकावयास कमी केलें नाहीं.

वेश्याव्यवसायाची पद्धत त्यांनीं घरापुरतीच मर्यादित ठेवली नाहीं, तर दुसऱ्या महायुद्धांत त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशांतहि ती प्रचारांत आणली.

जपाननें ताबा मिळविण्यापूर्वीं सिंगापूरमध्यें परवाना असलेलीं गृहें नव्हतीं, पण जपानी सैनिकांनीं सिंगापूर जिंकलें आणि लगेच तेथें अशा गृहांची स्थापना करण्यांत आली. इतर राष्ट्रांतील मुलींसच तेथें डांबण्यांत आलें. जपाननें शरणागती दिल्यानंतर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी हीं गृहें बंद केलीं. पण त्यामुळें कांहीं तेथील वेश्याव्यवसायाचा प्रश्न सुटला नाहीं. कारण तेथें स्थायिक झालेल्या स्त्रिया स्वदेशीं परतण्यास तयार नव्हत्या. त्यांनीं स्वतःच उघड्या मार्गावरून हिंडण्यास सुरवात केली.

तेथें अडकून पडलेल्या जपानी आणि चिनी स्त्रियांत, उपासमारीनें आणि दारिद्र्यानें कंटाळून या व्यवसायांत शिरलेल्या सिंगापूरच्या स्त्रियांची भर पडली.

आणि म्हणूनच या व्यवसायाचीं भुतें गाडण्याचे ब्रिटिशांनीं जरी प्रयत्न केले तरी सिंगापूर वेश्याव्यवसायाबाबत जगांतील एक मोठें स्थळ ठरलें आहे. हा व्यवसाय अनेक आवरणांखालीं चालू आहे व अनेक प्रकारें त्याची वाढ होत आहे त्यांतील एक साधा उपाय म्हणजे सिंगापूरच्या मादाम अर्भकांस दत्तक घेतात, आणि मग संधी सांपडतांच या बालकांस गरजू लोकांस तरी विकतात किंवा वेश्यागृहांत तरी त्यांना ठेवतात. या पद्धतीला चिनी मुलीच अधिक बळी पडल्या आहेत.

युनायटेड नेशन्सला ज्या ज्या राष्ट्रांकडून वेश्याव्यवसायाबाबत अहवाल सादर करण्यांत आला त्यांत सिंगापूरनें सविस्तर आणि सर्वांत मोठें वृत्त सादर केलें आहे. त्यांतील कांहीं उतारे खालीं देत आहोंत.

जुलै १९४९ ते १९५० पर्यंत गैरव्यवस्था असलेल्या हॉटेलमध्यें आणि वेश्यालयांवर पोलिसांनीं धाड घातल्यावर ५५ मुलींस अटक करण्यांत

आली. त्यापैकीं ३० मुली अल्पवयीन होत्या असें आढळलें. जुलै ते डिसेंबर १९५० पर्यंत ५६ मुलींना पकडलें, त्यांपैकीं १० मुली अल्पवयीन होत्या...

वेश्यालयें मादक पदार्थांच्या सेवनाकरितांहि उपयोगांत आणतात. असें तीन ठिकाणीं आढळून आलें...

ऑगस्ट १९५० मध्यें एका कॅन्टीनमधील स्त्रीनें पोलिसांस खबर दिली कीं तिच्या भावी जावयानें तिच्या १९ वर्षांच्या मुलीस पळवून नेलें असून तिला सिंगापूरच्या वेश्यालयांत बळजबरीनें काम करण्यास लावून तो तिच्या कमाईवर जगत आहे...

ऑक्टोबर १९४९ मध्यें एक ' घृणास्पद केस ' उघडकीस आली. १९ आणि २० वर्षांच्या मलाया जातींतील २ भगिनींबरोबर एका भारतीय मुस्लीमानें लग्न केलें आणि त्यानें बळजबरीनें त्यांना वेश्याव्यवसाय करावयास लावून तो त्यांच्या कमाईवर जगूं लागला. या भगिनींनी पोलिसांस ही बातमी कळवितांच चौकशी करून व पूर्ण तपासांतीं त्यास पकडण्यांत आलें. त्याला ४ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठाविण्यांत आली. शिवाय फटक्यांची शिक्षाहि त्याला भोगावी लागली...

ऑगस्ट १९५० मध्यें मिळालेल्या एका सूचनेनुसार टेंडिंग रोडवरील एका वेश्यालयावर धाड घालण्यांत आली. त्या गृहांत गृहाचा मालक आणि त्याची १७ वर्षांची दत्तक पुत्री यांना पकडण्यांत आलें...

एप्रिल १९४८ मध्यें एका वेश्यालयावर धाड घालून २ मुलींस अटक करण्यांत आली. त्या दोघींपैकीं थोरली मुलगी म्हणाली कीं, ती मूळची मकावची रहाणारी असून इतर ३ मुलींसह तिला सयाममध्यें आणण्यांत आलें. कॅन्टनमधील एक वयस्कर स्त्री त्यांची व्यवस्थापिका होती. सयाममधून त्यांनीं केडाह येथें हद्द ओलांडली आणि तेथून जंगली वाटेनें व गाडींतून कौलालंपूर गांठलें आणि तेथून ट्रेनमधून त्या सिंगापुरांत आल्या. ज्या बाईनें त्यांना आणलें होतें त्या बाईचा तपास लागला नाहीं....

मलाया आणि सिंगापूर या प्रदेशांतून स्त्रियांची देवाणघेवाण करण्यांत येते असेंहि आढळलें.

हाँगकाँग या ब्रिटिश अमलाखालील प्रदेशांत सिंगापूरसारखीच परिस्थिति आढळून येते. चिनी यादवी-युद्धाच्या वेळीं आणि युद्धानंतर हाँग-

कॉंगमध्यें आश्रयार्थ चिनी लोक गेले होते. त्यामुळें चिनी स्त्रियांची संख्याहि हॉंगकॉंगमध्यें वाढली व त्यामुळें तेथील वेश्यालयांत त्यांची भर पडली.

अतिपूर्वेकडील इतर कुप्रसिद्ध स्थळें म्हणजे पोर्तुगीज कॉलनी मकाव होय. शिवाय सायगांवचाहि त्यांत समावेश करावयास पाहिजे. इन्डोचायनांत फ्रेंच फॉरेन लिझन आहे. तेव्हां तेथील वेश्याव्यवसाय भरभराटीस आला असल्यास नवल नाहीं. थायलंडची राजधानी बॅंकॉक येथेंहि या व्यवसायानें उग्र स्वरूप धारण केलें आहे.

सयामी लोक कांहीं विचित्र रीतिरिवाजांचे आहेत असें म्हणावयास हवें. कारण प्रवाश्यांनीं सयाममध्यें यावें म्हणून तेथील वेश्यांची अधिकारी वर्गामार्फत जाहिरात करण्यांत येते. अशी जाहिरात करणारा सयाम हा बहुधा एकमेव देश ठरतो.

सयामीज टुरिस्ट ब्यूरोमार्फत जी जाहिरात करण्यांत आली आहे. त्यावर अर्धनग्न अवस्थेंतील तरुणी दिसते. आणि तिच्याखालीं खालील ओळी आढळतात.

" मौजमजेचें जीवन जगणें सयामी लोकांस आवडतें, आणि तुम्हांला सयामीज लोक आवडतील. सयामी स्त्रियांच्या मनमोकळ्या स्वभावाचें पाश्चात्य प्रवाश्यांनीं स्वागत केलें आहे. तेव्हां सभ्य गृहस्थ हो, अविस्मरणीय अशी मजेची वेळ घालविण्याकरितां सयामला भेट द्या ! सयाम तुमचें स्वागत करण्यास तयार आहे. "

मित्रता दर्शविणाऱ्या या पाचारणानंतर मौजमजा करूं इच्छिणाऱ्या प्रवाश्यास बॅंकॉकमधील कुठल्याहि बुकस्टॉलवर " कुठें शोधावें ? " " कुठें हिंडावें, फिरावे ? " इत्यादि टायटल असलेलीं पुस्तकें भरपूर प्रमाणामध्यें सांपडतात. या पुस्तकीय वाटाड्यांच्या सहाय्यानें करमणीकीच्या क्षेत्रांत प्रवेश करतां येतो.

एकट्यानेंच हिंडणाऱ्या प्रवाश्यांकरितां ' सयामीज फॉर फॉरेनर्स ' हें पुस्तक उपयुक्त वाटेल. पूर्वीच्या अशा वाटाड्यांत ' मी खुर्चीवर बसतों–' ' चाकू कुठें आहे ?'–' माझ्या मावशीचें नांव जुलया आहे, ' इत्यादि वाक्यें आढळून येत. पण नव्या वाटाड्यांत मात्र प्रवाश्याचें व्यक्तिमत्व व त्याच्या

भावना अधिक स्पष्टपणें उघडकीस आणण्याचा प्रयत्न केला आहे. हें खालील वाक्यांवरून दिसून येईलच.

" कृपा करून त्या मुलीस इकडे येण्यास सांगा. "

" नाहीं, ती नको, ती फार सडपातळ आहे. "

" एका रात्रीचा दर काय आहे ?"

" तूं फार सुंदर आहेस !"

" माझें तुझ्यावर प्रेम आहे. "

" मला सकाळीं ७ वाजतां उठव. "

" ब्लॅक शॅडो " हें पुस्तकदेखील असेंच मार्गदर्शक आहे. त्यांत केवळ हॉटेल, कॅफे, चित्रमंदिरें यांच्याच नांवांची यादी समाविष्ट करण्यांत आली नसून, बॅंकॉकमधील वेश्यालयांचा ठावठिकाणा आणि किंमती आदि बारीकसारीक माहिती त्यांत नमूद करण्यांत आली आहे.

मोरोक्कोच्या वाटाड्यापेक्षां माहितीच्या दृष्टीनें आणि साहित्यिक दृष्ट्याहि " ब्लॅक शॅडो " अधिक श्रेष्ठ आहे.

" ब्लॅक शॅडो " मधील एका पानावरील खालील मजकूर पहा:

" बॅंग कापीमध्यें सॉयी पिरोगिया या रुंद मार्गावर आल्यानंतर आधीं उजवीकडे वळा, आणि एखाद्या बोळींतून डावीकडे वळा.

" तुम्हाला समोरच एक सुंदर बंगला दिसूं लागेल. हा बंगला बगीचानें वेढलेला आहे. "

" हें एक दुसरें असें स्थळ होय कीं जेथें सुंदर स्त्रियांचा समूह आढळतो. त्यांचा आवाज कोकिळांसारखा आहे. त्या तुमच्या हांकेची वाट पाहतात. तुमच्या हाकेसरशीं त्या पवित्र प्रेमाचें गोड गीत गाऊं लागतील. दिवसा आणि रात्रीं जीं स्वप्नें तुम्हीं पहात असतां तें तुमच्यासमोर खडें आहे. चला, पुढें व्हा. तुमची निवड करा. नेहमींचा दर: ५० रुपये "

बॅंकॉकमध्यें थायलंडच्या बॅंक कापी येथील वेश्यालयांत कुठल्या कोकिळा प्रीतीचें गीत गात असतात आणि त्या कोकिळा तेथें कशा आल्या त्यांना तेथें कोणी आणलें; बळजबरीनें वा स्वखुषीनें त्या तेथें आल्या, हें कळण्यास कांहीं मार्ग नाहीं. पण खार्टुम ते बॅंकॉकपर्यंत अशा कोकिळांचें कूजन मात्र हरहमेशा क्रूर, निर्दयी अशा गुंडांकरितां नेहमीं चालू असतें.

‘ वारांगनांचें विश्व ’

भाग दुसरा

# १० शिकागोंतील पापी महाल

अमेरिकेंतील शिकागो शहर हें गुन्हेगारांचें प्रमुख निवासस्थान आहे. अशा ठिकाणीं जुगाराबरोबरच वेश्याव्यवसायालादेखील भरपूर प्रमाणांत चालना लाभली असल्यास त्यांत नवल तें कसलें ? ४४ वर्षांपूर्वी शिकागो-मधील मादाम अत्यंत नांवाजलेल्या होत्या. त्यांचें वेश्यागृह 'एव्हर्ली क्लब' या नांवानें विख्यात होतें. तेथील मुलींचा ज्यांना सहवास लाभला ते त्या मुलींस कधींच विसरूं शकले नाहींत. आणि वेश्यागृहांत हौशी लोकांकरितां सोन्याचा पियानोहि ठेवण्यांत आला होता. या एव्हर्ली क्लबचा रंगेल वृत्तांत जॉन आल्स्टीननें लिहिला आहे.

गेल्या ४४ वर्षांत मी कुठल्याहि वेश्यागृहांत पदार्पण केलें नाहीं. १९११ मध्यें अमेरिकेंतील अत्यंत बादशाही थाटाचें, अत्यंत खर्चिक आणि रंगेल 'एव्हर्ली क्लब' कायमचेंच बंद केल्यापासून मी कुठल्याहि वेश्यागृहांत पाय ठेवला नाहीं. 'एव्हर्ली क्लब' मध्यें ज्यांनी एकदां पाय ठेवला त्यांना इतर वेश्यागृहें हीन दर्जाचीं वाटल्याविना राहिलीं नाहींत.

शिकागोंतील साऊथ डीअर बॉर्न स्ट्रीटवर हें 'एव्हर्ली क्लब' होतें. जुगारी अड्डे आणि कुंटिणखान्यांचें मध्यवर्ती असें स्थान या क्लबाला लाभलें होतें. मद्याची विक्रीहि या विभागांत फार मोठ्या प्रमाणावर चालू होती. १९०० ते १९११ च्या ऑक्टोबरमधील एका रात्रीपर्यंत हा क्लब भर-भराटीस आला होता. ज्या रात्रीं पोलिसांनी या स्थळावर धाड घातली त्या रात्रीं मी तेथें हजर होतों. हें स्थळ केवळ भरभराटीस आलें होतें असें म्हणणें चुकीचें ठरेल. कारण ज्या दोन भगिनींनी हें स्थळ चालविलें होतें त्यांचीं नांवें मिना आणि अॅडा होतीं. त्यांनी क्लब संपुष्टांत आला त्यावेळीं पन्नास लाख रुपयांची कमाई जवळ बाळगली होती.

ज्या इमारतींत या क्लबची स्थापना झाली होती ती इमारत बाहेरून आकर्षक दिसत नव्हती. कारण सभोंवतालच्या विभागांत या इमारतीसारख्याच चार मजली दगडी इमारती विखुरल्या होत्या. पण आंतील रचना मात्र वेगळ्या प्रकारची होती. अमेरिकेंत त्याच्याइतकें सुशोभित वेश्यालय दुसरें आढळून येत नव्हतें. दुसरीकडे कुठेंहि एवढ्या लावण्यवती मुली आढळत नव्हत्या नि कुठेंही एवढी अवाढव्य रक्कम खर्च करावी लागत नसे. या ठिकाणीं लावण्यवती युवती तर होत्याच, पण पैसेहि या ठिकाणीं सढळ हातानें खर्च करावे लागत असत.

खालीं मुअरीश रूम, गोल्ड रूम, जॅपॅनीजरूम आणि इजिप्शियन रूम आदींची योजना केली होती. अशा प्रकारच्या १४ रूम्स् खालीं होत्या. तत्कालीन उत्कृष्ट सजावटकारांकडून प्रत्येक खोली उत्कृष्ट साहित्यांनी आणि चित्रांनी सजविलेली होती. सर्व कांहीं अव्वल दर्जाचें होतें. थुंकण्याचें पात्र सोन्याचें आणि रत्नजडित होतें. रग अर्धा फूट जाडीचे होते. संगीतगृहांत पियानो सोन्यानें मढविलेला होता. ७५ हजार रुपये किंमतीचा तो होता. कला-विभागांतील ऑईल-पेंटिंग आणि ब्रांझ व इतर धातूंचे पुतळे पहिल्या प्रतीचे होते. नृत्याची हौस ज्यांना होती त्यांच्याकरितां बॉलरूमची व्यवस्था करण्यांत आली होती. लैंगिक सौख्याचा आस्वाद घेण्याकरितां उभारलेल्या या महालांत ज्यांना पुस्तकें वाचण्याची आवड होती त्या गिऱ्हाइकांकरितां वाचनालयहि उघडण्यांत आलें होतें. पण क्लबच्या इतिहासांत तेथील वाचनालयास एकहि वाचक लाभला नाहीं.

वरील तीन मजल्यांत ‘ विश्रांती ’ घेण्याकरितां चाळीस खोलींची सोय करण्यांत आली होती. दोन भव्य जिन्यांनी वर जाण्याची व्यवस्था केली होती. जिन्यांवर अर्धनग्न अवस्थेंतील ग्रीक देवतांचे पुतळे उभारण्यांत आले होते.

चाळीस खोल्यांतील पलंग खास तयार केलेले होते. खोलींत अंधुक रम्य प्रकाशाची योजना केली होती. आणि प्रत्येक खोलींत लहानशा कारंजांतून मधून मधून अत्तराचे फवारे उडत होते. रोज खोलींत ताज्या टवटवीत गुला-

बाचीं फुलें पुष्पपात्रांत ठेवण्यांत येत असत. खिडक्यांवर रेशमी पडदे होते. प्रत्येक खोलींतील घड्याळ सोन्याचें होतें.

प्रत्येक खोली कांचेनें सजविलेली होती. छत कांचेचें होतें, भिंतींवर कांचा होत्या, जमिनीवर कांचा होत्या. त्यामुळें खोलींतील मुलीचें सर्वांग एकाच वेळीं दिसत असे. प्रत्येक खोलीशेजारीं बाथरूमची व्यवस्था करण्यांत आली होती. आणि बाथटब अर्थातच सोन्याचें होतें.

या क्लबमधील तरुणी अनेक राष्ट्रांतील होत्या. पण त्या सर्वच देखण्या, तरुण नि आकर्षक होत्या. त्या अनेक कलांत वाकबगार होत्या. आपल्या श्रीमंत गिऱ्हाइकांस सौंदर्य आणि तारुण्याची आवश्यकता आहे हें मिना आणि ॲडा जाणून होत्या. ( या भगिनींचें आडनांवच एव्हर्ली होतें. ) एव्हर्ली भगिनी त्यांच्या क्लबमधील मुलींस इतर कुंटणखान्यांपेक्षां पैसे अधिक प्रमाणांत देत होत्या. क्लबमध्यें काम करणाऱ्या मुलींस हें ठाऊक होतें कीं एकादा लखपति खूष झाला, तर त्याच्याबरोबर विवाह करण्याची संधी लाभण्याची शक्यता होती. आणि अशी संधी अनेक तरुणींच्या वांट्यास चालून आली आहे. क्लबमधील अनेक वेश्यांनीं धनाढ्य लोकांशीं विवाह उरकले आहेत.

खालील ' रूम ' मध्यें गिऱ्हाइकांची मुलींशीं ओळख करून देण्यांत येत असे. त्यावेळीं मुली अत्यंत सभ्यपणें वागत असत. प्रत्येक मुलीच्या शरीरावर व्यवस्थितपणें शिवलेला पण फॅशनेबल गाऊन असे. एव्हर्ली भगिनींपैकीं कोणीतरी एक ' पाहुण्यां ' बरोबर मुलींची ओळख करून देत असे.

एकदा कांहीं ' पाहुणे मंडळी ' क्लबमध्यें गेल्यानंतर दोघीहि भगिनी क्लबमध्यें नाहींत असें त्यांना आढळून आलें. पण तेथील मुलींपैकीं एका मुलीनें पुढाकार घेतला नि ती टाळी वाजवून म्हणाली, " चला, मुलींनो, इकडे या पाहूं ! " ती अर्थातच हें वाक्य इतर कुंटणखान्यांत शिकली होती. एव्हर्ली क्लबमधील पद्धत वेगळी नि सभ्यतेची होती. वरील घटना एव्हर्ली भगिनींस कळतांच एकमेकांच्या बाहुपाशांतच त्या बेशुद्ध पडल्या असें म्हणतात. आणि ज्या मुलीनें वरील पुढाकार घेतला होता तिला तेथून हांकलण्यांत आलें.

"एव्हर्ली क्लबमध्यें तुम्हांस रहावयास लाभतें याचा तुम्हांला अभिमान वाटला पाहिजे." नवीन मुलींस कामावर ठेवतांना मिना नेहमीं असें म्हणत असे.

"लक्षांत ठेवा, तुम्हीं येथें उच्च दर्जाच्या निवासस्थानांत आहांत. येथें तुम्हांला मानाचें स्थान आहे." अॅडा मिनाला दुजोरा देत असे.

आणि तेथील मुलींना खरोखरच फारच चांगली वागणूक लाभत असे.

एव्हर्ली क्लबमध्यें नव्यानेंच आलेल्या व तेथील चालीरीतींचा विशेष गंध नसलेल्या एका मुलीनें गिऱ्हाइकास स्पष्टच विचारलें, "मग काय, पलंगावर चलणार कीं नाहीं ?"

"पण मला झोंप लागली नाहीं." गिऱ्हाईक उत्तरलें.

खोलींतील इतर मुली जोरजोरानें हंसल्या. पण मीनाला तो प्रकार आवडला नाहीं. दुसऱ्या दिवशीं त्या मुलीला काढून तिचा जागीं नव्या पण व्यवस्थितपणें वागणाऱ्या मुलीला कामावर ठेवण्यांत आलें.

सभ्यपणें वागलेंच पाहिजे असा जरी मीना आणि अॅडा यांचा कटाक्ष होता, तरी सभ्यपणा खाली, पण वरील तीन मजल्यांतील खोल्यांत सभ्यपणाला त्यांनीं वाव ठेवला नव्हता. वर काय घडतें याची त्या दखलहि बाळगीत नव्हत्या. पैशाचा कोणी उल्लेख केल्यास त्याना तें खपत नसे. गिऱ्हाइकांनीं यावें, खावें, प्यावें व मजा लुटावी. त्यानंतर नव्या महिन्याच्या सुरवातीस त्यांच्या नांवानें बिल रवाना होत असे. चेकनें सर्व व्यवहार चालत असे.

पण त्यांत गिऱ्हाइकांचा फायदा नसे. जर त्या ठिकाणीं पांचशें रुपये खर्च केले नाहींत, तर मग मिना आणि अॅडा गिऱ्हाइकांस खाजगीरीत्या 'जीवनाचें खरें रहस्य' पटवून देत असत. एका रात्रीं केवळ दोन-तीनशें रुपये खर्च करणारें गिऱ्हाईक त्यांना नको होतें. मुलीस बक्षिशीदाखल शंभर रुपये देणाऱ्या गिऱ्हाइकांची तेथें फारच कदर केली जात असे.

एकदां त्या क्लबमधील व्यवस्था पाहून एक गिऱ्हाईक इतकें खूष झालें कीं त्या अत्यानंदाच्या भरांत त्यानें 'बक्षीस' म्हणून अडीचशें रुपयांच्या नोटा मीनाच्या हातांत कोंबल्या. त्याला लगेच क्लबबाहेर फेंकण्यांत आलें व फिरून क्लबमध्यें येण्यास त्याला मनाई करण्यांत आली.

" मी एक सभ्य स्त्री आहें हें कांहीं लोकांस फार उशीरां कळतें." मीना वरील घटनेस उद्देशून म्हणाली.

एव्हर्ली क्लब हा पापाचा राजवाडा होता. त्याविषयीं आणि एव्हर्ली भगिनींविषयीं मी नंतर माहिती पुरविणार आहें. ज्या कारणाकरितां त्या जागेवर टाळें ठोकण्यांत आलें व कुठल्या परिस्थितींत तें चाललें होतें हें मी आधीं निवेदन करणार आहें. त्यांत मी काय भाग उचलला तेंदेखील मी कथन करणार आहें. आधींच मी रहस्यस्फोट करीत आहें कीं मी तेथें कामानिमित्त गेलों होतों. सरकारी कामानिमित्त गेलों होतों. त्याविषयीं विशेष माहिती मी नंतर सांगणार आहे.

विसाव्या शतकाच्या सुरवातीस शिकागो शहरास जगांत अत्यंत कुप्रसिद्धी लाभली होती. शिकागोच्या हमरस्त्यावर वेश्याच वेश्या हिंडत होत्या. त्यावेळी त्यांचा " चिप्पो " असा उल्लेख करण्यांत येई. जुगारी अड्डे नि मद्यालयांत चोवीस तास गर्दी असे. वेश्याव्यवसायांतच गुंडांस दरवर्षी दहा कोटी रुपये उत्पन्न येत असे. जुगारांत पांच अब्ज रुपये फायदा होई. दरवर्षी शिकागोंत लोक पन्नास कोटी रुपये दारूकरितां खर्च करीत असत. आठ हजार मद्यालयांत मद्यविक्री करण्याची परवानगी देण्यांत आली होती. तरी एक हजाराहून अधिक मद्यालयें परवान्याशिवाय गिऱ्हाइकांची सोय करीत होतीं. पांचशें कुंटणखान्यांनी शहर गजबजलें होतें.

कांहीं " सिंडिकेट " मार्फत हा सर्व कारभार चालला होता. कडक कायदेकानू कांहीं शिकागोवासीयांस नको होते.

शहरांतच नव्हे तर सबंध राष्ट्रांत एव्हर्ली क्लब हें पहिल्या प्रतीचें वेश्यागृह ठरलें होतें. एव्हर्ली भगिनींना इतरांशीं चढाओढ करावी लागत नसे, असा त्याचा अर्थ नव्हे. इतर वेश्यालयेंदेखील " उच्च " ठरण्याचा प्रयत्न करीत होतीं.

वेल्स आणि मनरो स्ट्रीटवरील " अंडर दि विलीज् " नांवाचें स्थळ चांगल्यापैकीं कुंटणखान्यांतच जमा झालें होतें. रॉजर प्लॅट हा गुन्हेगारजगतांतील इसम त्याचा मालक होता. या स्थळावरील खिडक्यांवरील पडदे नेहेमींच खालीं सोडण्यांत येत असत व त्यावर येणाऱ्याजाणाऱ्यांस खालील सवाल दिसत असे. " कां नाहीं ?" कांहीं दिवसांनंतर हा सवाल अमेरिकेंत

सर्वत्रच विचारण्यांत येऊं लागला. सोबतची मुलगी सुस्वभावी आहे असें आढळतांच तिचा साथीदार तिला विचारूं लागला, "कां नाहीं ?"

क्लार्क आणि पोक स्ट्रीटवरील–एव्हर्ली क्लबच्या जवळपासच–लिझी ॲलन हिचें वेश्यागृह होतें. तेंदेखील तत्कालीन अव्वल दर्जाच्या सुखसोयींनीं परिपूर्ण होतें.

तिच्या वेश्यागृहांत बहुतेक सर्वच राष्ट्रांतील तरुणी होत्या. त्यांच्या नग्न देहांचें प्रदर्शन हें लिझीच्या स्थळाचें एक वैशिष्टच होतें.

साऊथ क्लार्क स्ट्रीटवर कॅरी वॅटसन हिचें अनीतिमान गृह होतें. या भव्य वेश्यागृहांत अश्लील चित्रांची गर्दी झालेली होती. अनेक वर्षें उघडपणें व्यवसाय चालविल्यानें कॅरी वॅटसनचा शिकागोमधील प्रसिद्ध 'मादाम' म्हणून उल्लेख करण्यांत येऊं लागला. ही कॅरी वॅटसन स्वतःच स्वैरपणें वागणारी स्त्री होती. त्यामुळें एव्हर्ली सिस्टर्सनां 'लेडीज्' असें संबोधणें भागच पडतें.

शरीरविक्रयाचें दुसरें प्रसिद्ध स्थळ व्हीक शॉ हिचें होतें. व्हीक हें पुरुषाचे नांव नसून एका स्त्रीचें आहे. एव्हर्ली क्लबप्रमाणें तिनें तिच्या क्लबचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत तिला यश लाभलें नाहीं. शिकागोमधील लोकांजवळ पैसे होते, पण एकाच वेळीं एव्हर्लीक्लबसारख्या दोन उच्च क्लबानां आश्रय देण्याइतका पैसा त्यांच्याजवळ नव्हता, म्हणून व्हीक शॉचा क्लब मागें पडला.

वरील सर्वच स्थळें १९०१ मध्यें नांवारूपास आलेलीं होतीं. नि त्याच वेळीं एव्हर्ली भगिनींनीं त्यांत भाग घेण्याचें ठरविलें. या दोन स्त्रियांनीं वेश्यागृहांचें स्वरूपच पार बदलून टाकलें व त्यांत अमाप पैसा मिळविला.

केन्टकी परगण्यांत या भगिनींचा जन्म झाला होता. त्यांचीं खरीं नांवें प्रसिद्ध करण्यांत येत नाहींत. कारण त्या विभागांत त्यांचे नातलग रहात आहेत. मीना थोरली बहीण असून १३ जुलै १८७८ रोजीं तिचा जन्म झाला. ॲडा, १३ फेब्रुवारी १८८० रोजीं जन्मली.

'या धंद्यांत तुम्हीं कां प्रवेश केलात ?" असें गिऱ्हाइकांनीं विचारतांच परिस्थितीनें लाचार होऊन हा धंदा स्वीकारावा लागला,' असें त्या सांगत असत.

१९०१ मध्यें त्या दोघी जेव्हां शिकागोंत आल्या त्यावेळीं मीना २३ व अॅडा २१ वर्षांची होती. शहर जिंकण्याची त्यांनीं मनीषा बाळगली होतीच. आणि त्या वयांतदेखील त्यांनीं त्यांचें उद्दिष्ट साध्य केलें.

त्यांच्याजवळ पैसे नव्हते, पण कांहीं महिन्यांतच त्यांना पांच लाख रुपयांचें पाठबळ लाभलें. कुठल्या राजकीय कार्यकर्त्यानें किंवा धनकोनें ही रक्कम त्यांच्या हवालीं केली हें मात्र अद्याप कोणास ठाऊक नाहीं. मीनाच्या एका तत्कालीन 'मित्रा' नें ही रक्कम तिला दिली असें म्हणतात व त्या मित्राला नंतर तिनें दूर सारलें अशीहि बोलवा आहे. (या दोघांहि भगिनींनीं रस्त्यावर हिंडून वा फिरून गिऱ्हाइकांचा तलाश त्यांच्या उभ्या हयातींत केला नाहीं, असेंहि कांहीं लोक म्हणतात.)

पैसे मिळतांच एका नव्या धर्तीचें वेश्यालय चालविण्याचें त्यांनीं ठरविलें. किंचित् शालीनता, सभ्यता आणि त्याच्या जोडीला भव्य–नेत्रदीपक थाटमाट यांनीं वेश्यागृहाचा दर्जा वाढवितां येईल हें त्यांनीं ओळखलें. गिऱ्हाइकास जितका जास्त खर्च करावा लागेल तितकें त्यांना तें आवडेल अशीहि त्यांची कल्पना होती. मनुष्यस्वभावाची त्यांनीं योग्य पारख केली होती, हें नंतर काळानें सिद्ध केलेंच.

नोकरांची तळघरांत रहाण्याची त्यांनीं सोय केली होती. नोकरांच्या खोल्याहि सुखपरिपूर्ण होत्या. चौथ्या मजल्यावर स्वतंत्र खोलींत मीना व अॅडा रहात असत. चाळीस खोल्यांत 'पुश बटन' योजना केली होती. त्यामुळें गिऱ्हाइकांस केव्हांहि मद्य व खाद्यपदार्थ मागवितां येत असत.

'मद्य' म्हटलें कीं शँपेनपेक्षां हलक्या दर्जाचें मद्य तेथें मिळत नसे.

एव्हर्ली क्लबची विशेष माहिती नसलेल्या एका गिऱ्हाइकानें एकदां एका मोठ्या बियरच्या बाटलीची मागणी केली. वेटर जेव्हां परतला तेव्हां त्याच्यासह दुसरा एक पहिलवान माणूस होता. (गडबड किंवा दंगामस्ती करणाऱ्या गिऱ्हाइकांची योग्य ती व्यवस्था करण्याकरतां त्यावेळीं अमेरिकेंतील सर्वच कुंटणखान्यांत अशा धिप्पाड माणसांची योजना करण्यांत आली होती. एव्हर्ली क्लबहि त्याला अपवाद नव्हता.) त्यानें त्या गिऱ्हाइकास उचलून इमारतीबाहेर नेऊन आपटलें. एव्हर्ली क्लबमध्यें बीयरची मागणी करणें म्हणजे क्लबचा अपमान करण्यासारखेंच होतें.

शॅंपेनच्या एका बाटलीची किंमत ७५ रुपये होती. अर्थातच किंमत त्या काळांतहि फारच मोठ्या प्रमाणांत आकरण्यात येई हें उघडच होतें. अडीच हजार रुपयांत दहा लोकांच्या जेवणाची सोय होत असे. एका गिऱ्हाइकास कमींत कमी पांचशें रुपये रात्रीं तेथें घालवावे लागत. पण कांहीं गिऱ्हाइक एका रात्रींत अडीच ते पांच हजार रुपये तेथें खर्च करीत असत. एव्हर्ली क्लबविषयीं कोणीहि तक्रार नमूद केली नाहीं.

तेथील खाद्यपदार्थ उत्कृष्ट प्रतीचे होते. इतरांपेक्षां एव्हर्ली क्लबमधील जेवणाचा दर दुप्पटीनें अधिक होता. पहांटेस मद्य नि खाद्यपदार्थांची एकाद्या गिऱ्हाइकास जरुरी भासली, तर त्याला त्याबद्दल 'जादा' दर द्यावा लागत असे.

एव्हर्ली क्लबमधील जुन्या गिऱ्हाइकांकडून 'ओळखपत्र' आणल्याखेरीज नव्या गिऱ्हाइकास आंत प्रवेश लाभत नसे. किंवा दोघां भगिनींच्या सहीचें 'कार्ड' दाखल केल्यास आंत प्रवेश मिळत असे. शहरांतील इतर वेश्यागृहांत काय चालतें हें पहाण्याकरतां 'सभ्य' स्त्रिया वेश्यागृहांत तपासणीसाठीं जात असत. पण त्यांना एव्हर्ली क्लबमध्यें प्रवेश मिळत नसे. एव्हर्ली क्लबच्या धोरणाचा अखेर विजय झाला. क्लबचा नंबर कॅल्युमेट ४१२ सर्वतोमुखीं झाला.

कांहीं वर्षांतच एव्हर्ली क्लबच्या 'रम्यकथा' सांगण्यांत येऊं लागल्या. पॅरिस मध्येंच काय, पण सबंध यूरोपमध्येंहि एव्हर्ली क्लबच्या तोडीचें वेश्यागृह आढळणार नाहीं असें त्यावेळीं प्रवाशांचें मत पडलें. एवढें ऐश्वर्यशाली, भव्य स्थळ नि एवढ्या काम–कलानिपुण सुंदरी दुसरीकडे कोठें बरें आढळणार ? असें त्यांना वाटूं लागलें. तेथील वेश्या साहित्यविषयक चर्चा करण्यांतहि पटाईत होत्या.

११ वर्षांच्या अमदानींत एव्हर्ली क्लबमध्यें जवळ जवळ सातशें मुली आल्या नि गेल्या. त्यापैकीं कांहीं विवाह उरकून धंद्यांतून निवृत्त झाल्या. कांहीं तरुणींस कामावरून काढून टाकण्यांत आलें. अगदीं थोड्याच मुलींनीं तेथें लागोपाठ दोन वर्षें रहाण्याची संधी लाभली आहे. पण जुन्या मुलींच्या प्रमाणाबरोबरच पैशाची आवक वाढूं लागली. पहिल्याच महिन्यांत क्लबला

पन्नास हजार रुपयांचा फायदा झाला. त्यानंतर फायद्यांत दुप्पटीनें व अधिक वाढ झाली.

लोकप्रियतेच्या व प्रसिद्धीच्या उत्तुंग शिखरावर पोंहोंचला असतांना १८११ मध्यें क्लब बंद करण्यांत आला. त्याचीं कारणें अनेक आहेत. शिकागों तील वेश्याव्यवसायानें त्यावेळीं फारच उग्र स्वरूप धारण केलें होतें व प्रत्यक्ष गिऱ्हाइकांसहि तें कळून चुकलें होतें. त्यामुळें त्यांत 'सुधारणा' होण्याची ते वाट पाहूं लागले. त्यानंतर एव्हर्ली क्लबमध्येंच दोन घटना अशा गडल्या कीं त्यामुळेंच क्लब बंद करावा लागला असता.

पहिली घटना :—

जर्मन सम्राट कैसरनें त्याचा भाऊ प्रशियाचा प्रिन्स हेनरी यास अमेरिकेच्या दौऱ्यावर पाठविलें. शिकागोंत त्यानें लिंकनच्या स्मारकावर फुलें वाहिलीं नि नंतर तो सरळ एव्हर्ली क्लबकडे वळला. तेथें त्यानें तीन दिवस घालविले असें गप्पीदासांचें म्हणणें आहे. त्यावेळीं एव्हर्ली क्लबमध्यें एकाहि अमेरिकन इसमास येऊं दिलें नाहीं. प्रिन्स हेन्री आणि त्याच्या ताफ्यानें एव्हर्ली क्लब गजबजून गेला होता. त्यांनीं वेश्यांच्या पादत्राणांतून शांपेन प्राशन केली व राजदरबारांतील त्या मंडळींनीं वेश्यांसह नग्न अवस्थेंत नृत्य केलें.

त्या प्रशियन लोकांमुळें एव्हर्ली क्लबला अतोनात प्रसिद्धी लाभलेली पाहून एव्हर्ली भगिनीद्वय आधीं खूष झाल्या पण ती प्रसिद्धी आंगलट येऊं लागतांच त्यांचा मित्रवर्ग,—अधिकारी वर्ग—नाराज होईल म्हणून त्या बिथरल्या. त्यावेळीं कदाचित् एव्हर्ली क्लब बंद करण्यांत आला असता.

दुसरें उदाहरणः—

शिकागोंतील एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या ३७ वर्षांच्या मुलास फार विचित्ररीत्या मृत्यु आला होता. तो स्वहस्तेंच अपघातानें मरण पावला असें जाहीर करण्यांत आलें होतें. शिकारीस जाण्यापूर्वीं पिस्तूल साफ करीत असतांना अचानक रीत्या गोळी उडून ती त्याच्या डोक्यांत शिरून त्याला अपघाती मृत्यू आला असें स्पष्टीकरण करण्यांत आलें.

त्या व्यापाऱ्याच्या मालाची जाहिरात ज्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होत नसे अशा एका वर्तमानपत्राच्या मालकानें मग एका प्रसिद्ध जागेंत

मुलगा मरण पावला असें वृत्त छापलें. लवकरच सर्वत्र वावड्या उडाल्याकीं एव्हर्ली क्लबमध्यें तो तरुण मेला नि नंतर त्याचें प्रेत तेथून गुप्तरीत्या हलविण्यांत आलें. अशा प्रकारच्या प्रसिद्धीला मीना व अॅडा घाबरत असत. क्लब लवकरच बंद होणार असें सर्वत्र बोलण्यांत येऊं लागलें. पण एव्हर्ली भगिनींनीं कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हात नोटांनीं ओले केल्यानंतर तें 'मृत्युप्रकरण' संपुष्टांत आलें.

प्रिन्स हेन्री एव्हर्ली क्लबमध्यें गेला होता, हें अगदीं खरें असल्याचें सांगतात. पण 'व्यापाऱ्याच्या मुलाच्या मृत्युची बातमी, मात्र एका वर्तमानपत्राच्या चालकानें केवळ द्वेषभावनेनें प्रेरित होऊन छापली होती. त्यांत तथ्यांश नव्हता असेंहि कांहीं लोक म्हणतात.

या दोन्ही संकटांतून भगिनीद्वय सुखरूपपणें पार पडल्या पण तिसऱ्या संकटांतून मात्र त्यांची सुटका होऊं शकली नाहीं.

एव्हर्ली क्लबची रसभरित माहिती पुरविणारी एक सचित्र पुस्तिका १९११ मध्यें मीना आणि अॅडानें प्रसिद्ध केली. त्यांतील वर्णनें भडक स्वरूपांत रंगविण्यांत आलीं होतीं, पण एका सुख-चैनी महालाची माहिती सादर करण्यांत येत आहे हें वाचकांस कळून चुकलें. क्लबमधील अंतर्गत विभागांतील रमणीय दृश्यांचीं चित्रेंहि पुस्तिकेंत छापण्यांत आलीं होतीं. स्थळ, दिवसा आणि रात्रींहि उघडें असतें हेंहि त्यांत नमूद करण्यांत आलें होतें.

त्याचा विपरीत परिणाम झालाहि नसता, पण ही माहितीपत्रकें हजारोंनीं फुकट वाटण्यांत आलीं. त्यांचा प्रसार शिकागोंतच झाला असें नव्हे, तर शेजारपाजारच्या खेड्यांतून त्या पत्रिका दिसूं लागल्या. सभोंवतालच्या गांवांतून लवकरच तक्रारी सादर झाल्या. विशाल अंत:करणाच्या शिकागोला स्वस्थ राहून चालणार नव्हतें. कांहींतरी कृती करण्याची वेळ येऊन ठेपली होती.

त्यावेळीं कार्टर एच. हॅरिसन हा शिकागोचा मेयर होता. 'शहर स्वच्छ करा,' असा त्यानें हुकूम सोडला. आणि जरी पोलिसांची इच्छा नव्हती तरी त्यांनीं कांहीं ठिकाणीं धाड घातली.

मिशिगत अव्हेन्यूमधील ‘ एरिना ’ हा कुंटणखाना आधीं बंद करण्यांत आला. त्यानंतर व्हिक शॉ, लिझी ॲलेन, कॅरी वॅटसन यांच्या रंगमहालांस टाळे लावण्यांत आलें. नेदरलॅंड हॉटेल, दि न्यू मॉर्टन आणि न्यू ब्रॅडफोर्ड हॉटेल्स बंद करण्यांत आली.

“ पण एव्हर्ली क्लब मात्र कायमचें चालू रहाणार ! ” शिकागोंतील तज्ञ मंडळी म्हणाली.

विश्वास ठेवा अगर ठेवूं नका, पण त्याच वेळीं एव्हर्ली क्लबहि संपुष्टांत आला होता. क्लबचाहि निकाल लागायचा तोच लागला. २४ ऑक्टोबर १९११ रोजीं रात्रीं क्लब बंद करण्याची नोटीस भगिनीद्वयांवर बजावण्यांत आली. त्यांत एव्हर्ली भगिनींचें कांहींच नुकसान नव्हतें. वयाची पस्तिशी त्यांनी पाहिली होती व त्यांच्याजवळ पन्नास लाखांची माया जमली होती. उर्वरित आयुष्य त्या मजेंत घालवूं शकत होत्या.

आणि याच वेळीं माझा क्लबशीं संबंध पोंहोंचला. डिस्ट्रिक्ट ॲटॉर्नीच्या ऑफिसमध्यें मी त्यावेळीं दुय्यम दर्जाचा अधिकारी होतों. एव्हर्ली क्लब बंद करण्याची कामगिरी पोलीस लोक व्यवस्थितरीत्या पार पाडीत आहेत कीं नाहीं हें पहाण्याकरितां माझी निवड झाली होती.

मीना आणि ॲडानें हस्तांदोलन करून माझें स्वागत केलें. मी मान वांकवली आणि जुन्या पद्धतीनुसार त्यांनीहि मान वांकविली. क्लबमधील मुली, नोकरवर्ग आणि आश्रयदात्यांस आधींच सूचना देऊन क्लब रिकामा करण्यांत आला. आम्हां तिघांखेरीज क्लबमध्यें दुसरें कोणी नव्हतें. पण बाहेरील पायवाटेवर वाहनांची गर्दी जमली होती. १५ ऑक्टोबरच्या पहांटेस दोन वाजतां पोलिसांनी आंत प्रवेश केला. क्लब रिकामा पाहून त्यांनीं दारांवर सील ठोकलें. मीना आणि ॲडावर त्याच वेळीं नव्हे तर त्यानंतरहि कसलाच आरोप ठेवण्यांत आला नाहीं.

“ दोन आठवड्यांनंतर धंदा परत सुरू करण्यास हरकत नाहीं. ” एक पोलीस अधिकारी भगिनींस म्हणाला,

पण त्याचा अंदाज खोटा ठरला. एव्हर्ली भगिनींनीं शिकागो सोडलें. एक वर्ष युरोपांत प्रवास करण्यांत त्यांनीं घालविलें. अमेरिकेंत परतल्यानंतर त्या न्यूयॉर्कमध्यें राहूं लागल्या.

एव्हर्ली भगिनींनीं न्यूयार्कमध्यें शानदारपणें जीवन व्यतीत केलें आणि विश्वास ठेवा अगर ठेवूं नका, पण तेथें त्या काव्यरचनाहि करूं लागल्या. त्यांनीं आडनांव बदललें व लेस्टर हें नवीन नांव धारण केलें. आजूबाजूचे लोक त्यांच्याकडे आदरानें पाहूं लागले. शिकागोंतील पापी महालांतील एकच वस्तु त्यांनीं त्यांच्याजवळ बाळगली होती, आणि ती वस्तु म्हणजे ७५ हजार रुपये किंमतीचा सोन्याचा पियानो होय. "जुन्या मित्रांना भेटण्यांत आम्हांला समाधान वाटतें, पण जुन्या गिऱ्हाइकांना भेटण्याची आमची इच्छा नाहीं." कार्यनिवृत्त झाल्यानंतर ४० वर्षांनीं मीना म्हणाली. १९५५ मध्यें वयाच्या ७० व्या वर्षीं मीना मरण पावली. एका सभ्य सुसंस्कृत मनोवृत्तीच्या म्हातारीच्या मृत्यूनें शेजारीपाजारी हळहळले. अॅडानें मीनाचें प्रेत व्हर्जिनियाला नेलें व तेथें त्याच्यावर शेवटचे संस्कार करण्यांत आले.

# ११ वेश्या आणि गुप्तहेर

अमेरिकेंतील वेश्याव्यवसायावर नजर ठेवण्याकरितां एका खाजगी संस्थेनें कांहीं गुप्तहेरांची नेमणूक केली होती. कधीं कधीं या लोकांकडून मिळालेल्या माहितीच्या जोरावर खाजगीरीत्या चालविण्यांत येणाऱ्या कुंटिणखान्यांवर पोलिसांनी धाड घातली आहे. अशा गुप्तहेरांचा कधीं कधीं "सेक्स डिटेक्टिव्ह" असाहि उल्लेख करण्यांत येतो. जवळजवळ एक हजार अमेरिकन शहरांतून या कुंटिणखान्यांची माहिती गोळा करण्याची कामगिरी या गुप्तहेरांवर सोंपविलेली असते. बील फेन्टन हा त्यापैकींच एक गुप्तहेर होय. पण 'बील फेन्टन हें माझें खरें नांव नाहीं,' हें तो त्यानेंच लिहिलेल्या खालील लेखांत कबूल करतो. त्याला काय आढळलें हें त्याच्याच शब्दांत वाचा :—

वेश्यांचा एजंट किंवा पिंप हा भित्रा माणूस असून उंदरासारखा भेदरट आहे नि तो संधी सांपडतांच पाठींत सुरा खुपसतो, पण मर्दाप्रमाणें समोर उभा राहून लढत नाहीं, अशी जर तुमची कल्पना असेल तर ती चुकीची आहे.

मला असाच एक धाडशी पिंप भेटला. तो उंचापुरा आणि मेक्सिकन होता. दोन्ही मुठींत अर्धवट फोडलेल्या बियर बाटल्यांचे तुकडे धरून तो मला सामोरा आला.

एका रात्रीं ही घटना घडली. रात्र फारच झालेली होती. बिग बर्था या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या एका वेश्येच्या कुंटिणखान्यांत आम्हीं होतों. हा कुंटिणखाना अगदींच घाणेरडा होता. शिकागोच्या पूर्वेस पेनसिल्व्हानिया अव्हेन्यूवरील एका चिनी हॉटेलवर हें वेश्यागृह होतें.

माझी माहिती त्यांनीं कोठून मिळविली हें मला विचारूं नका. पण या बाबतींत ते लोक जागरूक असतात यांत कांहींच शंका नाहीं. मी दुसऱ्या एका " गिऱ्हाइका " सह एका कोचावर बसलों होतों. बिग बर्थाच्या आज्ञेनुसार सहा मुली आमच्यासमोर येऊन दाखल झाल्या होत्या व अंग-विक्षेप करीत होत्या. त्याच वेळीं फोनची घंटा वाजूं लागली. बिग बर्थानें कांहीं उत्तर देऊन माझ्याकडे पाहिलें आणि शिव्या देतच ती शेजारच्या खोलींत गेली. आणि त्यानंतर एक अडीचशें पौंड वजनाचा धिप्पाड मेक्सिकन माझ्या दिशेनें ' पॅटन टँक ' सारखा येऊं लागला. त्याच्या मुठींत फुटलेल्या बियरच्या बाटल्या अर्धवटच दिसत होत्या. मोठ्या शिताफीनें त्यानें त्या हातांत धरल्या होत्या. समोरील मुली किंचाळल्या. अन् शरीरावरील वस्त्रें नीट सांवरून धरीत खोलींतील कोपऱ्यांत जमा झाल्या. माझ्या बरोबरच्या इसमानें दाराकडे धूम ठोकली. त्या मेक्सिकनच्या मागेंच हावांत हातोडी घेऊन बर्था माझ्यावर शिव्यांचा भडिमार करीत होती. शिव्या अर्थातच अश्लील होत्या.

" डॅम स्नूप, साल्या खबरी, हलकट गुप्तहेरा, तुझे तुकडे तुकडे करतों थांब. " तो मेक्सिकन म्हणाला. पण तो येवढेंच कांहीं उद्गारला नाहीं. तो आणखी जें ' कांहीं ' उद्गारला तें अर्थातच छापण्याजोगें नाहीं.

मी त्याचा बंदोबस्त करूं शकत होतों. माझें वजन १९० पौंड आहे आणि नाविक दलांत गुप्तरोगांचा ' कंट्रोलर ऑफिसर ' म्हणून मला ' जुडो ' या कुस्तीचें भरपूर शिक्षण लाभलें होतें. समोर जर कोणी पिस्तूल धरलें नसेल तर वाटेल त्या दिव्यांतून मी पार पडूं शकत होतों. माझ्या चेहऱ्यावर त्यानें कांचेचे वार करण्यापूर्वींच मी त्याच्या मनगटांना पकडून त्याला

खिडकींतून खालीं हमरस्त्यावर ढकललें असतें. पण 'पिप' कां असेना, शक्य होईल तोंपर्यंत कोणाशींहि झगडावयाचें नाहीं, अशी आम्हांला वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सूचना लाभली होती. अशा वेळीं लगेच 'संबंध तोडण्याची' आम्हांला संवय जडली होती. त्यानुसार मी मागें सरकलों व म्हणालों, "हें पहा, मी पोलीस खात्यांतील नाहीं. मी इथें कोणालाहि अटक करण्यासाठीं आलों नाहीं. मी एक खास प्रकारची माहिती गोळा करणारा इसम आहें. 'नॅशनल हायजीन इन्कार्पोरेटेड' या खाजगी संस्थेचा मी हस्तक आहें. माझ्याजवळ हत्यार नाहीं नि पिस्तुलहि नाहीं. माझ्यावर जर हल्ला करण्यांत आला तर मग मात्र तुमच्यावर कायदेशीररीत्या इलाज करण्यांत येतील. मला येथून निमूटपणें जाऊं दिलेंत तर मग तुम्हीं कसलीहि भीति वाळगण्याचें कारण नाहीं."

—पण त्या वेड्या मेक्सिकन पिपवर माझ्या स्पष्टीकरणाचा कांहींच परिणाम झाला नाहीं. उलट तो हंसूं लागला. दंगामस्ती केल्याखेरीज तो ऐकणार नाहीं हें उघडपणें दिसत होतें. म्हणून मी मागें सरकण्याचें बंद केलें. संकटास योग्य त्या प्रकारें तोंड देण्याची तयारी केली. पण माझ्या शरीराचे तुकडे करून कांहींच लाभ होणार नाहीं, हें बर्थानें ओळखलें असावें. त्याकरतां ती ओरडली "जुआॅन! त्याला मुकाट्यानें जाऊं दे. तो पोलीस नाहीं. त्याच्यापासून आपल्याला कांहींच धोका नाहीं!"

जुआॅन परत हंसला. मी त्याच्यावर आधीं हल्ला करतों कीं काय याचीच तो वाट पाहूं लागला. पण अखेर बिग बर्थानें त्याला शांत केलें. हातांतील हातोडी तिनें त्याच्या कानावर लगावली. तो लगेच खालीं आडवा झाला.

"ठीक आहे, मिस्टर!" बिग बर्था म्हणाली, "माझ्या रागाचा पारा परत चढूं लागण्यापूर्वीं येथून चालते व्हा पाहूं!"

"थॅंक्स!" मी पुटपुटलों आणि त्या परिस्थितींत जितकें होईल तितकें अवधान राखून जुआॅनची बॉडी ओलांडीत मी तेथून बाहेर पडलों."

चित्रपटांत किंवा रहस्यमय कादंबऱ्यांत असे प्रकार वरचेवर घडत असतात. मी कांहीं काल्पनिक गुप्तहेर नाहीं! मी तुमच्यासारखीच एक जिवंत व्यक्ति आहें. एका आरोग्य खात्याच्या मोठ्या संस्थेकरितां मी खास

माहिती गुप्तरीत्या गोळा करण्याची कामगिरी करीत आहें, नि माझें नांव बिल फेन्टन नाहीं. गुन्हेगारांचें जग मला " सेक्स डिटेक्टिव्ह " या नांवानें संबोधीत असतें. पण न्यूयॉर्कमधील माझा मालक किंवा बॉस मात्र " शास्त्रीय चिकित्सक " म्हणून माझ्याकडे पहात असतो.

गुप्तरीत्या कुंटिणखाना चालविण्यान्या लोकांविषयीं आणि वेश्याव्यवसायाविषयीं पुरावा गोळा करण्याची कामगिरी माझ्याकडे सोंपविण्यांत आलेली आहे. आणि मी ज्या प्रकारची कामगिरी करतों त्याची माहिती प्रथमतःच प्रसिद्ध होत आहे.

माझ्यासारख्या गुप्तहेरांची संख्या कांहीं विशेष नाहीं. शंभराच्या आंतच त्यांची संख्या आहे. सोशल वर्कर, क्रिमिनॉलॉजिस्ट किंवा वैद्यकीय खात्यांतील लोकांची या गुप्तहेरगिरीसाठीं निवड करण्यांत येते. कांहीं महिने वेश्यालयांवर यशस्वीपणें नजर ठेवण्यांत घालविल्यावर आमची या कामासाठीं निवड करण्यांत आली. सेक्स डिरेक्टिव्हची नोकरी पाहिजे म्हणून कोणालाहि 'अर्ज' लिहून पाठवितां येत नाहीं. जे लोक असा अर्ज करतात त्यांना नकारार्थी उत्तर पाठविण्यांत येतें. कांहीं महिने या विषयाची तज्ञांकडून पूर्ण माहिती मिळविल्यानंतर 'पुरावा' कसा सादर करावा लागतो याविषयीं अभ्यास करावा लागतो. त्याच वेळीं चौकशीस कोठून कशी सुरवात करावी हेंहि शिकविण्यांत येतें. हा शिक्षण काम आटोपल्यानंतर तीन महिने आमच्या कामावर देखरेख ठेवण्यांत येते. त्यांत आम्हीं यशस्वी ठरलों कीं मग नोकरी लाभते. विवाह नोकरीच्या आड येत नाहीं. विवाहित किंवा अविवाहित कोणासहि नोकरी मिळते. पण विद्यालयीन नसलें तरी शालेय शिक्षण मात्र झालेलें असलें पाहिजे. मी विवाहित आहें. नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटीचा मी ग्रॅज्युएट आहें. शिवाय मी अंगानें घडधाकट व मजबूत आहें.

खोट्या नांवानेंच आम्हांला वावरावें लागतें. ज्या सात शहरांत आमच्या संस्थांच्या उपशाखा आहेत त्यांनाहि आमची माहिती नसते. इतर गुप्तहेर मला ओळखीत नाहींत व मी त्यांना ओळखत नाहीं. ज्या विभागांत आम्हीं चौकशीसाठीं जातों त्या विभागांतील पोसिसांसदेखील आमची माहिती नसते. केवळ न्यूयॉर्कमधील आमच्या वरिष्ट अधिकान्यास आमची

माहिती आहे व आम्हीं कोठें काम करीत असतों हें त्यालाच ठाऊक असतें. कोर्टांत जेव्हां आमच्या साक्षीची गरज भासते तेव्हां ती ॲफिडेविटनें किंवा डिपोजीशननें सादर करण्यांत येते. कुठल्याहि साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत आम्हांला उभें रहातां येत नाहीं.

आम्हीं खालील प्रकारें काम करतों. नॉर्थ डाकेटामधील ग्रँड फोर्क्स हॉटेलमध्यें मी उतरलों आहें. तेथील काम मी नुकतेंच संपविलें आहे. फोनची घंटा वाजते. न्यूयॉर्कहून माझा 'बॉस' फोनवरून बोलत आहे.

"यापुढें मोंटाना सिटीस जा." तो सांगूं लागतो, "ग्रेट नॉर्दर्न रेल्वे-वरील तें एक लहान गांव आहे. लोकवस्ती ३०००."

"ठीक आहे." तो कशाविषयीं बोलत आहे हें मला ठाऊक असतें. पण इतरांना मात्र त्याचा अर्थबोध होणार नाहीं. हॉटेलमधील टेलिफोन ऑपरेटवर गुंडांचा वचक असल्यानें ही खबरदारी घ्यावी लागते.

दोन दिवसांनंतर मीं मोंटाना सिटींत जाऊन दाखल झालों. या गांवांत शेतकऱ्यांचाच अधिक भरणा झालेला आहे. मी न्यूयॉर्कला तारेनें माझ्या खोलीचा नंबर व माझें येथील नांव (जॅक रिचर्डस्) कळविलें. तार मात्र हॉटेलमधून न पाठविण्याची दक्षता घेतली.

हिरवा चौकडीचा सूट मी परिधान केलेला आहे. भारी किंमतीचा सिगार तोंडांत ठेवून हॉटेलच्या बाररूममधून फिरूं लागलों. उंची मद्याची मी ऑर्डर पाठविली व बारच्या व्यवस्थापकाबरोबर संवादास सुरवात केली. कांहीं कुस्तीगीरांची कुस्ती ठरविण्यासाठीं मी शिकागोहून येथें आलों आहें असें त्या व्यवस्थापकाला सांगितलें. मोंटाना सिटींत दहा दिवस तरी रहाणार असून संध्याकाळीं "वेळ कुठें ? घालवावा" असें मी त्याला विचारलें. चित्रपट पहाण्याची मात्र माझी इच्छा नाहीं हेंदेखील मी त्याला सांगितलें.

मला न्याहाळून पहात तो व्यवस्थापक म्हणाला, "हें गांव अगदींच नीरस आहे असें समजूं नका. जुगाराबद्दल तुमचें काय मत आहे ?"

"चालेल कीं !" मी म्हणालों, मुलींचा मात्र मी उल्लेख टाळला. कारण ज्या ठिकाणीं जुगार चालतो त्या ठिकाणीं वेश्या असतातच. स्कॉच आणि सोडा यांची युक्ती जमलेली असते. मोंटाना सिटींतील दोन तीन जुगारी अड्ड्यांची त्यानें मला माहिती पुरविली.

माझ्यासारखें काम करणारानें उताविळ होऊन चालणार नाहीं. संयमानेंच त्यानें काम केलें पाहिजे. जुगारी अड्डयांत मी कांहीं दिवस केवळ मद्यप्राशन करण्यांत व जुगार खेळण्यांत घालविले. त्याच वेळीं तेथील 'बार' च्या व्यवस्थापकांबरोबर संभाषण उकरून काढूं लागलों. त्याचवेळीं एकादी स्त्री आंत येत असे व ओळखीच्या व अनोळखी लोकांस हातांतील बॅग हलवून "हॅल्लो" म्हणत असे. त्या बॅगवरून व तिच्या हालचालींवरून ती वेश्या आहे हें तत्काळ उमजत असे."

कांहीं स्त्रिया सोबतीशिवाय येत असत. काहीं संवगड्यांसह येत असत. ज्या एकाकी प्रवेश करीत असत त्या कांहीं लोकांसह बोलत असत. तो कदाचित् "सौदा" ही असेल, पण प्रत्यक्ष माझ्याबरोबर न बोलल्यानें "पुरावा" म्हणून मला त्या संवादाचा उपयोग होत नसे.

तिसऱ्या दिवशीं मात्र मला माझ्या कार्यांत यश लाभलें. एक मुलगी बाररूममध्यें आली आणि एकाकीपणें अगदीं कोपऱ्यांत बसली. बारच्या व्यवस्थापकाबरोबर तिनें कांहीं तरी 'कुजबुज' केली आणि व्यवस्थापक मग माझ्याजवळ येऊन म्हणाला, "त्या मुलीनें तुम्हांला मद्य दिल्यास चालेल काय? तशी तिची इच्छा आहे."

"वा, ही तर फार आनंदाची गोष्ट आहे." मी म्हणालों व त्या 'मुली' ला माझ्याजवळ येण्याचा इषारा केला. तिचें वय तिशीच्या आसपास असावें. तिच्या शरिराचा आकार नजरेंत भरण्याजोगा होता. चेहरा किंचित् राकट पण आकर्षक होता. माझ्यावर ती चाल करूं पहात होती हें उघडच दिसत होतें.

मद्याचे दोन प्याले रिमामे केल्यानंतर ती म्हणाली, "तुम्हीं कुस्तीच्या धंद्यांत आहांत हें खरें आहे काय?"

सिगार शिलगावीत 'मी होय' म्हणालों.

ती हंसतच मला म्हणाली, "मीदेखील त्याच व्यवसायांत आहें."

मी देखील तिच्या हास्यांत हास्य मिसळवीत म्हणालों. "बेबी, त्याकरितां लागणारें आवश्यक तें शरीर-सौष्ठव तुला लाभलें आहे खरें!"

आतां मात्र ती अधिक लडिवाळपणें बोलूं लागली होती. "पण मला लढत करण्याची संधी द्याल काय?"

कोर्टांत 'पुरावा' म्हणून सादर करण्याकरितां तिच्या मुखावाटे कांहीं ठराविक प्रकारचे शब्द व वाक्यें बाहेर पडणें आवश्यक होतें. त्यांना खरी किंमत होती व त्याचीच मी वाट पहात होतों. "गुन्हा करण्याची तयारी दर्शविणें" असा त्याचा कायदेशीररीत्या अर्थ लावण्यांत येतो.

"मला संधी द्याल काय?" हें वाक्य जवळजवळ गुन्ह्याची कबुली दर्शविण्यास पुरेसें पडतें पण एकादा चतुर वकील त्या वाक्याचा धुव्वा उडविल्याखेरीज रहाणार नाहीं हेंहि खरें होतें. म्हणून मी संवाद चालूच ठेवला.

"पण जागा कुठें आहे?"

"त्याची काळजी नको."

असें म्हणून तिनें जवळपासच्याच एका हलक्या दर्जाच्या हॉटेलचा नामनिर्देश केला. "पण हें लक्षांत ठेव कीं माझीहि कांहीं किंमत आहे या जगांत. पन्नास रुपये द्यावे लागतील."

"माझ्या पन्नासच्या मोबदल्यांत मला काय मिळेल?"

ती हळूंच माझ्या अंगावर वांकून कानांत पुटपुटली. आणि तेंच तर ऐकण्याची माझी इच्छा होती. त्याच वाक्याची मी वाट पहात होतों. त्यांत 'गुन्हा करण्याची कबुली' होती.

"––पण आज रात्रीं नको" मी म्हणालों, "उद्यां जर मी तुला फोननें कळविलें तर चालेल काय? पण मी कुठल्या नांवाची चौकशी करूं?"

"एल्सा"

"एल्सा कोण?"

आतां मात्र ती निराशली व इतरत्र नव्या गिऱ्हाइकांसाठीं नजर फिरवूं लागली. "नुसती 'एल्सा' नांवाची चौकशी केलीत तरी तुमचं काम भागण्यासारखें आहे." ती म्हणाली,

माझ्या खोलींतील सूटकेसमध्यें ठेवलेलें छोटें नोटबुक त्या रात्रीं बाहेर काढून मी त्यांत पहिली नोंद केली. जागा––त्या बाररूमचें नांव लिहिलें. वेळ–रात्रीं नऊ वाजून सेहेचाळीस मिनिटें. बाई:––सोनेरी केस, तिशीच्या आसपासचें वय, एल्सा नांव असल्याचें सांगितलें; निवासस्थान:––(तिनें सांगितलेल्या हॉटेलचें नांव व खोलीचा नंबर त्यांत लिहिला.) गुन्हा

कुठें करण्याची तयारी दर्शविली ?:--वरील ठिकाणीं. किंमत:--पन्नास रुपये. गुन्हा करण्याची तयारी दर्शविणारें वाक्य:—( एल्साच्या शब्दांतच हें वाक्य लिहावें लागलें.)

एका आठवड्यांत केवळ मोंटाना शहरांतील तीन बाररूममधून चौदा वेगवेगळया स्त्रियांनीं आठरा खेपेस लैंगिक गुन्हा करण्याची तयारी दर्शविली. त्यांचा तो धंदा होता, पण माझ्या दृष्टीनें तो गुन्हा ठरत होता. त्यांपैकीं कांहीं स्त्रियांनीं एल्साच्या हॉटेलचाच पत्ता दिला होता. रेलरोड निवासस्थानांत त्यांपैकीं चार स्त्रिया रहात होत्या. प्रवाशांच्या विश्रांति-स्थळांचा दोघींनीं उल्लेख केला, तर एक तरुणी आईवडिलांसह घरींच रहात होती. ही सर्व माहिती, नांवें, तारीख, किंमत आणि त्यांच्या तोंडची भाषा हें सर्व माझ्या लहान नोटबुकांत नमूद करून ठेवलें. दोन स्त्रियांनी माझ्या हॉटेलच्या खोलीचें दार ठोठावून दारांतच त्यांची ' इच्छा ' प्रकट केली आहे.

मोंटाना सिटींतील वेश्याव्यवसाबद्दल मी दोन आठवड्यांत भरपूर पुरावा गोळा केला. आमची संस्था खाजगी प्रकारची आहे. आम्हीं कोणा-लाहि अटक करूं शकत नाहीं वा वेश्यागृहांस टाळें लावण्याचा अधिकारहि आम्हांला लाभला नाहीं ! पण आमच्या संस्थेमार्फत कोर्टांत आवश्यक ती माहिती व पुरावा मात्र दाखल करण्यांत येतो. मग वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं पुढील कार्य करावयाचें असतें. कांहीं कांहीं वेळेस, आम्हीं पुरविलेल्या पुरा-व्याच्या आधारें पोलिस खात्यांतील लोक आम्हीं ज्या दिशेनें प्रयत्न केला त्याच दिशेनें परत प्रयत्न करून यशस्वी ठरले आहेत. मी मोंटाना सिटींत गोळा केलेली माहिती जर उजेडांत आली असती तर खळवळ माजली असती.

आणि तेथील अधिकारीवर्गास खळवळ माजवावयाची होती असें दिसतें. सरकारी वकील मी दाखल केलेल्या पुराव्याच्या जोरावर कोर्टांत गेले ! अबेरमेंट लॉजचा फायदा उचलून कांहीं स्थळांवर टाळेबंदी करण्यांत आली व १४ स्त्रियांना व तीन पुरुषांस भली मोठी रक्कम भरावी लागली. वेश्यांना त्यांचा व्यवहार किंवा सौदा ठरविण्याची संधि देणाऱ्या तीन बार-रूमच्या चालकांना " वॉर्निग " देऊन सोडण्यांत आलें व त्यानंतर त्यांना देण्यांत आलेला मद्याचा परवाना परत न देण्याची सूचना देण्यांत आली.

पण अशा घटना घडल्या तरी गुप्तपणें वेश्याव्यवसाय हा चालू असतोच. ओमाहाचेंच उदाहरण घेऊं या. १९५० मध्यें आमच्या संस्थेमार्फत ओमाहा शहराला "समाधानकारक" असें शिक्कामोर्तब लाभलें होतें. १९५३ मध्यें मात्र त्याच शहराला "अत्यंत वाईट" असा शेरा लाभला. मी त्या शहरांत गेलों. एका जुन्या नामांकित हॉटेलच्या "बार" मध्यें एका सोजिराशीं गप्पाष्टकें झोडूं लागलों. त्यानें मला आवश्यक ती माहिती पुरविली. दुसऱ्या एका हॉटेलचा त्यानें नामनिर्देश केला. "त्यांच्या कॉफी-शॉपमध्यें जा" त्यानें सूचना केली. "केवळ सँडविचची ऑर्डर द्या आणि मग उरलेलें कार्य तेथील बाई करील." मी त्या सोजिराच्या सूचनेंप्रमाणें वागलों व मला हवी ती माहिती मिळाली. ओमाहा सिटी वेश्यांशीं गजबजलें आहे.

ओमाहांतून आवश्यक ती माहिती मिळविणें हें जरी कठीण कार्य होतें, तरी जुन्या प्रकारच्या सहा कुंटिणखान्यांची आणि ज्या हॉटेलमध्यें वेश्यांची सोय करण्यांत आली होती अशा सात हॉटेलांची मी पूर्ण माहिती गोळा केली. वरील सहा कुंटिणखान्यांपैकीं दोन कुंटिणखान्यांनीं सतत वीस वर्षें व्यवसाय चालविला होता. हॉटेलमध्यें वेश्याव्यवसायाला चालना दिल्यामुळें एका हॉटेलवर पोलिसांनीं चार वेळेस छापा घातला होता. कोर्टांत त्याच त्या स्त्रियांवर परत परत खटले भरण्यांत येत होते.

कायद्याची कडक अंमलबजावणी झाल्याखेरीज गुन्हेगार लोक वठणी-वर येणार नाहींत असें पाहून शिकागोमधील आमचा प्रतिनिधी ओमाहास गेला व परत परत गुन्हा करणारांस कडक शिक्षा देण्यांत यावी या तत्वाचा प्रचार करून त्यानें लोकमत आपल्या बाजूकडे वळविलें.

उघडपणें वावरणाऱ्या आमच्या प्रतिनिधींनी व मी गुप्तरीत्या सादर केलेल्या माहितीच्या आधारें अखेर ओमाहांतील परिस्थिती आटोक्यांत आणून ओमाहाला 'समाधानकारक' असें शिक्कामोर्तब लाभलें.

कधीं कधीं इतर राज्यांतील अधिकारीवर्गाकडून आम्हांला योग्य तें सहाय्य लाभत नाहीं व त्यांच्याकडून आमच्या कार्यांत अडथळेहि निर्माण होतात

एका शहरांतील सैनिकी छावणींत गुप्तरोगाचा फारच फैलाव झाल्यानें तेथील परिस्थितीची माहिती मिळविण्यासाठीं माझी निवड करण्यांत आली होती. शहरांतील उत्तमोत्तम हॉटेलमध्यें मी 'हॅट सेल्समन' म्हणून प्रवेश मिळविला. पण ज्या वेटरनें माझी बॅग उचलली होती व जो मला माझ्या खोलीकडे घेऊन चालला होता, त्यानें स्वतःच मला आवश्यक ती माहिती तत्काळ पुरविली.

"सोबतीला कुणी नाहीं वाटतं? तें तर दिसतंच आहे." वेटर पंख्याचें बटन दाबीत म्हणाला. त्यानंतर त्यानें खोलींतील टॉवेल तपासून पाहून खिडक्या उघडल्या.

"होय, मी एकट्यानेंच प्रवास करीत आहें." मी म्हणालों.

"जर कांहीं सोबतीची आवश्यकता असेल, तर मी त्याची व्यवस्था करतों." तो म्हणाला.

"कसली नि कोणाची सोबत रे?" मी विचारलें.

"अगदीं सुंदर सोबत."

"त्याचा मोबदला किती द्यावा लागेल?"

"तें तुम्हीं त्या बाईबरोबरच ठरवा."

एक तासानें एक देखणी मुलगी माझ्यासमोर येऊन उभी राहिली. ती अठ्ठावीस वर्षांची असावी. एका तासाकरितां तिनें दोनशें रुपये मागितले. त्यापैकीं पन्नास रुपये वेटरच्या वांट्यास जाणार होते. पांच मिनिटें वाद-विवादांत घालविल्यानंतर पन्नास रुपयांत तिनें 'हो'कार दिला. त्यापैकीं वीस रुपये वेटरच्या वांट्यास जाणार होते.

मी पन्नास रुपये तिच्या हवालीं केले व केवळ संभाषण करण्याची माझी इच्छा असल्याचें तिला सांगितलें. तिनें हंसतच त्याला संमत्ती दर्शविली. माझें जर त्यांतच समाधान होणार होतें तर माझ्या इच्छेआड येण्याची तिची इच्छा नव्हती. त्या गांवांत वेश्याव्यवसाय इतका फोफावला आहे कीं केवळ तुझ्याशीं संभाषण करावयाचें आहे, असें मी तिला सांगितलें, तरी तिला माझा संशय आला नाहीं. एका न्यायाधीशानें नुकतेच उद्गार काढले होते, कीं 'शहरांतील वेश्या बेभानपणें कार्य करीत आहेत.' तें खरें आहे काय असें मी तिला विचारलें. तें खरें असल्याचें तिनें मान्य केलें.

या शहरांतील अनेक हॉटेल्समधून मुली मिळण्याची सोय करण्यांत आली असून अडीचशें तें पन्नास रुपयांपर्यंत त्या शरीर विकण्यास तयार होतात. आणि कधीं कधीं केवळ पंचवीस रुपयांच्या मोबदल्यांतहि त्या शय्या-सोबतीस तयार होतात. चेरी स्ट्रीटमधील हॉटेलमध्यें जोडप्यांनीं सामाना-विरहीत प्रवेश केला तरी चालतो व त्या जोडप्यांस कसलेहि सवाल विचारण्यांत यत नाहींत. मार्केटजवळील एका हॉटेलमध्यें जर तुमच्या सोबतीला स्त्री नसेल तर त्याची सोय करण्यांत येते. हॉटेल हलक्या दर्जाचें आहे. शिवाय मार्केटजवळच रस्त्यावर मुली गिऱ्हाइकें पहात हिंडत असतात. ' माज प्लेस' नांवाचा एक कुंटिणखानाहि चालू आहे.

एवढी माहिती तिनें पुरविल्यानंतर मी तिचे आभार मानले व एका टॅक्सींतून तिनें उल्लेखिलेल्या स्थळांकडे वळलों. तिनें पुरविलेली माहिती खरी ठरली. मी नांवें, पत्ते आणि योग्य तो पुरावा गोळा करून त्याची नोटबुकामध्यें नोंद केली.

मी माझा रिपोर्ट न्यूयॉर्कमधील 'बॉस'कडे रवाना केला. तो रिपोर्ट त्यानंतर शहरांतील पोलिस अधिकाऱ्यांच्या हवालीं करण्यांत आला. पण त्या शहरांत असा बाहेरचा पुरावा चालत नसे. तेव्हां एका पोलिसानें खाजगी कपडे अंगावर चढवून माझी पायमल्ली केली. हॉटेलमध्यें राहून, बाई नि बाटलीची मागणी करून त्यानें आवश्यक तो पुरावा उपलब्ध केला.

एका लोकप्रिय जागेंत त्याला तांबड्या केसांची, बावीस वर्षांची तरुणी केवळ पंचवीस रुपयांत मिळाली. त्यापैकीं दहा रुपये वेटरला देण्यांत आले. शहरांतील नऊ हॉटेलांपैकीं आठ हॉटेलांत त्याला वेश्या व त्यांचे हस्तक आढळले.

मला ज्या मोठ्या हॉटेलमधील वेटरनें माहिती पुरविली होती त्यालाहि अटक करून नंतर शिक्षा ठोठावण्यांत आली. माझ्या खोलींत जी तरुणी आली होती तिलाहि अटक करण्यांत आली. तेरा वेटर लोकांवर फारच गंभीर आरोप ठेवण्यांत आला. १९ वर्षांच्या एका कुमारी मातेस त्यांनीं बंदिस्त करून ठेवलें होतें व रोज रात्रीं पंधरा ते वीस गिऱ्हाइकें ते तिच्याकडे पाठवीत होते. हा प्रकार सतत चार महिने चालला होता. ' माज प्लेस ' वरहि धाड घालून 'मा'ला व तिच्या चार पोरींना पकडण्यांत आली. पण ' मा '

वशिल्याच्या नि हुशार वकिलाच्या सल्ल्यानें निर्दोष सुटली व ती पुनरपि तिच्या व्यवसायांत मग्न झाली आहे.

टेक्सासमधील सान अँटोनिओ गांवांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मात्र आम्हांला आमच्या कार्यांत सहाय्य केलें नाहीं. तेथील वेश्याव्यवसायानें तर फ़ारच उग्र स्वरूप धारण केलें होतें.

अमेरिकेंतील तीन अत्यंत 'वाईट' शहरांत सान अँटोनिओ शहराचा त्यावेळीं समावेश करण्यांत आला होता. रॅटलस्नेक हिल व माटामोरास स्ट्रीट वेश्यांनीं व्यापलेले होते.

स्नेक हिल आणि माटामोरास स्ट्रीटवरील कुंटणखान्यास जवळपास-च्याच सैनिकी छावणींतील सैनिकांचा आश्रय लाभला होता. गुप्तरोगांवर तत्काळ नि परिणामकारक उपाय योजण्याचें आश्वासन देणारे अनेक डॉक्टर आणि त्यांचे दवाखाने ठिकठिकाणीं विखुरले होते. त्यांचाहि धंदा भरभरा-टीस आला होता.

सान अँटोनमध्यें आमच्या संस्थेची शाखा होती. तेथून वरिष्ठ अधि-काऱ्यांस योग्य तें सहाय्य करण्याची विनंती करण्यांत आली. गुप्तरोगांचा फैलाव होऊं नये म्हणून प्रचार करण्यांत आला. पण प्रयत्न करूनहि आम्हांला यश लाभलें नाहीं.

आवश्यक तो 'पुरावा' सान अँटानमध्यें मुबलक प्रमाणांत उपलब्ध होता. हजारों नांवें, निवासस्थानें आणि इतर माहिती गोळा करण्यांत आली, पण त्याचा गांवांतील वरिष्ठ अधिकारी उपयोग करून घेत नव्हते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं जागें व्हावें व प्रत्यक्ष कृतीस प्रारंभ करावा म्हणून आम्हीं इतर कांहीं सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांचें पाठबळ मिळविलें. सेनाधिकाऱ्यांनीं अठ्ठावीस स्थळें सैनिकांकरितां 'आउट ऑफ बाऊंड्स्' ठरविलीं. पण त्यापलीकडे विशेष कांहीं घडलें नाहीं.

अखेर आमच्या संस्थेनें पुढाकार घेतला व वेश्यांनीं त्यांच्या हस्तकांस गांवाबाहेर हांकून लावण्याच्या आमच्या प्रचारास सर्वत्र पाठिंबा लाभला. न्यूयॉर्कमधून माझा 'बॉस' स्वतः तेथें आला व त्यानें सर्व सूत्रें आपल्या हातांत घेतलीं.

वर्तमानपत्रांत पानभर जाहिराती छापून गांवांतील वेश्याव्यवसायाची सविस्तर माहिती छापण्यांत आली व पोलीस अधिकारी कसे स्वस्थ बसून आहेत हेंदेखील त्यांत नमूद करण्यांत आलें.

त्याचा योग्य तो परिणाम झाला. आणि ऐन निवडणुकीच्या धामधुमींत आमचा हा प्रचार चालला होता; त्यामुळें वेश्याव्यवसायांत जे सामील झाले होते ते पुढारी सपशेल पडले. दुसरे नेते निवडून आले. त्यांच्यामार्फत माटामोरास स्ट्रीट व स्नेक हिलवरील वेश्याव्यवसाय स्थगित करण्यांत आला.

"सेवस डिटेक्टिव्ह"चें हें काम सुखदायक नाहीं. गुन्हेगारांच्या जगांत वावरावयाचें झाल्यास अनेक संकटांना तोंड द्यावें लागतें.

वेश्याव्यवसायांतहि त्या धंद्याचे खास शब्दप्रयोग वापरण्यांत येतात. वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या लोकांच्या इच्छेला 'बळी' पडणाऱ्या लोकांस 'जॉन' म्हणतात. किंवा 'मार्क' म्हणूनहि त्यांचा उल्लेख करण्यांत येतो. लांच देण्याच्या क्रियेस 'आईस' किंवा 'बार्फ' असें म्हणतात. वेश्याव्यवसायाचा 'गो' या शब्दानें उल्लेख करण्यांत येतो. तर धंद्यांतील स्त्रियांस 'गोअर्स' असें संबोधण्यांत येतें. 'इसलर्स' म्हणूनहि त्यांना ओळखण्यांत येतें. भडवा किंवा एजंटास 'कॅडेट' म्हणतात. असें जरी असलें तर या सर्वच व्यवसायाचा आपणांस लवकरच तिटकारा वाटूं लागतो.

त्या धंद्याविषयीं मनांत तीव्र घृणा उत्पन्न होते. पण लोकोपयोगी कार्य करणाऱ्या आरोग्यसंस्थेचा मी प्रतिनिधी आहेंच आहें. काम महत्वाचें आहे, हें मी कदापि विसरणार नाहीं.

पण माझ्या कार्याचा खरेंच का कांहीं उपयोग होणार आहे? हा व्यवसाय यापूर्वीं चालू होता आणि यानंतरहि चालू रहाणार, नाहीं का? होय, पण त्यात अमर्याद वाढ होऊं न देतां त्यांची व्याप्ती कमी झाल्यास त्यांत नुकसान काय आहे?

अमेरिकेंतील मोठ्या शहरांतील वेश्याव्यवसायावर बंदी लादण्यांत आम्हांला बरेंच यश लाभलें आहे. गाल्हेस्टन, ग्रेट फॉल्स आणि मोंटाना या शहरांतील त्रास मात्र वाढला आहे.

या व्यवसायास आळा घालण्यांत 'सेक्स डिटेक्टिव्ह' लोकांनीं बरेंच सहाय्य केलें आहे. गेल्याच वर्षीं बट, हेलेना, केचिकन, बर्मिगहॅम आणि गॅल्व्हेस्टन येथें योग्य तो पुरावा गोळा करून तेथें 'स्वच्छता' राखण्यांत आम्हांला यश लाभलें.

आमच्याविषयीं कोणीहि टेलिव्हिजनकरितां, रेडिओकरीतां किंवा सिनेमा–नाटकांकरतां लिखाण करीत नाहींत, पण राष्ट्रास आमची आवश्यकता खात्रीनें भासूं लागली आहे. आमच्याविषयीं तुम्हांला विशेष माहिती नसेल, पण गुन्हेगार–जग आम्हांला ओळखून आहे. आमच्या फाउंटनपेनच्या फटकाऱ्यानें आम्ही अनेक कुंटिणखाने नेस्तानाबूद केले आहेत !

## १२ टोकियोंतील विलासी वेश्या

जपानमधील वेश्याव्यवसायासदेखील इतर राष्ट्रांतील वेश्याव्यवसायाप्रमाणें अग्रेसर धंद्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे. त्याविषयीं फ्रँक हार्वे या लेखकानें त्याच्या वाट्यास चालून आलेले अनुभव खालील प्रकारें व्यक्त केलें आहेत. ते उदबोधक वाटल्याखेरीज रहाणार नाहींत. सदर लेखक म्हणतो:—

अमेरिकन स्त्रिया पुरुषांचें काम मिळविण्याकरितां सतत झगडत असतात. जर मनाजोगतें काम लाभलें नाहीं तर मग मात्र त्या थंड प्रवृत्तीनें वागूं लागतात. घरीं स्वस्थ बसून एकाऐवजीं दोन कॅडलॅक गाड्या नाहींत. बावीस इंचांचें टी. व्ही. सेट आहे, पण चाळीस इंचांचें मोठें टेलिव्हिजन सेट नाहीं म्हणून, किंवा एक बटन दाबतांच घरांतील सर्वच लहानसहान कामें संपत नाहींत म्हणून नाहीं त्या विवंचनेंत असतात. कारण सकाळीं लवकर उठून नवऱ्याच्या न्याहारीची तयारी करून त्याला कामावर पाठविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते.

असें जरी असलें तरी जगांत अजून संस्कृतीचा फैलाव होत असून त्या जगांत पुरुषच मुखत्यार आहे हें कबूल करावें लागतें. त्या जगांत बायको जेव्हां पांचवारीऐवजीं पॅंट वापरूं लागते तेव्हां तिचें डोकें ठिकाणावर आहे कीं नाहीं किंवा ती आजारीबिजारी आहे कीं काय हें तपासून पहाण्यांत येतें. आणि ती शुद्धीवर असून आजारी बिजारी नाहीं असें आढळून येतांच तिचा नवरा नाइलाजानें कां होईना पण तिच्या डोक्यावरील केस हातांत गच्च धरून ठेवतो व दुसऱ्या हातानें गालफाडांत लगावतो. अशी शिक्षा लाभल्यानंतर पत्नी परत पॅंटची भाषा काढीत नाहीं. कारण घरांतील अधिपति–आणि तोच घराचा अधिपति आहे हें खरें आहे, पॅंटमध्यें वावरत असतो. तेव्हां त्याच्या बायकोनें पॅंट वापरून कसें चालेल ?

वरील कृत्य कदाचित ठीक नसेलहि पण त्याचीहि शिफारस करावी लागेल. उदाहरणार्थ जपानमध्यें विवाहसंस्थांची अत्यंत आबाळ होऊं लागली आहे. घटस्फोट हा कांहीं तेथील मोठा वादाचा विषय नाहीं. लैंगिक व्यवहार म्हणजे कांहीं रहस्यमय, कुटिल धंदा आहे असें तेथें समजण्यांत येत नाहीं. त्याउलट वेश्याव्यवसायास जपानमध्यें फार अग्रेसर स्थान मिळून राहिलें आहे. लोखंड, खाणी आणि शेती व्यवसायाबरोबर वेश्याव्यवसायाला जपानमध्यें स्थान लाभलें आहे. वेश्याव्यवसाय खेड्यापाड्यांत, शहरांत, छोट्या–मोठ्या गांवांतून पसरूं लागला आहे. नव्हे, फोफावूं लागला आहे. हा व्यवसाय हजारों वर्षें येथें चालत आला आहे. आणि तेथील सरकारनें त्या बाबतींत कांहीं विरोधी धोरण स्वीकारलें नाहीं व वेश्याव्यवसायाचें पूर्ण उच्चाटन केलें नाहीं तर आणखी हजारों वर्षें हा व्यवसाय तेथें चालणार आहे.

मी केवळ पांच रात्रीं येथ घालविल्या आहेत, आणि तेथील स्त्री–पुरुषांचे लैंगिक व्यवहार कसें चालतात तें पाहिलें आहे. तेव्हां अगदीं तज्ञाप्रमाणें मी मतप्रदर्शन करूं इच्छित नाहीं पण तेथील व्यवसायाविषयीं अखेरचा निर्णय वाचकांनी द्यावयाचा आहे असें मला वाटतें.

टोकियोच्या सरहद्दीजवळील आसाकाजवळ अमेरिकन सैनिकांच्या दोन तळांमध्यें एक गांव उदयास आलें आहे. सहा फूट उंचीच्या दोन धिप्पाड अमेरिकन पॅराट्रूप सैनिकांसमवेत मी त्या गांवांत रात्रीं साडेदहाला पोहोंचलों. गांवांत वेश्यागृहांनीं समृद्ध अशी स्थळें विखुरलीं आहेत. मुख्य वाट चिखलानें माखलेली आहे. आणि कडेवर मद्यालयें पसरलीं आहेत. या मद्यालयांच्या

मधूनच अंधुक लाल प्रकाशांत काळ्याभोर बोळांचीं तोंडें आहेत. त्या अंधाऱ्या बोळांत काळोखाबरोबरच उष्मा, सिगारेटच्या धुराचा वास, व्हिस्की, विष्टा, सडलेले खाद्यपदार्थ, भाजीपाला, स्वयंपाकगृह, आणि इतर वस्तूंचा दर्प तेथील पापी आचरणाची ग्वाही पटवीत होता. आम्हीं रस्त्यावरून हळूहळू चाललों होतों. कुठेंतरी अंधारांत अधून मधून काळ्या आकृतींची हालचाल दिसत असे. दूरवर अस्पष्ट प्रकाशांत एकादी इमारत, एखादा काळा चेहरा दिसत असे नि हळूच आवाज ऐकूं येई, "सोजिरा, माझ्याबरोबर चल. सैनिका, आपण कांहीं गंमत-जंमत करूंया. येतोस ना ?"

"बाहेर उजेडांत ये" माझ्या बरोबरचा एक सनिक म्हणाला, "अम्हांला तुला पहावयाचें आहे."

"नाहीं गड्या, तूं इकडे ये. आपण वेळ मजेंत घालवूंया. येतोस ना ?"

"तोंडांतून शब्द काढूं नकोस. स्वस्थ बसून रहा. नुसता आवाज ऐकायचा नि चेहरा पहावयाचा नाहीं, म्हणजे काय ?" तो सैनिक म्हणाला.

आम्हीं तेथून पुढें सटकलों. खरी गोष्ट अशी आहे कीं उष्मा सहन न होऊन अमेरिकन सैनिक तेथें शर्टऐवजीं गंजिफॉक वापरतात. आणि एकादा सैनिक दारूच्या नशेंत आढळला कीं लगेच गुंड लोक त्याला पकडून हिरॉईनचें इंजेक्शन देतात. सैनिकानें स्वतःची सुटका करून घेतली कीं तो पळूं लागतो. पण त्याला फार दूरवर जातां येत नाहीं. मग गुंड लोक त्याला परत पकडून घाण वासानें डबडबलेल्या एखाद्या घरांत घेऊन जातात नि परत हिरॉईनचें इंजेक्शन देतात व त्याला नादिष्ट बनवितात. आणि त्या सैनिकाला हिरॉईनची चटक लागली कीं मग त्याच्या अधोगतीला सुरवात होते. शिजुकू आणि योशिवारा येथील वेश्यांच्या वस्तींतून हिंडतांना या धोक्यांपासून फारच जपावें लागतें.

आम्हीं सडकेवरून जात असतांनांच मी मद्यालयांतील दृश्यें पहात होतों खिडक्यांना कांचेचीं तावदानें नव्हतीं आणि पडदेही नव्हते. त्यामुळें मद्याच्या नशेंत चूर झालेले स्त्री-पुरुष तेथें निरनिराळ्या अवस्थेंत दिसत होते. गुलाबी गालांचे अमेरिकन तरुण काळ्या चेहऱ्याच्या, लाल डोळ्यांच्या जपानी स्त्रियांच्या बाहुपाशांत गुरफटले गेले होते. अमेरिकन जाझ संगीताचा गुंजारव चालला होता. हास्याचे आवाज, गुदगुल्यांची गुदगुदी, अस्पष्ट,

अर्धवट बाहेर पडलेली आरोळी, आणि गिऱ्हाइकें आणि स्त्रियांमधील व्यवहार ठरतांना होणारी–"हो–ना"–यांची सतत बडबड यांनीं वातावरण दुमदुमलें होतें.

मद्यालयाच्या समोरच लहानशा डान्स–फ्लोअरवर नृत्याची नक्कल चालली होती. कारण नशेंत पुरुष आणि स्त्रिया एकमेकांना आवळीत होते, दूर ढकलीत होते, बसत होते, उठत होते नि मनांतील पाशवी इच्छेची वरकरणीं फेड करीत होते.

वाटेवर मुली आम्हांला बेधडकपणें अडवीत होत्या. कधीं कधीं तीन चार मुलींचा तांडा आम्हांला रोखून धरीत होता. आमचे कपडे ओढून त्यांचें वैशिष्टच, वय नि किमत सांगत होत्या. त्यापैकीं कांहीं मुली जनावराप्रमाणें दिसत होत्या. जाड, उंच, पसरलेला चेहरा, चपटें नाक, बसके डोळे, नि आकार नसलेल्या अशा त्या मुली अंगविक्षेप करीत होत्या. त्यांच्या अंगावरील कपडे मळके होते. त्यांच्यांत आकर्षक असें कांहींच नव्हतें. त्यांच्यांत मोहकता नव्हती. खोटी कां होईना, पण शालीनता नव्हती. "एक हजार येन" त्या ओरडत होत्या, "आजची रात्र खास कार्यक्रमांची आहे. आज स्पेशल नाईट आहे. येरे, माझ्याबरोबर ये. येतोस ? चलतोस ?"

"यावेळीं किमती वाढविलेल्या असतात." माझ्या बरोबरचा सार्जंट म्हणाला. "आतां मद्यालयें बंद होण्याची वेळ झाली आहे. अशा वेळीं गिऱ्हाइकें पिऊन तर्र झालेलीं असतात आणि ते बेफिकीरींत वावरत असतात. अकरा वाजतां मद्यालयें बंद होतांच वेश्याव्यवसायाला महत्व प्राप्त होतें. साध्या लैंगिक क्रियेकरितां अशा वेळीं हजार येन– जवळ जवळ पंधरा रुपये– द्यावे लागतात. पण रात्र वाढूं लागतांच किमती उतरूं लागतात. आणि पहाटे पांच वाजतां जेव्हां गिऱ्हाईक मिळण्याची आशा नष्ट होऊं लागते तेव्हां केवळ चार रुपयांकरितां मुली शरीराचे वाटेल ते हाल झाले तरी ते सहन करावयास तयार असतात. गिऱ्हाईक सांगेल तसें वागूं लागतात नि गिऱ्हाइकांस खूष करातात. पण या मुली म्हणजे नाजुक फुलें नाहींत. गुप्तरोगानें त्या पछाडलेल्या असण्याचीच अधिक शक्यता असते. पण त्या स्वेच्छेनें गिऱ्हाइकांची संपूर्ण मर्जी सांभाळण्याची धडपड करतात. रोज रात्रीं येथें असा प्रकार घडतो. त्याला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

जर सैनिकांस येथें हवें तें सौख्य लाभलें नाहीं तर ते शिजुकू किंवा शिनबाशीला जातील किंवा वाटेंत कुठेंहि त्यांना हवें तें सौख्य लाभेल. त्याकरितां सेनाधिकाऱ्यांनीं गुप्तरोगांची माहिती करून देणारीं पत्रकें वाटलीं व त्यावरील इलाजांची सोय केली.

एका बोळाच्या तोंडाजवळ एक बुटकी, कुरूप मुलगी आम्हांला आडवी आली. ती अठरा वर्षांची असावी. तिचे दांत सर्व सोन्यानें मढविलेले होते. अमेरिकन स्कर्ट आणि स्वेटर तिच्या अंगावर होता. तिचें वचन ९० पौंडांपेक्षां अधिक नसावें. मात्र ती फारच ठेंगणी होती. सार्जंटच्या कमरेइतकीच तिची उंची होती.

" हॅलो, सोजिरा ! " ती म्हणाली, " तुला कांहीं वेळ मजेंत घालवावयाचा आहे ना ? "

" स्कोशी, " सार्जंट तिला उद्देशून म्हणाला, " आम्हांला वेळ मजेंत घालवायचा आहे, पण त्या कामांत तूं आम्हांला कसलं सहाय्य करणार आहेस ? "

" आपण सर्वच प्रकारची मजा करूं या. " ती मुलगी म्हणाली. " कुठल्याहि प्रकारची मजा मारूं या "

" त्याबद्दल किती मोबदला द्यावा लागेल ? "

" पंधरा रुपये. "

" चल चालती हो येथून. " सार्जंट म्हणाला व तो तिच्यापासून दूर झाला.

तेव्हां लगेच ती मुलगी म्हणाली. " थांब सोजिरा, थांब, पंधरा रुपये नाहीं, केवळ दहा रुपये ! मग तर तुझं समाधान होईलना ? "

त्या मुलीच्या आवाजांत विनवणीचा तीव्र स्वर उमटत होता. केंविवाणा चेहरा करून ती विनवीत होती. सार्जंट थांबला व क्षणभर हंसला. " आम्हीं तिघेहि येणार आहोंत. " तो म्हणाला, " बोल, तिघांकरितां काय घेणार आहेस ? "

क्षणभर ती विचारमग्न झाली. नंतर ती म्हणाली. " तिघेहि या, पंधरा रुपये द्या. ठीक ? "

" ठीक आहे. " सार्जंट म्हणाला, " चल, जाऊं या. "

" अरे, पण तुम्हांला जायचें असेल तर तुम्हीं खुशाल जा; पण मी मात्र येणार नाहीं— " मी म्हणालों.

" गप्प बैस. " सार्जंट माझ्या कानांत पुटपुटला. " तिकडे काय काय घडतें याचें तुला आम्हीं दर्शन घडविणार आहोंत. कमीअधिक कांहीं नाहीं."

त्या मुलीच्या पाठोपाठ आम्हीं एका आळीच्या तोंडाजवळ गेलों. त्या आळींतील आंधारांत कांहींच दिसत नव्हतें. काळयाभोर भिंतीच्या माथ्यावर आकाश तेवढें दिसत होतें. त्या आंधारांत कुणीतरीं माझ्या दंडाला धरून सुई टोंचल्याचा मला भास झाला. मी अंग झटकलें, पण कसल्यातरी आवरणाखालीं मी हळूंच दडपला जात आहें असें मला वाटलें. लतापल्लवें चेहऱ्यावरून कोणीतरी फिरवीत आहे असें मला वाटलें. माझा आवाज मलाच धडपणें ऐकूं येत नव्हता.

" सार्जंट, तूं कुठें आहेस ? "

" इकडे फार आंधार आहे, नाहीं का ?" त्यानें उत्तर दिलें.

" होय, फारच अंधार आहे. " मी पुटपुटलों.

दोन सोजिरांच्या मध्यें मी होतों. त्या मुलीनें माझा हात तिच्या हातांत घेतला. एका लहान घरासमोर एक म्हातारी कसलातरी भाजीपाला खात बसली होती. आंतील लँटर्नचा प्रकाश बाहेर पडला होता. आम्हीं घरांत प्रवेश करीत असतांना त्या म्हातारीनें आमच्याकडे पाहिलेंदेखील नाहीं. आंत मात्र लँटर्नच्या प्रकाशांत घराला उजाळा लाभला होता नि घरहि स्वच्छ दिसत होतें. गांव आणि गांवांतील हमरस्ते पाहून या ठिकाणीं गलिच्छ अवस्थेंतच सर्व कांहीं दिसणार असें मला वाटूं लागलें होतें. पण माझी अपेक्षा खोटी ठरली. दोन लहान मुलें मात्र अगदीं नग्न अवस्थेंत एका ब्लँकेटवर झोंपलेलीं होतीं. त्यांच्या पलीकडेच एक म्हातारा पपासान (वडील) सावकाशपणें धूम्रपान करीत होता. जणूं कांहीं आम्हीं त्याच्या दृष्टीस पडलों नव्हतों असेंच तो भासवीत होता. तें घर त्याचें होतें. पटांगणांत बसलेली म्हातारी, ममासान ( आई ) त्याची बायको होती. दोन नग्न मुलें मात्र त्याच्या मुलीचीं—स्कोशीचीं—असावींत. रोज रात्रीं ती-कुरूप मुलगी जें कार्य करीत होती त्यामुळें त्या लोकांचा उदरनिर्वाह चालला होता. नाहीं त्या

ठिकाणीं आपण पाऊल ठेवलें असें मला वाटलें. मी दरवाजाकडे वळलों. स्कोशीनें माझे बाहू घट्ट पकडले. " ए," ती निर्धारानें म्हणाली, " इकडे ये."

दोघेहि सोजीर मोठ्यानें हंसले. पपासानच्या चेहऱ्यावरील सुरकुतीहि हलली नाहीं. दोन मुलें मात्र हळूहळू घोरत पडलीं होतीं. बाहेर ममासान कशानेंतरी माती उकरीत आवाज करीत होती. आतां एकच गोष्ट करणें अवश्य होतें नि मी ती केली. मी खिशांतील पैशांचें पाकीट बाहेर काढलें नि त्यांतून कांहीं जपानी नोटा बाहेर काढल्या. पांचशें येन मी स्कोशीच्या हातांत कोंबले व तिच्यापासून स्वतःची सुटका करून घेऊन अंधारांत पळालों...

कांहीं वेळानें आसाका गांवांतील हुकुई हॉटेलमध्यें मी सार्जंटसह गेलों. त्या विभागांतील काहीं ठिकाणीं 'लैंगिक क्रियांचें प्रदर्शन' रोज रात्रीं चालू असतें. त्याला 'सेक्शुअल एक्झिबिशन' म्हणतात. आम्हीं ज्या ठिकाणीं पोहोंचलों होतों त्या ठिकाणीं उत्कृष्ट कार्यक्रम होतात असें सार्जंट म्हणाला. "टोकियोहून प्रयाण करण्यापूर्वीं अवश्यमेव पहाण्याजोगा हा 'लैंगिक प्रयोग' असतो."

हुकुई हॉटेल तसें दिसावयास 'सभ्य' स्थळ दिसतें. आंत प्रवेश करण्यापूर्वीं पादत्राणें काढावीं लागतात. बाथरूमच्या आकाराच्या एका खोलींत आम्हांला नेण्यांत आलें. खालीं बिछान्यावर उश्या पसरलेल्या होत्या. प्रदर्शन उत्कृष्ट, निकृष्ट किंवा कसेंहि असो; पण तें संपूर्णतया अवलोकन करण्याचें आम्हीं ठरविलें होतें. पण प्रत्यक्ष कार्यक्रमास सुरवात झाल्यानंतर मात्र बिछान्यावरील पात्रांच्या हालचालीनें त्यांच्या हातापायाचा तडाखा आम्हांला न लाभो एवढीच आमची इच्छा होती.

"तूं समोर बैस." सार्जंट म्हणाला. "म्हणजे येथील प्रकार तुला उत्तमरीत्या अवलोकन करतां येईल.

एका तरुणानें व तरुणीनें त्या खोलींत पदार्पण केलें. दोघेंहि सोबतीनेंच बिछान्यावर पहुडलीं. त्यापूर्वीं त्यांनीं शरीरावरील सर्व कपडे काढले. कार्यक्रम संपल्यावर सार्जंटनें त्याविषयीं विचारणा केली. "काय, कार्यक्रमाविषयीं तुझें मत काय आहे?"

" फारच छान आहे कार्यक्रम ! " मी म्हणालों. " पण आतां मी येथून बाहेर गेल्यास चालेल काय ? मी विषयासक्त झालों नाहीं असें मला म्हणावयाचें नाहीं. पण ! "

सार्जंटनें माझी भंबेरी उडवली. मी त्याला जें कांहीं सांगितलें तें त्यानें जपानी भाषेंतून तेथील ममासानला सांगितलें. आणि ममासाननें तें वृत्त जपानी भाषेंतून तेथील प्रेक्षकांस निवेदन केलें. तें सांगत असतांनाच ती हातवारेहि करीत होती. कार्यक्रमापेक्षां त्या वृत्ताचेंच प्रेक्षकांनीं अधिक स्वागत केलें.

माझ्या हॉटेलकडे परत जातांना सार्जंटनें त्याचे तेथील कांहीं अनुभव सांगितले. गेल्या नऊ वर्षांत या विचित्र देशांत तो जवळजवळ एक हजार स्त्रियांजवळ झोंपला होता. पूर्वीं तो गुप्तरोग होऊं नये म्हणून काळजी घेत असे. पण आतां पेनिसिलीन पूर्ण गुणकारी ठरल्यानें तो निर्धास्तपणें त्याचें कार्य करीत असतो. पण कोरियांतून एका नव्या गुप्तरोगाच्या प्रचाराला सुरवात झाली असून स्वैराचारी लोक घाबरूं लागले आहेत. त्या रोगामुळें सर्व शरीरावर तावडतोब लाल पुटकुळचा फुटूं लागतात. पेनिसिलीननें या रोगापुढें शरणागती पत्करली आहे.

मी हॉटेलमध्यें परतल्यावर जवळजवळ एक तास आंघोळ उरकीत बसलों होतों. अंगाला सारखा साबण फांशीत होतों. तें कृत्य अर्थातच हास्यास्पद होतें. पण मी जरी तसा " स्वच्छ " राहिलों होतों, तरी मी " स्वच्छ " आहें असें मला त्यावेळीं मात्र वाटलें नाहीं. म्हणूनच एक तास आंघोळ उरकण्यांत घालविला. टोकियोंतील ती माझी पहिली रात्र अशा प्रकारें पार पडली.

शिनबाशी हें अत्यंत मजेशीर स्थळ आहे. आसाकामध्यें वेश्याव्यवसायाचें हीन स्वरूप दृष्टीस पडतें नि टोकियोंतील उंची, भारी किंमतीच्या हॉटेल्स व क्लबमधून त्याला उत्कृष्ट दर्जा लाभला आहे. पण या दोहोंचा सुरेख संगम शिनबाशी येथें झालेला आढळून येतो. शिनबाशीला भारी मोलाच्या नि हलक्यासलक्या वेश्याहि आढळतात. येथील वर्तमानपत्रांतून नग्न फोटो स्टुडिओंच्या जाहिराती विपुल प्रमाणांत आढळतात. शिनबाशीमध्यें अशा प्रकारच्या स्टुडिओंची रेलचेल झाली आहे. आठशें येन दिल्यानंतर स्टुडिओंत प्रवेश मिळतो. आणि मग एका तासांत एका सुंदर मुलीला नग्न अवस्थेंत

हव्या त्या "पोज" मध्यें मनाजोगत्या प्रकाशयोजनेंत छायालेखनासाठीं उभी करावयास पूर्ण मुभा असते. या कामाकरितां जास्तींत जास्त एक तास गिन्हाइकाच्या वांटेस येतो. शिनबाशी येथील अशा एका नग्न स्टुडिओंत मी गेलों होतों हें खरें आहे. कॅमेरा आणि तत्सम साहित्य विकणाऱ्या एका दुकानाच्या दुसऱ्या मजल्यावर तो स्टुडिओ आहे. कांही तरुणी "सेक"' प्राशन करीत फरशीवर बसल्या होत्या. केवळ तंग चोळी नि अंडरवेअरमध्यें त्या खुलून दिसत होत्या. त्या स्वच्छंदी मनोवृत्तीच्याहि होत्या. माझ्याजवळ कॅमेरा नव्हता. पण आणखी तीनशें येन देऊन तेथील व्यवस्थापकाकडून मी कॅमेरा एक तासाकरितां उसनवार घेतला. पण फिल्मचा सर्व खर्च मला सोसावा लागलाच.

शिनबाशीमध्यें 'सेक्स स्टोअर' आहे हें मी अगदीं लहानपणापासूनच ऐकत आलों होतों. इंपिरियल हॉटेलबाहेर ओळख झालेल्या एका म्हाताऱ्या टॅक्सीड्रायव्हरनें सिनबाशीमधील एका आडरस्त्यावरील 'सेक्स स्टोअर' कडे नेलें. एक उंच आणि क्रूर चेहऱ्याचा जपानी एकाएकीं तेथें उपस्थित झाला व बराच वेळ चर्चेंत घालविल्यानंतर त्याच्या दुकानांतील साहित्य दाखविण्याचें त्यानें मान्य केलें. हें सेक्स स्टोअर लहान असावें, कारण त्याच्याकडे मर्यादित प्रमाणांतच साहित्य दिसत होतें. आणि तें सामानहि हलक्या दर्जाचें होतें. अमेरिकेंतहि त्यांचा प्रचार झाला होता. नवचैतन्य प्राप्त करून देणारे चॉकोलेटचे तुकडे, (म्हाताऱ्यांसहि त्यामुळें नवी प्रेरणा लाभते, असें जरी दुकानावर म्हणाला, तरी तें खोटें आहे असें म्हातारा टॅक्सीड्रायव्हर पुटपुटला.) अश्लील वाङ्मयाचा ढीग त्याच्याकडे पडला होता. मी दुकान घाईघाईनें तपासलें व दाराकडे वळलों. पण तरीहि तो दुकानदार 'फुकटचा गिऱ्हाईक!' नुसत्या 'बघ्या' आहे. असें पुटपुटला, तें माझ्या कानावर पडलेंच.

जपानी लोक मला आवडतात. फारच आवडतात. स्त्रिया आणि पुरुष दोघेंहि आवडतात. ते उद्योगप्रिय आहेत, शालीन आहेत, कल्पक नि तत्काळ मैत्री जमविण्यांत त्यांचा हातखंडा आहे. एवढेंच नव्हे, तर त्यांच्यांत विनोद-बुद्धीहि आहे.

पण ज्यांच्यांत विनोदबुद्धी नाहीं असेहि कांहीं लोक आहेत. आणि ते बहुधा वेश्यांचे 'एजंट' असतात. जगांत ते सर्वत्र आढळतात. अशा

लोकांपासून अलिप्त रहावयाचें झाल्यास अपणास अलिप्त रहातां येतें, हेंहि खरें आहे. मुली, सुंदर मुली शोधण्याकरितां या एजंटांचा तांडा घेऊन हिंडण्याची आवश्यकता नाहीं. अव्हेन्यु झेड, अनेक्स अव्हेन्यू, युटिलिटी अव्हेन्यु येथील बाररूमच्या दारांतच ते लोक बसलेले असतात. तीनशें येन दिल्यानें ते सेवेस तत्पर असतात. कांहीं एजंटांची किंमत एका तासाकरितां पंधराशें येन आहे. आणि त्या तासभरांत ते केवळ उत्कृष्ट मद्य मिळवून देतील. त्यांत स्त्रियांचा लैंगिक दृष्टया संबंध पोहोचत नाहीं. सोबतीला बसून त्या मद्यप्राशन करतील, एवढेंच. पण उंची दर्जाच्या वेश्या 'कडक' मद्यप्राशन करीत नाहींत. असें जरी असलें तरी त्या भारी किंमतीच्या 'स्कॉच' मद्याचीच मागणी करतात. जर तुम्हीं तिचा ग्लास उचलून त्यांतील मद्य प्राशन केलें तर मग तुम्हांला सरळ बाहेरचा रस्ता दाखविण्यांत येतो. कारण त्यांत मद्य नसतें, तर त्यांत चहा असतो. अशा प्रकारच्या 'उच्च' वेश्यालयांत कसें वागावें हें तेथील जुनें गिऱ्हाईक 'नव्या' गिऱ्हाइकांस संधी सांपडतांच सांगितल्याखेरीज रहात नाहीं. जर जवळपास सव्वाशें किंवा पांच-सहाशें रुपये असतील तर कसें संभाळून वागलें पाहिजे हेंहि सांगण्यांत येतें. 'उच्च दर्जाची वेश्या असेल तर तिच्या 'गुप्तरोगाची' माहिती दर्शविणाऱ्या कार्डाची मागणी करूं नका. त्यामुळें तिला तिचा अपमान झाल्यासारखें वाटूं लागतें. आणि तशी मागणी करणें हेंहि मूर्खपणाचेंच ठरेल. कारण तिच्या 'गुप्तरोग' तपासणीचा कागद जरी 'निरोगी' हा शेरा दर्शवीत असला तरी तिला तिच्या शेवटच्या गिऱ्हाइकाकडून या रोगाचा प्रसाद मिळाला नसेलच हें कसें सांगतां येईल ? पण 'उच्च' ठिकाणच्या वेश्या तशा स्वच्छ असतात.

डींग हौ, मेरीक्लब, क्राऊन, किंवा मिओसीचा क्लब या ठिकाणीं ज्या जपानी वेश्या काम करीत असतात, त्या खरोखरच स्वच्छ तर असतातच, पण लाजऱ्या स्वभावाच्याहि असतात. हें केवळ त्या ठिकाणीं जाऊन आलेल्या लोकांसच पटण्याजोगें आहे. इतरांचा या गोष्टीवर कदाचित विश्वास बसणार नाहीं. जर तिला तुम्ही आवडलांत तर ती पहिल्याच नव्हे तर दुसऱ्या रात्रीं शेजशय्या करील. आणि जर तुम्हीं तिच्या पसंतीस उतरलां नाहींस, तर मग त्या ठिकाणीं एक नव्हे हजार रात्री घालविल्यात तरी ती नापसंत गिऱ्हाइकाशीं शेजशय्या करणार नाहीं. कुठल्याहि गिऱ्हाइ-

कासह शय्यासोबत करण्याची तिच्यावर सक्ती करण्यांत आलेली नसते. मद्याऐवजीं केवळ चहा प्राशन करून तिला त्यावरील जें ' कमिशन ' लाभतें त्यांतच तिचें भागण्याजोगें असतें. त्याकरितां आवश्यकता भासल्याखेरीज ती देहविक्रय करीत नाहीं. त्यांपैकीं कांहीं वेश्या कांहीं अमेरिकन सैनिकांच्या ' खास ' रखेल्या असल्यानें त्या क्लबमध्यें मद्य म्हणून गिऱ्हाइकांसह चहा पिऊन कमिशन गोळा करीत असतात. आणि तशा प्रकारें अमेरिकन सैनिकाशीं प्रामाणिक रहातात. व्यवस्थापक वर्गास अर्थातच ही पद्धत पसंत नाहीं. कारण अशा प्रकारें सर्वच मुली वागूं लागल्या तर क्लबमधील मुली शय्यासोबत इतरांबरोबर–खास राखीव गड्यांबरोबर करतात–असा बोभाटा होऊन क्लबचा गिऱ्हाईकवर्ग कमी होण्याचा संभव असतो. पण एखाद्या क्लबमधील मुलीला तुम्हीं खरोखरच आवडलांत तर लैंगिक सौख्य लुटण्याकरितां तिच्याइतकी चांगली स्त्री मग इतरत्र क्वचितच् आढळेल. त्याकरितां पैशाची उधळपट्टी करण्याची आवश्यकता नाहीं. तिच्याशीं व्यवस्थित, शांतपणें, आतताईपणा न दर्शवितां वागल्यानें तिचें हृदय जिंकतां येतें. अखेरीस ती जेव्हां पलंगावर झोंपून गिऱ्हाइकाचें मनोरंजन करते तेव्हां त्यांत कृत्रिमपणा नसतो. तुमच्याइतकीच ती पाशवी लालसेनें आसावलेली असते; आणि तें तिच्या कृतींत आढळून येतें.

जपानी मुली गोड, हंसऱ्या व आनंदी मनोवृत्तीच्या आहेत. त्या रोमॅंटिकहि आहेत. गिऱ्हाइकें मात्र या फुलपाखरांशीं क्रूरपणें वागून त्यांच्या स्वच्छंदी मनोवृत्तीला आळा घालूं लागतात.

अमेरिकन वैमानिक दलांतील एका कर्नलची एका खानदानी जपानी मुलीशीं गट्टी जमली. रोज रात्रीं तो तिच्या सोबतींत काळ घालवूं लागला. ती मुलगी फारच देखणी होती. कमलपुष्पाप्रमाणें नाजुक होती. तिचें त्या कर्नलवर फारच प्रेम होतें. सार्वजनिक ठिकाणीं उभयतांनीं प्रवेश केल्यानंतर ती मत्सरानें भरलेल्या नजरेनें त्याच्या प्रत्येक हालचालींकडे पहात होती. त्या कर्नलची बायको अमेरिकेंत होती, पण ती नवऱ्याच्या भेटीसाठीं जपानला येणार होती. कर्नलनें तिनें जपानमध्यें येऊं नये म्हणून आटोकाट प्रयत्न करून पाहिला, पण त्यांत त्याला यश लाभलें नाहीं. एक दोन दिवसांतच त्याची बायको त्याच्याकडे येऊन दाखल होणार होती.

कर्नल त्याच्या जपानी प्रेयसीस घेऊन शय्या-सोबतीस गेला. एक तास त्यानें लैंगिक सौख्य मनमुरादपणें लुटण्यांत घालविला. आणि मग त्यानें तिला खरी माहिती सांगितली. ती मुलगी स्वस्थ राहिली. ती बिछान्यावर तशीच निःशब्दपणें पडून राहिली आणि कर्नल मात्र निद्रेच्या आधीन झाला. त्यानंतर तो परत कधीं उठलाच नाहीं. स्वाभिमान दुखावली गेलेली ती घायाळ जपानी रमणी बिछान्यावरून उठली, स्वयंपाकघरांत गेली. तेथील सुरा तिनें उचलला व कर्नलचा गळा या टोकापासून त्या टोकापर्यंत कापला ...

जपानी मुली सर्वांस निःसंशयरीत्या आवडण्याजोग्या आहेत. आपल्या आवडत्या जपानी मुलींच्या भेटीसाठीं आपणांस जाऊं देण्यांत येत नाहीं असें पाहून "कँप" मधून पळून जाणाऱ्या अनेक सैनिकांस गोळ्या घालून ठार मारण्यांत आलें आहे.

या गोष्टीचें मला नवल वाटलें. धक्काहि बसला. ही घटना १९५५ मध्यें घडली आहे. पण इतर सैनिकांस त्याचें आश्चर्य वाटलें नाहीं. कारण त्यांना आधीं तत्सम सूचना देण्यांत आली होती. अगदीं स्पष्टपणें, योग्य त्या प्रकारें त्यांना धोक्याची सूचना देण्यांत आली होती. कारण जपानमधील सैनिकांच्या तळांतील गुप्तरोगांचें प्रमाण भरामसाठपणें वाढलें होतें व लष्करी खटल्यांचें प्रमाणहि वाढीस लागलें होतें.

ज्या शिकामाऊणा येथील सैनिकांच्या छावणींत हा प्रकार घडला होता तेथील भिंती सात फूट उंचीच्या होत्या व त्यांच्यावर काटेरी कुंपणांचें तिप्पट आवरण पसरलें होतें. पण सैनिकांनीं त्यांतूनहि मार्ग शोधून काढला. त्यांनीं लेदर पॉकेट परिधान केले होते. ते धडधाकड होते. धांवत येऊन उड्या मारून त्यांनीं दगडी भिंतीचा आश्रय घेऊन तेथून शारीरिक बळ खर्चीं घालून जाळें फांकविलें. " मिलिटरी पोलीस आपणांस पाहिल्यानंतर गोळ्या चालवतील, तरी लक्षांत असूं दे. दूर कुठेंतरी एक नखरेल नारी तुझी वाट पहात आहे, हें विसरूं नकोस. " एक सैनिक पुटपुटला.

अशा प्रकारच्या अनेक जपानी मुलींनीं कांहीं अमेरिकन सैनिकांशीं खास प्रकारची मैत्री केली असून त्यांची त्यांनीं कायमचीच मैत्री संपादन केली आहे गेल्या वर्षीं टोकियोमधील एका सैनिकी छावणींत रोज एक जपानी तरुणी व अमेरिकन सैनिक यांचा विवाह उरकण्यांत येत असे. असें

सतत वर्षभर चाललें. अद्यापीहि तशीच क्रिया घडत आहे. अशा प्रकारचे विवाह यशस्वी ठरणार नाहींत, असे प्रतिपादन अनेक अमेरिकन नियतकालिकांतून– विषेशत: स्त्रियांच्या नियतकालिकांतून करण्यांत येऊं लागलें आहे. जर जपानमध्यें अमेरिकन सैनिक वास्तव्य करून राहिला तर अशा प्रकारचे विवाह यशस्वी ठरतील असें मला वाटतें. जर त्या सैनिकानें त्याच्या चपटचा नाकाच्या बायकोस अमेरिकेस नेलें तर मग मात्र कठिण प्रसंग उद्भवल्या खेरीज रहाणार नाहीं. अमेरिकन स्त्रिया तें सहन करणार नाहींत.

टोकियोंतील माझ्या वास्तव्यांतील तिसऱ्या रात्रीं मी तेथील एका मोठया अमेरिकन दैनिकाच्या ऑफिसमध्यें गेलों व तेथील लोकांकडून कांहीं माहिती गोळा केली. त्यांपैकीं कांही लोकांनीं जपानमधील वेश्याव्यवसायाचा जवळून आणि आनंदानें अभ्यास केला होता. अनेक वर्षे जपानमध्यें राहिल्यानें साहजिकच त्यांना इत्थंभूत माहिती कळली होती. 'जर एकाद्या अमेरिकन सैनिकास उत्तम वेश्यागृहाकडे जावयाचें असेल तर त्यानें कोठें जावयास हवें?' असें मी विचारलें.

"मिओशीचा क्लब." एक तरतरीत चेहऱ्याचा तरुण लगेच उद्गारला. सभोंवतालीं विखुरलेल्या बातमीदारांकडे मी पाहिलें. त्यांनीं सर्वांनीं 'हो'कारार्थी माना डोलावल्या. टोकियोमधील प्रेस क्लबमधून मिओशी मधील जागा आधींच 'रिझर्व्ह' केल्यास तें फायदेशीर ठरतें. पण किंमत ठरवितांना मात्र मुलीची सोबत हवी हें आधींच स्पष्ट केलेलें बरें. मिओशीकडे एक तास किंवा कांहीं वेळ घालविण्याकरतां जाऊं नये, तर सायंकाळीं आठ वाजण्यापूर्वीं जाऊन रात्र तेथेंच घालविणें उत्तम ठरतें. सकाळीं तेथेंच न्याहारी मिळते. ज्या तरुणानें आधीं मिओशीचें नांव सुचविलें होतें त्यानें त्याच्या बचतीची सारी रक्कम मिओशीमध्येंच घालविली होती नि पैशाचें पुरेपूर समाधान लाभल्याचेंहि त्यानें सांगितलें. पैसे खर्च करण्याकरितां मिओशीइतकें सुंदर स्थळ जगांत दुसरीकडे कुठेंहि आढळणार नाहीं असें तो म्हणाला. चारपांच मित्रांसह मिओशींत गेल्यास मजेंत अधिक भर पडते असें त्याचें मत पडलें. त्याकरितां एका रात्रीकरितां एका इसमास दीडशें रुपये खर्च करावे लागतात. सुकियाघीच्या आहारासोबत तळलेलें बीफ आधीं

वाढण्यांत येतें. सोबत तांदुळापासून तयार केलेलें 'कडक' मद्य व मुलीची सोबतहि लाभते.

त्यानंतर एका भव्य जपानी बैठकीच्या गृहांत जावें लागतें. तोंपर्यंत आपला पेहराव बदलून जपानी पद्धतीचा किमोनो अंगावर चढवावा लागतो. तेथें भारी किंमतीच्या चित्रांनीं भिंती सजविलेल्या असतात. हळूंच मुलीहि तेथें येऊन दाखल होतात. पंधरा मुली–पण सर्वच देखण्या!

तुमच्या आवडत्या मुलीसह मग तेथें दोन–तीन तास खेळ खेळण्यांत घालवावे लागतात. धक्काबुक्कीस सुरवात होते. सौम्य, लटक्या रागास व प्रेमासहि प्रारंभ होतो. अशा प्रकारें त्या मुलींशीं अधिक निकटचा परिचय घडतो. तोंपर्यंत दहा-बारा वेळेस तरी मद्याचा चषक हातांत ठेवण्यांत येतो नि गालावर गुलाबी चढूं लागतांच, स्वर्गांत असल्याचा भास होऊं लागतो.

"चला," ती मुलगी म्हणते. "आपण आंघोळ उरकूंया." नंतर तिच्यासह आंघोळ उरकल्यानंतर जपानी शय्यागृहांत प्रवेश करावा लागतो. सकाळीं न्याहारी बिछान्यांतच उरकली तरी चालते. "दीडशें रुपयांत मौज!" तो तरुण म्हणाला.

त्यानंतर गिंझा येथें पायीं जातांना मी रस्त्यावरील मुलींची व 'मिओशी' मधील मुलींशीं तुलना करूं लागलों. जपानी स्त्रियांच्या सौंदर्याचे विविध दाखले सांपडतात. कांहीं स्त्रियांची कातडी रेशमासारखी आहे. एका तरुणीचे ओठ पूर्णपणें पिकलेल्या सफरचंदासारखे गोलाकार होते. अगदीं शुभ्र दंतपंक्ती व काळेभोर केस हें तिचें वैशिष्ट्य होतें. त्या काळ्या केसांवर दिव्यांचा प्रकाश पडून ते निसळर दिसत होते. कांहीं स्त्रिया चपट्या नाकाच्या नाहींत. सरळ नासिका हें तर त्यांचें वैशिष्ट्य आहे. जुन्या जपानी चित्रांतील स्त्रिया याच प्रकारच्या आहेत. त्यांचे डोळे इतके तेजस्वी असतात कीं जणूं कांहीं ते विस्तवाचे निखारे आहेत असें वाटूं लागतें. नाजुक देहयष्टी, लहान आकार हें सर्व त्यांचें इतर वैशिष्ट्य ठरतें. तिसऱ्या सदरांत मोडणाऱ्या स्त्रिया अमेरिकन स्त्रियांसारख्या आहेत. उंच, भरदार उरोज आणि नितंब व हॉलिवूडमधील तारकांइतकें अकर्षक लावण्य त्यांच्यांत आढळतें.

७०७१० ... दि ... ७३२२ ... नों दि: ५।५।६६

अनेक रम्य स्थळांनीं जपान विखुरलेलें आहे आणि अनेक आकर्षक 'क्लब' या ठिकाणीं आढळतात. पण ज्या ठिकाणीं स्वच्छंदी करमणूक लाभावी अशी गिऱ्हाइकांची इच्छा असते अशा स्थळांचा नामनिर्देश करतांना गिबाशा, दि क्राऊन क्लब, दि डींग हौव यांचा उल्लेख करावा लागेल. पण हीं सर्वच स्थळें खर्चिक आहेत. स्वस्ताईची तेथें कमाल झालेली आढळणार नाहीं. त्यांतल्या त्यांत गिबाशा हा क्लब तर अत्यंत महागडा आहे. 'दि क्राऊन क्लबमध्यें जातांना जपानी इसमाची सोबत असल्यास सोईचें पडतें. कारण या ठिकाणीं केवळ जपानी गिऱ्हाइकांचाच अधिक भरणा झालेला आढळून येतो. या ठिकाणीं आढळणाऱ्या मुली मात्र फारच लावण्यवती आहेत. त्यांच्या-इतक्या लावण्यवती जपानमध्यें इतरत्र आढळत नाहींत. 'डिंग हौव' चा अर्थ 'ठीक आहे' असा होतो. या ठिकाणीं सुंदर मुली आहेत, शिवाय पाश्चात्य धर्तीचा बँडहि आहे. आणि येथील वातावरणहि आल्हाददायक व चित्तप्रसन्न आहे. याच ठिकाणीं मी माझा वेळ सर्वांत अधिक मजेंत घालविला.

टोकियोंत गेल्यानंतर एक गोष्ट विसरून चालणार नाहीं. तेथें आंघोळीची जी सोय करण्यांत आली आहे त्याचा अवश्यमेव फायदा उचलला पाहिजे. त्यांतील नांवाजलेलें स्थळ म्हणून टोकियो ऑन्सीनचा उल्लेख करावा लागेल. तें चोवीस तास उघडें असतें. सहाशें येन दिल्यानें आंघोळीचें स्वारस्य तर लुटतां येतेंच पण इच्छा असल्यास ज्या मुलीनें तुम्हांला आंघोळीच्या विधींतून पार पाडलेलें असतें तिला बक्षिशीदाखल कांहीं रक्कम दिल्यास ती अनाठायीं ठरणार नाहीं. बडदास्त राखण्याची व गिऱ्हाइकांच्या सुखसोयी पहाण्यांत ती फारच वाकबगार आणि तत्पर असते.

नांवाजलेल्या स्थळांऐवजीं ज्यांची थोडीच जाहिरात झाली आहे अशा स्थळांकडे गेल्यास आंघोळीची सोय त्या ठिकाणीं फारच उत्कृष्ट झालेली आहे असें आढळून येतें; असें या विषयावरील तज्ज्ञांचें मत आहे. अशा स्थळांची माहिती वाटेवरील जपानी इसमांस किंवा अमेरिकन सैनिकास विचारतांच चटकन् मिळते.

मद्याच्या नशेंत चूर झाल्यानंतर त्यांतून समाधानकारकरीत्या सावध होण्याकरितां "टोकियो बाथ" चा आश्रय देणें हितकर ठरतें. या

ठिकाणीं किमोनो परिधान करून बाथरूममध्यें एका मुलीसह प्रवेश करावा लागतो. आंत प्रवेशल्यानंतर ती अंगावरील किमोनो काढते. विरळ वस्त्राची कंचुकी नि तंग आंखूड चड्डी एवढाच पेहराव तिच्या शरिरावर असतो. दोन कारणांकरितां बाथरूमच्या व्यवस्थापकांनी तिची निवड केलेली असते. एक तर ती देखणी असते व दुसरें कारण हें कीं ती कामांत उत्साहानें भाग घेत असते. पण तिच्याविषयीं गैरसमज करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हें " बाथरूम " आहे, क्लब हाऊस नव्हे ! तिला स्पर्श करून चालणार नाहीं !

ती तुमच्याकडे पाहून हंसते व अंगावरील किमोनो काढण्याचें सुचविते. ती हातांत टॉवेल देते. तो आपण आपल्या समोर धरून शॉर्टपॅंट काढावी लागते. ती गालांतल्या गालांत हंसते, आणि मग दुसऱ्या खोलींत चलण्याविषयीं ती इषारा करते. त्या खोलाला स्विट बॉक्स म्हणतात. आंत गेल्यानंतर केवळ डोकें बाहेर ठेवून ती गिन्हाइकास खोलींत कोंडून ठेवते. मानेभोंवतीं टॉवेल गुंडाळून ती खोलींतील उष्णतामान वाढवूं लागते. कांहीं मिनिटांनंतर तें उष्णतामान गिन्हाइकास सहन होत नाहीं. त्या उष्ण खोलींत शरिराचा जो भाग अडकलेला असतो त्यांतून घामाच्या धारा वाहूं लागलेल्या असतात. हृदयाची " धडधड " वाढलेली असते. जवळजवळ बेशुद्ध होऊन पडण्याची भीति निर्माण होते.

त्याच वेळीं न्हाणीघरांत ' टब ' पाण्यानें भरलेलें असतें. त्यांत जाऊन बसावें लागतें. त्यांतील पाणी थंडगार असतें. सोबतची मुलगी अंगावर पाणी उडवूं लागते. हंसतच ती पाठीला साबण चोळूं लागते. तोंपर्यंत तुम्हांला जें ' कसेंसेंच ' वाटूं लागलेलें असतें ती भावना नष्ट होऊन तुम्हीं आनंदानें व शांतपणें आंघोळीचा आस्वाद लुटण्याची तयारी करूं लागतां. दहा मिनिटें साबण चोळल्यानंतर टबमधून बाहेर काढून ती मुलगी तुमचें शरीर टॉवेलानें पुसूं लागते व तेथून मसाज टेबलाकडे घेऊन जाते. दोन्ही हातांवर डोकें टेकून टेबलावर उताणें पडावें लागतें. त्यानंतर ती मुलगी तिच्यांतील इतर गुणांचें प्रदर्शन करूं लागते. तिच्या दंडांतील व बाहूंतील शक्तीचें ती प्रदर्शन करूं लागते. तिच्या शक्तिमान बोटांनीं ती पाठीवर दाबूं लागतांच मटनाचे गोळे ती तयार करीत आहे कीं काय असें वाटतें. पाठीवर हळूहळू बोटें नाचवून ती लगेच ' जुडो ' कुस्तींतील कुस्तीगिरांप्रमाणें मानेवर उभ्या

७४६८३

हाताचा फटकारा मारून मान दोन्ही हातांनीं गच्च आंवळून धरते. त्यानंतर ती टेबलावर उभी रहाते. पाठीवरील दोन्ही कण्यांच्या मध्यें ती उभी रहाते. त्यावेळीं तुमची छाती पसरट होऊं लागते, गादीवर दाबली जाते. पाठीवरील हाडें मोडल्याचा आवाज होतो. त्यानंतर ती पाठीवर हळूहळू चालूं लागते. पाठीचा कणान्‌कणा मोडल्यासारखा वाटूं लागतो. त्यावेळीं तिच्या पायांत अडीचशें पौंड वजन असलेल्या पहिलवानाचें बळ सामावलें आहे कीं काय असें वाटूं लागतें. ती केवळ पाठीवरच चाल करून थांबत नाहीं, तर नितंबांवरहि पाय ठेवते. मांड्या, पाय यांच्यावरहि ती चालून जाते. त्यावेळीं तुमच्या शरिरांतील रक्ताभिसरण वाढलेलें असतें व त्याची तुम्हांला आयुष्यांत पहिल्यांदाच जाणीव होते.

टोकियोंतील शेवटची रात्र मात्र मी अत्यंत मजेंत घालविली. एका प्रख्यात अमेरिकन मासिकाची जपानी आवृत्ति काढणारा प्रकाशक माझ्या ओळखीचा निघाला. एका छायालेखकाला व मला त्यानें किनस रेस्टॉरंटमध्यें येण्याचें निमंत्रण पाठविलें. तेथें वास्तवपूर्ण जपानी वातावरणाची तो आम्हांला ओळख करून देणार होता. किनसपेक्षांहि सरस मोलाचीं हॉटेलें जपानमध्यें आहेत हें मला ठाऊक आहे, पण त्यांना प्रत्यक्ष पहाण्याचें मला भाग्य लाभलें नाहीं. माझ्या दृष्टीनें किनस हॉटेल हें सानफ्रान्सिस्कोमधील ‘ टॉप ऑफ दि मार्क ’ इतकेंच उच्च दर्जाचें हॉटेल आहे. पण येथें अधिक शांतता आहे, हें कबूल करावें लागेल.

आंतील सुशोभित प्रवेशद्वाराजवळ आम्हीं पायांतील पादत्राणें काढून ठेवलीं. पायांत स्लिपर चढवून एका गडद हिरव्या व लाल रंगानें सजविलेल्या खोलींत त्या प्रकाशकासह गेलों. कांहीं खाण्यापूर्वीं आंघोळ करण्याची इच्छा आहे काय ?” असें त्या प्रकाशकानें छायालेखकाला व मला विचारलें.

“ होय, आंघोळ उरकण्याची माझी तयारी आहे. ” मी म्हणालों.

“ मलाहि आंघोळ उरकावयाची आहे. ” छाया लेखकहि म्हणाला.

तेथील ममासान आम्हाला तळघरांतील ‘ बाथरूम ’ कडे घेऊन गेली. जपानी पाण्याचा ‘ टब ’ अमेरिकन टबापेक्षां सर्वच दृष्टीनीं सरस आहे. टबमध्यें बसल्यानंतर व टब पाण्यानें पूर्ण भरल्यानंतर पाणी कानाला

लागतें. आंत मांडी घालून बसून स्वैरपणें पाणी अंगावर नाचतां–खेळवतां येतें. त्यावेळीं स्विमिंगपूलमध्यें असल्याचा भास होतो.

आंघोळ उरकून आम्हीं ड्रेसिंग–रूमकडे परतलों, तेव्हां आमचे अमेरिकन कपडे नाहीसे होऊन त्या ठिकाणीं जपानी किमोनो आढळले. जेवण तयार झालें होतें व एका प्रशस्त खोलींत आम्हीं पदार्पण केलें. खिडकींतून बाहेरचा जपानी बगीचा दिसत होता. टेबलें मात्र ठेंगणीं होतीं.

प्रत्येक टेबलाजवळ एक गैशा तरुणी बसली होती व आम्हीं जागेवर बसतांच त्यांनीं जेवण वाढण्यास सुरवात केली. गरम मद्य, सुकियाकी, हेरिंग, सोयाबिन, कच्ची भाजी, तळलेली भाजी (त्यांचीं नांवेंहि मला ठाऊक नाहींत.)अनेक प्रकारची मिठाई ताटांत वाढण्यांत आली. पक्वान्नांची चंगळ चालली होती. जेवण–विधी लवकर संपुष्टांत येईल असें वाटत नव्हतें. ताटांत खाद्यपदार्थांची रीघ लागली होती. त्यांपैकीं कांहीं मला आवडले नाहींत. पण रुचकर पदार्थच त्यांत अधिक होते, हें मान्य करावें लागतें.

मी जेवत असतांना माझ्या सेवेला सादर झालेली गैशा तरुणी मला पंख्यानें वारा घालीत होती. कधीं कधीं एकादें मिष्टान्न ती तोंडांत घालीत होती व ती अत्यंत लाजऱ्या स्वभावाची होती. जुन्या पद्धतीच्या गैशांप्रमाणें तिनें केस डोक्यावर गुंडाळले होते व त्यांत फणी अडकविली होती. चेहऱ्यावर सफेद पावडर, आणि शरिरावर धंद्याला अनुसरून तिनें रंगीबेरंगी कापडाचा झगा परिधान केला होता. गैशा ह्या वेश्या नाहींत तर केवळ करमणूक करणाऱ्या स्त्रिया आहेत. त्यांत त्या बाकबगार आहेत. सामिसेन वाजवणें, नृत्य करणें आणि गिऱ्हाईक जेवत असतांना जुन्या नाटकांतील कांहीं प्रसंगांची नक्कल करणें हें त्यांचें कार्य असतें. वेळोवेळीं आमच्या शेजाऱ्च्या गैशा उठत होत्या नि वाद्य वाजवीत होत्या, व नृत्य करीत होत्या.

जेवण उरकल्यानंतर आम्हीं परत अमेरिकन पेहराव अंगावर चढविला. आमच्या प्रकाशकानें जपानी किमोनो मात्र भेटीदाखल आमच्या स्वाधीन केला. वेळ अत्यंत मजेंत गेला यांत कांहींच शंका नाहीं. गिऱ्हाइकांस अगदीं सभ्यपणें वावरून जास्तींत जास्त मजा लुटतां येते हेंच या जपानी आदरातिथ्याचें मुख्य वैशिष्टच होय. आणि मी तें कदापि विसरणार नाहीं.

जपानी लोक चांगले मित्र आहेत आणि वाईट शत्रू आहेत. जपान मला आवडतो तो केवळ कांहीं कपोलकल्पित गोष्टी ऐकल्यानें नव्हे, तर तेथें स्वच्छंदी जीवनाची जी मजा लुटतां येते ती कांहीं और आणि न्यारी आहे. व त्याकरितांच जीवनांतील मौज लुटण्याकरितां मी जपानकडेच धांव घेईन.

पण अशी इच्छा बहुतेक सर्वच अमेरिकन सैनिकवर्ग बाळगून आहे. एकदां जपानमध्यें जाऊन आल्यानंतर एखाद्या सैनिकास परत जपानमध्यें जावयाचें झाल्यास सेनाधिकारी त्याला मुद्दामच आधीं आठ महिने कोरियांत रहावयास लावतात आणि तेथें तर नरक विखुरला आहे. पण त्यानंतर आपणास स्वर्गीय सौख्य लाभणार आहे, याची जाणीव ठेवून अमेरिकन सैनिक कोरियांतील नरकयातना सहन करण्यास हंसतमुखानें तयार होतो.

## १३ पुरुषांची शिकार करणाऱ्या स्त्रिया

डेन्मार्कमध्यें पॅरिस आणि न्यू आर्लीन्स येथील वेश्याव्यवसायाचे सर्व प्रकार आढळतात. म्हणूनच त्याचा 'दुसरें पॅरिस' असा उल्लेख करण्यांत येतो. तेथील स्त्रियांस तास-दोन तासांचा सवंगडी नको असतो. उदरनिर्वाहाकरितां त्यांना पुरुषांची सोबत दीर्घकाल हवी असते. त्याकरितां त्या अशा "भक्ष्या" च्या शोधांत असतात. त्याचें वृत्त रिचर्ड कार्टरनें नमूद केलें आहे.—

कोपेनहेगन ही डेन्मार्कची राजधानी. सडकेवरील एका कॅफेंत एका तरुणीसह मी बसलों होतों. तिनें स्वतःच मला पाचारण केलें होतें. टिव्हॉली गार्डन्समधील डान्स-हॉलमध्यें आमची ओळख झाली होती. टिव्हॉली गार्डन हें शहराचें करमणुकीचें भव्य स्थळ होतें. मध्यरात्रीं तिनें माझा निरोप घेतला. "माझा एक मित्र माझी वाट पहात असेल. मी आतां जातें. सकाळीं तुमच्या हॉटेलजवळील कॅफेजवळ भेटा." असा तिनें रात्रीं निरोप घेतला

होता. तिच्या अंगावर आतां रात्रीचेच कपडे होते. वाटेवरील लोकांकडे पाहून मी म्हणालों, " हे लोक कामावर जात आहेत, नाहीं का ?"

" पण मी कामावरून आतांच परतलें आहें. ती म्हणाली, " माझ्या मित्राच्या बोटीनें सकाळीं किनारा सोडला. तो दोन महिने बाहेरच रहाणार आहे. तेव्हां नव्या मित्राची मला आवश्यकता आहे. तास-दोन तासांकरितां मित्र लाभतात, पण त्यांची मला गरज नाहीं. एक-दोन आठवडे माझ्यासह रहाणारे मित्र मला हवे आहेत. "तुम्हीं इथें किती दिवस रहाणार आहांत ?"

" मी उद्यां गाव सोडून जाणार आहें " मी म्हणालों.

अशा स्त्रियांमुळेंच कोपेनहेगनला " दुसरें पॅरिस " म्हणून संबोधण्यांत येतें. डेन्मार्कची लोकसंख्या न्यूयॉर्कच्या लोकसंख्येपेक्षां निम्म्मानें कमी आहे. पण येथें प्रत्येक तासांत मजाच मजा ठांसून भरलेली आहे. मजेला, गंमतीदार जीवनाला, रंगेल हालचालीला येथें वाव आहे. मोकळीक आहे, मुभा, आहे.

टिव्हॉली गार्डन हें करमणुकीचें प्रमुख स्थळ आहे. वीस एकर जागा बागेनें व्यापली आहे. मे ते सप्टेंबर ती उघडी असते. एक लाख लोक रोज तेथें जात असतात. त्यांत दोन नृत्यगृहें आहेत. अनेक मद्यालयें आहेत. निर्मनुष्य स्थळें आहेत. तेथें वेळ मजेंत न घालविणारे लोक अखेर अरसिक ठरतात.

मद्यालयांतील नोकरवर्ग गिऱ्हाइकांची स्त्रियांशीं ओळख करून देतात पण ते स्त्रियांचे हस्तक नसतात. गिऱ्हाइकांनीं वारंवार त्या मद्यालयास भेट द्यावी म्हणून ही योजना केलेली असते.

नैहॉन हें समुद्रकिनाऱ्यावरील स्थळ आहे. तेथील स्त्रिया घडिभराची सोबत पत्करतात. स्वीडनमधून दारुडे खलाशी तेथें येतात. अशा खलाशांच्या सोबतीवर त्या स्त्रियांचें जीवन अवलंबून असतें. येथील स्त्रियांच्या मित्रांपासून मात्र सावध रहावें लागतें. पण संकटाशिवाय जीवनांत मजा ती काय उरली ?" असें एक स्वीडिश खलाशी म्हणाला. " आज मी मद्याचे २८ प्याले रिकामे केले."

" त्याची तुला किती किंमत द्यावी लागली ? "

"ही किंमत द्यावी लागली." असें म्हणून त्यानें त्याचा मारामुळें सुजलेला डोळा दाखवला. "आणखींहि किंमत द्यावी लागली." असें म्हणून त्यानें त्याचें पैशाचें रिकामें पाकीट दाखविलें. चौघांनी आज माझ्यावर हल्ला केला, पण त्यांतील एकच सुदैवी ठरला. माझ्या सहेलीचा मित्र माझी वाट पहात उभा राहिला होता. तेथील स्त्रियांचा मित्रपरिवार नेहेमींच असें वागतो. कोणीतरी माझी मार्गप्रतीक्षा करीत आहे हें मला ठाऊक होतें. त्यानें मला हा प्रसाद दिला. त्यानंतर तीन लोक मला भेटले. त्यांच्या मैत्रिणींची ओळख करून देण्याचें त्यांनीं स्वतः होऊन कबूल केलें. मला त्यांनींच मद्य पाजलें व मी खूप बेभान झालों आहें असें पाहून मला लुबाडण्याचा प्रयत्न केला. पण माझें पाकीट रिकामें होतें व दारूचा खर्च त्यांनींच केला होता. अखेर ते मूर्ख ठरले.

ॲलीगेड आणि नॉरीगेड स्ट्रीटवरील दोन क्लबमधेंच मद्य विकण्याची सोय करण्यांत आली आहे. पण इतर बिगरपरवान्याचीं पंचवीस तरी मद्यालयें कोपेनहेगनमध्यें आढळून येतात.

निकोलाज कर्क या विभागांत वेश्यांचा खूप भरणा झालेला आहे. व्यापारीवर्ग आणि खलाशी यांच्यावर त्यांची नजर रोखलेली असते. या ठिकाणी स्त्रिया पैशांची मागणी करीत नाहींत. त्यांना केवळ थोडें मद्य, कांहीं मादक पदार्थ आणि झोंपण्याकरितां जागा हवी असते.

पण येथें आर्थिक देवाणघेवाणहि चालते. येथील स्त्रिया खोटें कारण पुढें करून पैसे उकळण्यांत वाकबगार आहेत. एक बेकार नटी म्हणाली. "माझ्या मित्रानें एक नाटक लिहिलें आहे. तें रंगभूमीवर आणण्याचा आम्हीं प्रयत्न करीत आहोंत. मी तुम्हांला वाटाड्याचें काम करून शहर दाखवितें. मग हे पैसे मी नाटकाकरितां जमवीन. मला नाटकांत कामहि मिळेल."

एका 'मॉडेल' नें आमच्यासमोर निरनिराळ्या 'पोज' मध्यें उभें रहाण्याचें कबूल केलें. पण 'मी चित्रकार नाहीं,' असें तिला सांगितलें तेव्हां ती म्हणाली. "पण माझें चित्र काढण्याची आवश्यकता नाहीं. कलेचें इतर प्रकारेंहि स्वारस्य लुटतां येतें."

डॅनिश चित्रपट निर्माते वर्षाकांठीं पांच किंवा सहा चित्रपट तयार करतात. पण निकोलाज कर्कमधील पाट्यांचें जें चित्रीकरण करण्यांत आलें

आहे त्यापुढें हॉलिवुडमधील कामोत्तेजक चित्रपटहि फिक्के व निरस वाटूं लागतात.

आणि याच देशानें नाझी लोकांशीं शूरपणें सामना दिला होता हें खरें-देखील वाटत नाहीं.

डेन्मार्कमध्यें मादक पदार्थांची आवक फारच प्रमाणावर वाढूं लागली आहे. मादक पदार्थांचा व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर येथें चालू असून येथील वेश्या मादक पदार्थांच्या पूर्ण आहारीं गेल्या आहेत.

स्कॅंडिनेव्हियन प्रदेशांतून सुट्टीचा वेळ येथें मजेंत घालविण्याकरितां येणारे प्रवाशी व खलाशी यांच्यामार्फत मादक पदार्थांचा पुरवठा केला जातो. त्यापैकीं बहुतेक माल रशियन बोटींतून येतो. राजकीय कारणां-करितां त्या बोटींची तपासणी करता येत नाहीं.

डेन्मार्क जरी 'नाटो' या अमेरिकन सैनिकी संघटनेंत सामील झालेलें असलें, तरी रशियाशीं मित्रत्वाचे संबंध राखण्याचा डेन्मार्कनें नेहेमींच प्रयत्न केला आहे. कारण रशिया त्यांच्या अगदीं समीप आहे.

डेन्मार्कच्या किनाऱ्यालगतच जवळजवळ पांचशें बेटें विखुरलेलीं आहेत. त्यांपैकीं शंभर बेटांवरच माणसांची वस्ती नाहीं. त्यामुळें उरलेल्या चारशें बेटांवर देखरेख ठेवणें पोलिसांस कठिणप्राय ठरतें.

डेन्मार्कमधील गुन्हेगार वर्गामार्फत जुगाराचे अड्डेहि चालविण्यांत येतात. त्या ठिकाणीं स्त्रियांचीहि सोबत लाभत असल्यानें तरुणांचा तांडा तेथें नेहमींच दृष्टीस पडतो. त्यांची कमाई तेथेंच खर्च करण्यांत येते.

कोपेनेहगनमधील पोलिसांस नैहॉन व निकोलाज कर्कमध्यें देखरेख करावी लागते. "अशा ठिकाणीं अजाण इसमांस कांहीं धोका पोहोंचूं नये म्हणून आम्हीं दक्षता बाळगीत असतों. कारण येथील गुंड फारच लूटमार करीत असतात. तरुण व प्रवासी वर्ग आम्हांला भंडावून सोडतात. ते लोक संकटांत अधिक सांपडतात. जोंपर्यंत त्यांच्यावर प्राणघातक हल्ला होत नाहीं, तोपर्यंत त्यांची आम्हीं कधीं कधीं कदर करीत नाहीं. आणि आम्हीं त्यांची पूर्ण काळजी करण्याचें ठरविलें तरी तें शक्य नाहीं. कारण पोलिसांपेक्षां येथें गुन्हेगारांची संख्या अधिक आहे." एक पोलीस अधिकारी म्हणाला.

" टिव्हॉली गार्डनमध्यें तर तुम्हांला फारच काळजीपूर्वक वावरावें लागतें काय ?" मी विचारलें.

" खास तक्रार नमूद केल्याखेरीज आम्हीं तेथें 'अॅक्शन' घेत नाहीं. तेथून तक्रारीहि येत नाहींत. नवखे लोक तेथें वावरतात आणि तेथें काळजी करण्याजोगें कांहीं घडत नाहीं. पण किनाऱ्यावरील नग्नसंस्थांमधून मात्र गडबड चालू असते.'

" नग्न संस्था येथें आहेत कीं काय ? "

" एक नव्हे तर अनेक नग्नसंस्था येथें आहेत. सूर्यप्रकाशांतील नग्न आंघोळीस येथें फार चालना लाभली आहे. अनेक बेटांवर नग्नसंस्था अस्तित्वांत आहेत. अगदींच घातपात झाल्याखेरीज आम्हीं तेथें वळत नाहीं."

एका हॉटेलामध्यें मला पांचशें स्त्रिया आढळल्या नि त्या सर्वच संवंगड्यांची वाट पहात होत्या. त्यांपैकीं कोणीतरी एका ब्रिटिश प्रवाशाचें पैशांचे पाकीट चोरलें होतें. चोरास हुडकून काढणें कठीणच होतें.

" कोपनहेगनमध्यें स्त्रियाच स्त्रिया आहेत, आणि तेंच आमचें दुर्भाग्य होय." एक पोलीस अधिकारी म्हणाला.

# १४ 'मकाव' मधील अविस्मरणीय रात्र

[ मकाव पोर्तुगीजांची पूर्वेकडील एक वसाहत आहे. पोर्तुगीजांचें अतिपूर्वेकडील तें गोवें आहे. आणि त्याच्यावर लाल चीन नजर रोखून आहे. या 'मकाव'ला पोर्तुगीजांनीं आंतरराष्ट्रीय वेश्याव्यवसायाचें क्षेत्र बनविलें आहे. तेथें जॉन ऑस्कर या खलाश्यास काय अनुभव घ्यावे लागले तें वाचा. ]

मादक पदार्थांचाच हा परिणाम असावा. त्या दिवशीं पहांटेस मकाव मध्यें मला असेंच वाटलें. वीस वर्षे मी समुद्रावर सफरी करीत आहें नि त्या दिवशीं पहांटेस मात्र मी जागा झालों, तेव्हां माझे पैसे, माझे कपडे आणि वीस वर्षांची माझी कमाई यांना मी गमावून बसलों होतों.

कसल्यातरी विचित्र चवीनें माझी जीभ सुन्न झाली होती. डोक्यावर कोणीतरी सतत प्रहार करीत आहे असें मला वाटलें. हाँगकाँगमध्यें आमची बोट नांगरलेली होती व तिथें तिचें दुरुस्तीचें काम चाललें होतें. पोर्तुगीज 'जुगझादो'–तुरुंगांत बसून त्यावेळीं मला असें वाटलें कीं दारूमुळें कांहीं माझी अशी अवस्था झालेली नाहीं. सॅनफ्रान्सिस्को ते ऑस्ट्रेलिया प्रवास करणाऱ्या बोटींवर मी काम करतों नि मद्य कसें असतें हें मला ठाऊक आहे.

या सर्व प्रकरणाला सुरवात मात्र सहजगत्याच झाली. मंगळावर जाण्याची जशी माझी इच्छा नव्हती, तशीच मकाव पहाण्याचीहि माझी इच्छा नव्हती. मी मकावविषयीं बरेंच कांहीं ऐकलें होतें हें खरें आहे. कुठल्या खलाश्यानें मकावची माहिती ऐकली नाहीं ? पापाचें क्षेत्र नि गंमती-जमतीचें निवासस्थान म्हणून तें प्रसिद्ध आहे. पण मकावमध्यें कांहीतरी चांगलें पहावयास मिळेल असें मला हाँगकाँगमध्यें वाटलें. कांहीं महिन्यांचा पगार खिशांत कोंबून मी दुसऱ्या बोटीनें मकावची वाट धरली. आमचा इंजिनियर मॅकटावीशहि मकावला चालला होता. मकावविषयीं बरीच मनोरंजक माहिती त्यानें मला पुरवली.

"पोरा, तुला मकाव आवडेल रे !" तो म्हणाला. "समुद्रावरच जीवन कंठणाऱ्या तुझ्यासारख्या इसमाला मकावमध्यें हवें तें सांपडेल. मकावमध्यें—"

"मुली, जुगार अफू, जें पाहिजे तें मिळतें." मी त्याचें वाक्य पुरें करीत म्हटलें. "मला तें सर्व ठाऊक आहे. मी त्याविषयीं बरेंच कांहीं वाचलें आहे."

पण जें ऐकलेंस त्याच्यावर तुझा विश्वास बसत नव्हता. होय ना ?" डोळे मिचकावीत तो म्हणाला. "आतां पहा नि विश्वास ठेव !" पाईपचे झुरके घेत तो पुढें म्हणाला. "सैतानाचें तें खेळघर आहे यांत कांहींच संशय नाहीं. काय मुली ! वा, त्या चिनी मुली तर अप्सरा आहेत, अप्सरा !"

हाँगकाँग दूर पडूं लागलें होतें. ३५ मैलांचा प्रवास संपवावयाचा होता, आणि मॅकटावीशचा तो 'सैतानाचा स्वर्ग' पहावयाचा होता.

मकावमधील ग्रँड हॉटेल प्रशस्त असें उंच हॉटेल आहे. येथील ती गगनचुंबी इमारत होय. या आठ मजली इमारतीस मकानीज लोक तरी गगनचुंबी म्हणूनच संबोधतात. डेस्कजवळच आमचें थाटामाटानें स्वागत करण्यांत आलें. सोळा वर्षांच्या एका देखण्या चिनी तरुणीकडे आमची खोली आम्हांला दाखविण्याची कामगिरी सोंपविण्यांत आली. मी तिच्या पाठोपाठ गेलों. मॅकटावीश मात्र त्याच्या पैशांचें मकानीज पैशांत रूपांतर करण्याच्या कामगिरीकडे वळला. त्या मुलीला 'टिप' म्हणून मी एक डॉलर देणार होतों, इतक्यांत तो खोलींत आला व त्यानें मला मानेनेंच 'न'कार दर्शविला.

मॅक्टावीश तंबाखूची पिशवी उघडीत म्हणाला, "पोरा, तूं आंघोळ कर. मी तोंपर्यंत सडकेवर चकरा मारीत हिंडतों."

"मॅक, अफू खाऊं नकोस." मी म्हणालों. "त्याची तुला संवय लागेल नि सर्व पैसे त्यावरच खर्च करावे लागतील."

तो उत्तरादाखल हंसला. मी कपडे काढून आंघोळीस बसलों. दिवसाइतकीच रात्रहि उकाड्याची जाणार असें मला वाटलें. थंड पाण्याचा सहवास मला बरा वाटला व मी पाण्याशींच खेळत राहिलों. कांहीं वेळानें बाहेरून आवाज ऐकूं आला. मॅक परतला असावा असें वाटून मी ओरडलों, "मॅक, मी आलोंच हं!"

टुवालानें केस साफ करीत मी बाहेर पडलों. मी मान वर उचलली तेव्हां माझी बोबडीच वळली. माझ्यासमोर मॅक उभा राहिला नव्हता, तर एक अनोळखी मुलगी उभी राहिली होती! एवढी देखणी चिनी सुंदरी यापूर्वी मी कधींच पाहिली नव्हती. पलंगावरून माझे कपडे काढून ती ते एका काळ्या बॅगवर ठेवूं लागली होती.

मला पाहून तिला आश्चर्य वाटलें नाहीं. मित्रत्वाचे भाव दर्शवीत ती माझ्याकडे पाहून हंसली व तिचे हात जेव्हां तिच्या अंगावरील किमोनोच्या सिल्कच्या पट्ट्याजवळ चाळा करूं लागले तेव्हां मला माझ्या नग्न अवस्थेची जाणीव झाली. मी धांवतच पलंगाकडे गेलों. "ती पँट इकडे फेंक पाहूं." मी ओरडलों. तिनें फेंकलेली पँट हातांत धरून मी बाथरूमकडे पळालों व जातांना ओरडलों, "अरे पण तूं इकडे काय करीत आहेस?"

तेव्हां मोडक्यातोडक्या इंग्रजींत, पण मधुर स्वरांत ती म्हणाली. "मॅक साहेबांनी मला तुमच्याकडे पाठविलें. तुम्हांला 'मसाज' ची—अंग चोळण्याची आवश्यकता आहे असें ते म्हणाले. आणि माझें नांव लोटस असून माझ्याइतकी कुशल कामगार इथें दुसरी सांपडणार नाहीं."

"मसाज?" आणि मग मला सारें आठवलें, मकावमध्यें अनेक मुली वेश्या म्हणून काम करण्याऐवजीं 'मसाजगर्ल' म्हणून काम करीत असतात. कारण ती ज्या कामाकरितां माझ्याकडे आली होती तें मला क्षण-भरानंतरच कळून चुकलें. तिनें अंगावरील किमोनो काढला व मांड्यांवर सिल्कची मऊ पारदर्शक चड्डी चढविली.

त्याचा मात्र माझ्या मनावर विपरीत परिणाम होऊं लागला. आतां-पर्यंत मी भाव-भावना ताब्यांत ठेवल्या होत्या, पण तिचें अर्धनग्न शरीर पहातांच माझ्या मनाचा तोल सुटला. मी तिच्या आहारीं जाऊं लागलों. पण स्वत:ला सांवरून धरीत मी म्हणालों, "हें पहा, या खोलींत अगदीं एकटें रहाण्याची माझी इच्छा आहे. मला तुझी सोबत नको आहे. हें घे." असें म्हणून मी कांहीं पैसे तिच्या हवाली केले. "आतां तुझे कपडे अंगावर चढवून तूं येथून जा पाहूं."

मॅक जेव्हां परतला तेव्हां त्याच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून मी ओळखलें कीं त्यानें स्वत:चा गैरसमज करून घेतला आहे. त्या मुलीला तसेंच परत पाठविल्याचें वृत्त ऐकून मात्र त्याच्या चेहऱ्यावरील मिस्कील हास्य लोपलें.

"अरे पण तूं असें कां केलेंस?" त्यानें आश्चर्यानें विचारलें, "मी कांहीं मूर्खपणा केला नाहीं, तिला इकडे पाठविण्यांत. इथली रीतच तशी आहे, म्हणून मी तिला इकडे पाठविलें."

"तशी रीत असो वा नसो, मॅक." मी हंसत म्हणालों, "पण लाभ-लेलें सर्व स्वातंत्र्य खलाशी एकदम एकाएकीं संपूर्णपणें नष्ट करीत नसतो. तो दमादमानेंच स्वातंत्र्याच्या उपभोग घेत असतो. तिला इकडे पाठविण्यांत तूं फार घाई केलीस. चल, त्या जुगाराच्या अड्याकडे जाऊं या. तूं त्याची फारच तारीफ करीत होतास नाहीं काय?"

अवेनीदा अलमीदा रीबीसे या विभागांत येथील जुगार मोठ्या प्रमाणांत चालतो. या विभागाची लांबी अर्धा मैल आहे. पण येथील गडबड-गोंधळ मात्र कर्णकर्कश वाटूं लागतो. आम्हीं सेंट्रल हॉटेलजवळ येऊन दाखल झालों.

या हमरस्त्यावरील ती सर्वांत मोठी इमारत आहे. या हॉटेलमध्यें तीन मजल्यांपैकीं एका मजल्यावर केवळ जुगाराचा खेळ चालतो. त्यांत जुगाराचे सर्वच प्रकार पहावयास मिळतात. प्रकाशाच्या झगझगाटानें हॉल डोळे दिपवीत होता. त्याचप्रमाणें नजर खेंचणाऱ्या अनेक ललनाहि तेथें दृष्टीस पडत होत्या. त्या स्त्रियांबरोबर पुरुषहि दृष्टीस पडत होते. हा पुरुषवर्ग वहुतेक चिनी किंवा पोर्तुगीज गर्भश्रीमंतांपैकींच होता. शेंगदाण्याप्रमाणें ते पैसे उधळीत होते.

पण माझी नजर मात्र काळ्याभोर केसांच्या व गौरवर्णीय अशा एका युरेशियन तरुणीवर स्थिरावली होती. ती एकटीच असावी, कारण तिच्या-बरोबर कोणीहि नव्हतें. क्षणभर आमची नजरानजर झाली व तिनेंहि नजर रोखून माझ्याकडे पाहिलें. आणि मग ती लगेच तेथून निघून गेली. मागच्या बाजूस गर्दींत मिसळून ती अदृश्य झाली.

मॅक मात्र दूरवर एका टेबलावर बसलेला आहे असें पाहून ती तरुणी ज्या खुर्चीवरून उठली होती त्या खुर्चीजवळ मी गेलों. ती खुर्ची रिकामीच आहे असें पाहून मी रिकामी जागा बसून भरून काढली.

समोरच आंकड्यांचा जुगार चालला होता. मी त्यावर पैसे लावूं लागलों. माझें दैव जोरांत नव्हतें. मी हरूं लागलों. मी विशेष कांहीं हरलों नव्हतों, पण त्या खेळाचा मला कंटाळा आला होता व तेथून उठण्याचा मी निश्चय केला. पण मला माझा विचार बदलावा लागला. जुगार खेळत असतांनाच जस्मीनचा सुगंध सभोंवतालीं दरवळत आहे याची मला अस्पष्ट जाणीव झाली होती. मी मागें वळून पाहिलें तेव्हां ती युरे-शियन तरुणी माझ्या दृष्टीस पडली. जवळून ती फारच सुंदर दिसत होती. तिचें दैदीप्यमान सौंदर्य देहभान हरपविणारें होतें.

ज्या खुर्चीवर मी बसलों होतों त्या खुर्चीवर तिला परत बसावयाचें असेल असें वाटून मी म्हटलें, “या खुर्चीवर तुम्हांला परत बसावयाचें आहे काय ?”

तिचे डोळे चकाकले. ती हंसली. तिची पांढरी शुभ्र दंतपंक्ती मला दिसली. " नाहीं, " तिला तेथें बसावयाचें नव्हते. मंजुळ स्वरांत ती उद्गारली. " आजचा दिवस मला फारच दुर्दैवी ठरला आहे. पण माझ्याकडील ' लकी ' वस्तूमुळें कदाचित् तुम्हीं सुदैवी ठरण्याचा संभव आहे." ती म्हणाली.

त्यानंतर अगदीं वक्षस्थळापर्यंतचा भाग दर्शविणाऱ्या " लो–कट " " व्ही " आकाराच्या इव्हिनिंग–गाऊनमध्यें हात घालून तिनें तेथून एक हस्तिदंती बाहुली बाहेर काढून ती माझ्या हातांत ठेवली. बाहुलीला सोन्याची सांखळीहि होती. " अनोळखी पुरुषास अनामा ही बाहुली अर्पण करीत आहे. तुम्हांला सुदैव लाभो येवढीच अनामाची इच्छा आहे." ती म्हणाली.

असल्या " दैवी " गोष्टींवर माझा विश्वास नव्हता. पण जुगारांत परत लक्ष वेधल्यानें म्हणा किंवा ती बाहुली जवळ असल्यानें म्हणा, दोन तासांत मी गर्भश्रीमंत ठरण्याइतके पैसे जिंकले.

अनामाला जेव्हां मी ती बाहुली परत देऊं लागलों तेव्हां जिंकलेल्या रकमेपैकीं निम्मी रक्कम मी तिच्या हवालीं करूं लागलों. पण तिनें ती स्वीकारली नाहीं. " तुला जर पैसे नको आहेत, तर मी तुला तुझ्या आवडीची वस्तु " प्रेझेंट " म्हणून द्यावयास तयार आहें. बोल, तुला काय हवें आहे ? अत्तर ? अंडरवेअर ?"

" नको, नको, नको ! " ती हंसत म्हणाली, " माझ्याकडे त्या सर्व वस्तू आहेत. अगदीं भरपूर प्रमाणांत आहेत. " आणि मग भुंवया वक्र करीत ती म्हणाली. " परवया, अनोळखी इसमांकडे मी ' डिनर ' ची मागणी करीत नसतें. पण तुमच्यांसह " डिनर " ला चलण्याची माझी तयारी आहे, आणि मला भूकहि फार लागली आहे. "

हॉटेलबाहेरहि उकाडा मनस्वी होता. एक पेडीकॅब बोलावून त्यांत बसून आम्हीं प्रवास करूं लागलों. कांहीं मिनिटांनंतर अनामा पुटपुटली, " मकावमधील हा मार्ग अत्यंत सुप्रसिद्ध किंवा कुप्रसिद्ध आहे असें म्हणणेंच योग्य ठरेल. या मार्गाला ' रुआ डा फेलीसीदाद ' असें म्हणतात. ' सुखाचा मार्ग ' असा पुरुषवर्ग त्याचा उल्लेख करतात. "

मी तिच्या चेहेऱ्याकडे मंत्रमुग्ध होऊन पहात होतों. पण तिचे उद्गार ऐकतांच मी सभोंवतालीं पाहिलें. मॅकनें या स्थळाचा उल्लेख केला होता व तो थट्टा करीत नव्हता, हें मला पटलें.

या सुखाच्या मार्गावर ज्या वेश्या दृष्टीस पडत होत्या त्या खरोखरच लावण्यवती होत्या. इतक्या देखण्या वेश्या इतरत्र पहावयास मिळत नाहींत. आणि त्या सर्वच त्यांच्या अंगोपांगांचें प्रदर्शन करीत होत्या. अगदीं उघडपणें.

हा मार्ग लांबलचक आणि अरुंद आहे. वाटेंत दुमजली इमारती विखुरल्या आहेत. आणि प्रत्येक इमारतीच्या दारांत स्टुलावर किंवा वेताच्या खुर्चीवर चिनी, मकानीज आणि युरेशियन स्त्रिया त्यांचा किमोनो मोकळा ठेवून गिऱ्हाइकांस आवश्यक त्या शरीरावयवांचें दर्शन करवीत असतात. त्यामुळें गिऱ्हाइकांत आकर्षण निर्माण होऊन आंत जें कांहीं सौख्य वाढून ठेवलें असेल त्याची किंचित् कल्पना त्यांना येऊं लागते.

—पण माझ्या चेहऱ्यावरील विस्मयभाव पाहून अनामा माझ्याजवळ सरकली व मला खेटून बसून हळूंच पुटपुटली. " माझ्या लाडक्या, या रस्त्यावरील दृश्य पाहून बिचकूं नकोस. आतां तुला यापुढें कायदासुद्धां जिथें पोहोंचूं शकत नाहीं अशा ठिकाणीं आणखी मजेशीर गोष्टी दिसणार आहेत."

कांहीं वेळानें आमची गाडी एका तिमजली इमारतीसमोर उभी राहिली. एका लांकडी पाटीवर तीन भाषेंत नांव लिहिलें होतें, "चाई कौक" तीन पायऱ्या चढून गेल्यानंतर प्रवेशद्वार लागलें. अनामानें एकदां दारावर टिचकी मारली, त्यानंतर दोनदां लागोपाठ टिचक्या मारल्या. पांढऱ्या चिनी सिल्कच्या पेहरावांत नटलेल्या एका इसमानें दार उघडलें.

अनामाला पाहिल्यानंतर त्यानें मान तुकवली व तो दारांतून बाजूस सरकला. खोलींतील अद्यावत् सामान पाहिल्यानंतर व डाव्या बाजूकडील खोलींतून गितारचा आवाज ऐकल्यानंतर मी हळूंच शीळ घातली. दुसऱ्या एका खोलींतून 'पार्टी'चा खळबळाट ऐकूं आला. उजव्या बाजूस एक विस्तीर्ण खोली होती. तेथील प्रकाश मंद स्वरूपाचा होता व श्रीमंत पाहुण्यांनी ती खोली भरलेली होती. पण त्या खोलींतील चिनी चित्रें मला अधिक आकर्षक वाटलीं. प्रणयाच्या कलेचा त्या चित्रांतून सुंदर आविष्कार करण्यांत आला होता.

कांहीं मिनिटांनंतर आम्हीं दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींत गेलों. तेथील मऊ गादीच्या आरामखुर्चीवर आम्हीं बसलों. त्या खोलींतहि भडक प्रणयाचा आविष्कार दर्शविणारीं चित्रें रंगविलेलीं होतीं. मखमालीच्या पडद्यां-मुळें मकावमधील गडबड-गोंधळ नि आवाज त्या खोलींत ऐकूं येत नव्हता. मला वाटलें कीं जणूं कांहीं मी दुसऱ्याच एका रम्य जगांत प्रवेश मिळविला आहे. एका वेटरला अनामानें " ऑर्डर " दिली. वेटर निघून गेल्यानंतर अनामा म्हणाली, " आधीं आपण मद्य प्राशन करूं या. त्यानंतर बदकाचें मांस व इतर पदार्थांवर ताव मारूं या. " असें म्हणून ती माझ्या खांद्याला टेकून उभी राहिली. " तुला अनामा आवडते होय ना ? " तिनें विचारलें. " अनामा आवडते कारण ती सुदैवी आहे ! "

" नाहीं. अनामा, गैरसमज करून घेऊं नकोस. अनामा मला आव-डते कारण ती देखणी आहे. सुदैवाची ती देवता आहे, तिच्यापेक्षांहि अनामा अधिक देखणी आहे. " त्यानंतर मी तिला जवळ खेंचलें व ती अलगदपणें माझ्या बाहुपाशांत सांपडली. पण दार उघडलें गेलें व वेटर आंत आल्यानें आम्हीं एकमेकांपासून दूर सरकलों. त्यानें मद्य तर आणलें होतेंच, पण सोनेरी रंगाचा एक किमोनोहि त्यानें अनामाला दिला.

" त्याला काय हवंय् अनामा ? आणि हा किमोनो त्यानं तुला कां दिला ? " मी विचारलें.

मला खिजविण्याकरितां ती म्हणाली. " तो म्हणाला कीं तुम्हीं फारच देखणे पुरुष आहांत, व मी फार सुदैवी आहें; कारण मला तुमच्यासारख्या पुरुषाचा लाभ घडला आहे. आणि हा किमोनो होय ? इथें असा नियम आहे कीं हा किमोनो इथें परिधान करावा लागतो. ये ना, माझ्या अंगावरील कपडे काढण्यास मला मदत कर. "

असें म्हणून ती उठून उभी राहिली. तिची पाठ माझ्याकडे वळली होती. माझे हात तिच्या गाऊनशीं चाळा करूं लागले. पण तिच्या अंगाव-रील गाऊन सरकन् खालीं पडेल असें मला व तिलाहि वाटलें नाहीं. तसें घडलें मात्र. ती आश्चर्यानें ओरडली व झटकन् तिनें किमोनो अंगावर ओढला. तिनें अंडरवेअर मात्र परिधान केला नव्हता. तसें करावयास ती

विसरली असावी किंवा ती तो कधींच परिधान करीत नसावी. म्हणूनच तिनें अंडरवेअरचें प्रेझेंट नाकारलें होतें.

"लाडक्या, माझ्याकडे क्षणभर पाठ फिरवून उभा रहा पाहूं!" ती म्हणाली.

मी चषकांत शँपेन ओतूं लागलों. मी जेव्हां तिच्याकडे वळलों तेव्हां सोनेरी रंगाच्या पारदर्शक किमोनोंत ती बाहुलीसारखी दिसूं लागली होती. लाजतच ती म्हणाली. "चल, आपण मद्य प्राशन करूं या. सिगारेटी ओढूंया. मग तूं मला तुझी कहाणी सांग."

मी दिलेला शँपेनचा चषक तिनें खालीं टेबलावर ठेवला व मगराच्या कातडीच्या पेटीतून तिनें लांबलचक रशियन सिगारेट काढून मला दिली. "ही सिगारेट ओढून तर पहा. मी त्या खास तयार करून घेतल्या आहेत. वेटरनें मेजवर ठेवलेल्या पेटत्या मेणबत्तीच्या सहाय्यानें मी सिगारेट शिलगावली. "लाडक्या, चांगला झुरका घे." तिचे डोळे आनंदानें नाचूं लागले होते.

तिच्या अस्तित्वामुळें इतर गोष्टींकडे माझें पूर्णतया दुर्लक्ष झालें होतें. सिगारेट फारच 'कडक' आहे हेंदेखील मी विसरलों. पायावर पाय ठेवून त्यांचा क्रॉस करून माझ्या खांद्यावर मान टेकून ती मला रेलून बसली होती. "लाडक्या, मजा आहे ना? गंमत आहे ना? ठीक आहे ना सर्व कांहीं? तुला खरें मकाव दाखविण्याचें मी आश्वासन दिलें होतें, तें मी पाळलेंना?"

मी सिगारेटचा आणखी एक झुरका घेतला. "होय, लाडके, तूं तुझा शब्द पाळलास." असें म्हणून मी तिच्या कमरेभोंवतीं हात घालण्याचा प्रयत्न केला.

माझा हात तिच्या कमरेभोंवतीं कधींच लपेटला गेला नाहीं. कारण ती आतां मला दूर-दूर दिसूं लागली होती. खोली माझ्या नजरेसमोर तरंगूं लागली होती व अनामा वर जात असल्याचा मला भास होऊं लागला. मी तिला पकडण्याचा प्रयत्न केला, पण मी स्वतःच खालीं आदळलों.

जेव्हां मी शुद्धीवर आलों तेव्हां माझें डोकें ठणकत होतें. मी डोळे उघडून बोलण्याचा प्रयत्न केला, पण शब्द तोंडावाटे बाहेर पडले नाहींत. दोन

पोर्तुगीज पोलीस मला हलवीत होते. माझ्या अंगावर केवळ 'टी' शर्ट व अर्धी चड्डी होती. माझे इतर कपडे, बूट व पैसे मी गमावून बसलों होतों.

ते पोलीस माझी हकीकत ऐकून मला म्हणाले, "ती तरुणी तुला परत दिसणार नाहीं व त्या जागेवर जी लाकडी पाटी तूं काल पाहिलीस ती आज दिसणार नाहीं. सेंट्रल हॉटेलमध्यें अनेक लोकांसमोर तूं गडगंज संपत्ती मिळविली होतीस, तेव्हां तुला लुबाडण्यांत आलें आहे एवढें मात्र खरें. एका तरुणीनें तुला लुबाडलें हेंच तुझें सुदैव म्हटलें पाहिजे. जर एकादा गुंड तुझ्यामागें लागला असता तर तूं आज जिवंत राहिला नसतास." त्याचे ते उद्गार लक्षांत ठेवूनच मी मकावचा अखेरचा निरोप घेतला."

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 76603

समाप्त

REFBK-0010873
मराठी ग्रंथ सं. 30710 वि.
अनुक्रम 7322 नों. दि.